• पुणे, रविवार, २३ जून २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 195 • वर्ष ३ रे, अंक १९५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



स्मार्टफोन वापराबाबत नवं संशोधन P3



ईगल नाशिक व रत्नागिरी जेट्समध्ये फायनल P12

## सरकारी शिष्टाई सफल : मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद

# हाकेंची समजूत; उपोषण स्थगित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडिगोद्री (संभाजीनगर) :** राज्यातील महायुती सरकारला लक्ष्मण हाकेंची समजूत घालण्यात अखेर यश आले. १० दिवसानंतर लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांनी उपोषण स्थगित केले. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये, या मागणीसाठी हाके उपोषणाला बसले होते. वडीगोद्रीमध्ये सरकारचे शिष्टमंडळ आज त्यांच्या भेटीसाठी आले.

ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये, या मागणीसाठी मागच्या दहा दिवसांपासून प्रा. हाके आणि नवनाथ वाघमारे उपोषणाला बसले होते. आंदोलनाला आलेल्या आजीच्या हातून पाणी पिऊन त्यांनी उपोषण सोडले.



**सामंजस्य :** राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने मागण्यांची दखल घेतल्यानंतर लक्ष्मण हाके यांनी वडीगोद्री येथे सुरू असलेले उपोषण स्थगित केले.

ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही हे सरकारच्या शिष्टमंडळाने पटवून दिल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले. सरकारच्या शिष्टमंडळात पाच मंत्र्यांसह १२ जणांचा समावेश होता. छत्रपती संभाजीनगर विमानतळावर शिष्टमंडळाची बैठक झाली. त्यानंतर ते जालन्यात वडगोद्रीच्या दिशेने रवाना झाले. 'आम्ही आंदोलन थांबवलेले नाही. आंदोलन स्थगित करत आहोत' असे हाके म्हणाले.

एक-दोन मागण्या सोडल्या तर बाकीच्या मागण्यांवर सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शासनाच्या शिष्टमंडळाला विनंती आहे की, गेल्या तीन वर्षापासून पंचायत राजमधील आरक्षण पेंडिंग आहे. आमची ५६ हजार गावे वंचित आहेत. एक हजार पंचायत सदस्य भेटून गेले आहेत. शासनाने कोर्टात काही विनंती केली पाहिजे. हे आंदोलन तात्पुरते स्थगित करत आहोत. सरकारला आम्ही सकारात्मक प्रतिसाद देत आहोत, असे हाके म्हणाले.

दरम्यान, छगन भुजबळ यावेळी म्हणाले की, आपण सगळे एकत्र राहिलो तर ओबीसी समाजाचे आरक्षण वाचेल. तुम्ही आम्हाला कुठेही न्यायला आम्ही जनावर नाही. यावेळी भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यासह ओबीसी आरक्षणात घुसखोरी करणाऱ्यांना आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले. तासभराच्या घणाघाती भाषणात विरोधकांचा समाचार घेतला. त्यांनी आपल्या » पान ११ वर

### सरकारच्या शिष्टमंडळात कोण?

● सरकारच्या शिष्टमंडळात छगन भुजबळ, गिरीश महाजन, उदय सामंत, अतुल सावे, धनंजय मुंडे हे पाच मंत्री आणि गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे हे ओबीसी नेते सुद्धा होते.

## » At a Glance

### उरीमध्ये चकमक; दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**नवी दिल्ली :** उत्तरी काश्मीरच्या बारामुला जिल्ह्यामधील उरीतल्या गोहलान भागात भारतीय सेना आणि संयुक्त सुरक्षा दलांच्या जवानांनी घुसखोरीचे प्रयत्न हाणून पाडले. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुरक्षा यंत्रणांनी उरीच्या जवळ दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. हे दोघेही घुसखोरी करण्याचा प्रयत्न करीत होते. ठार झालेल्या दहशतवाद्यांच्या बाबतीत अद्याप कोणतीही माहिती » पान ११ वर

### सूर्यकांता पाटील यांची भाजपला सोडचिठ्ठी

**नांदेड :** माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. सूर्यकांता पाटील यांनी भाजपकडून हिंगोली लोकसभा निवडणुकीसाठी तिकीट मागितले होतं. तिकीट न मिळाल्याने त्यांनी सोशल मीडियावरून जाहीर नाराजीही व्यक्त केली होती.

### 'नायडू यांचे वर्तन हुकूमशहाप्रमाणे'

**नवी दिल्ली :** गुंटूर जिल्ह्यात



वायएसआर काँग्रेसचे कार्यालय उद्ध्वस्त करताना आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू हुकूमशहाप्रमाणे वागल्याचा आरोप पक्षाचे प्रमुख वायएस जगन मोहन रेड्डी यांनी केला.

### रामलल्ला प्राणप्रतिष्ठा करणारे पं. दीक्षित यांचे वाराणसी येथे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अयोध्या :** येथील मंदिरात राम लल्लाची प्राणप्रतिष्ठा करण्याच्या सोहळ्यात १२१ वैदिक पुराहितांचे नेतृत्व करणारे मुख्य पुजारी पंडित लक्ष्मीकांत दीक्षित यांचे शनिवारी सकाळी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. ते ८६ वर्षांचे होते. त्यांनी वाराणसीमध्ये शेवटचा श्वास घेतला. दीक्षित यांच्या निधनाबद्दल मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

जानेवारीत अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा पूजेत पंडित लक्ष्मीकांत दीक्षित यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या नेतृत्वाखालीच सर्व विधी आणि पूजा पूर्ण झाल्या. » पान ११ वर

## फुले स्मारक विस्तारीकरणाला गती

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महात्मा ज्योतिराव फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मारक एकत्र करण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे. त्यासंदर्भात भूसंपादन करण्याच्याही सुचना दिल्या आहेत. येथील रहिवाश्यांचे सामंजस्यांने भूसंपादनाचा आमचा प्रयत्न असणार आहे, अशी माहिती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली. गंज पेठेत महात्मा फुले वाडा आहे. या वाड्याशेजारी अवघ्या दिडशे मीटर अंतरावर

### भूसंपादनाला हिरवा कंदील

महापालिकेने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारले आहे. हा वाडा आणि स्मारकाला रोज नागरिक भेट देण्यासाठी येतात. मात्र येथे वाहतूक व वाहनतळासाठी प्रशस्त जागा नसल्याने व नागरिकांची गैरसोय होते. त्यामुळे या दोन्ही स्मारकांचा विस्तार आणि या वास्तूंसाठी जोडरस्ता तातडीने विकसित करण्याची गरज असल्याची मागणी सातत्याने केली जात होती. या दोन्ही स्मारकांच्या मध्ये निवासी भाग आहे. वर्षानुवर्षे याठिकाणी राहाणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन अथवा त्यांना योग्य मोबदला देउन ही दोन्ही स्मारके जोडून आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आता थेट संपूर्ण परिसर मोकळा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.या स्मारकाच्या विकसनासंदर्भात नुकतीच उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीमध्ये स्मारक परिसराचे आरक्षण मान्य करण्यात आले आहे. » पान ११ वर

### विभव कुमार यांच्या कोठडीत वाढ

**नवी दिल्ली :** न्यायालयाने शनिवारी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे सहकारी बिभव कुमार यांच्या न्यायालयीन कोठडीत ६ जुलैपर्यंत वाढ केली. कुमार यांच्यावर १३ मे रोजी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी आम आदमी पार्टीच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. कुमारला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट गौरव गोयल यांच्यासमोर हजर करण्यात आले होते.

### येत्या ४८ तासांत मुसळधार पावसाची शक्यता, एनडीआरएफची टीम तैनात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रात आज आणि उद्या विजांच्या कडाकडाटासह पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. कोकणात बहुतेक ठिकाणी, मराठवाड्यात अनेक ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी आज तर उद्या मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी आणि दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. अनेक भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

**कोकणात जोरदार पावसाची हजेरी**

रायगड जिल्ह्यात सकाळपासून मुसळधार झाला आहे. पेरणी केलेली शेती बहरली आहे. कोरडे पडलेल्या नदी-नाल्यांना पाणीच पाणी पाहायला मिळत आहे. त्यामुळे शेतीच्या कामांना वेग येणार आहे. गेले तीन दिवस जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला » पान ११ वर




### उंदीर व घुशींचा सुळसुळाट

# क्षेत्रीय कार्यालय की भंगाराचे गोडाऊन?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**हडपसर :** हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालय जेथे आहे ती जागा अगोदरच अपुरी पडते, अत्यंत कमी जागेत हे क्षेत्रिय कार्यालय आहे.महापालिकेची जागा खूप आहे परंतु इमारत अपुरी असून वाहनतळ सुद्धा अपुरे पडत आहे. कर्मचारी यांची वाहने अधिकारी यांच्या चारचाकी वाहने यांच्यातच वाहनतळ फुल्ल होते ,नागरिकांची वाहने लावण्यासाठी जागाच शिल्लक राहत नाही त्यातच कारवाई करून जप्त केलेल्या हातगाडी,पत्रे,इतर सर्व साहित्य क्षेत्रिय कार्यालय परिसरात अस्ताव्यस्त पडलेल्या असतात सर्वत्र अस्वच्छता पसरलेली असून क्षेत्रिय कार्यालयांत उंदीर व घुशींचा सुळसुळाट झाला आहे,प्रचंड अस्वच्छता पसरून क्षेत्रिय कार्यालय येणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो.

> हडपसर आरोग्य निरीक्षक यासंदर्भात हडपसर अतिक्रमण विभाग यांना नोटीस देण्यात आलेली आहे व सदर राडारोडा तसेच भंगाराचे साहित्य, हात गाड्या, स्टॉल व इतर साहित्य येथून तातडीने हलवावे यासाठी सूचना केलेल्या आहेत. "
> — श्री. नाईक

> स्मार्ट पुणे.. स्वच्छ पुणे या मोहिमेला क्षेत्रिय कार्यालयातच काळे फासले जात असून अगोदर पार्कींग ला जागा अपुरी पडते त्यातच कारवाई केलेले सर्व साहित्य अशा पद्धतीने अस्ताव्यस्त टाकून नागरिकांची गैरसोय करून संबंधित अधिकारी कशाचे प्रदर्शन करतात. सहाय्यक आयुक्तांनी अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी महेंद्र बनकर यांनी केली तसेच दोन दिवसांत क्षेत्रिय कार्यालय परिसरातील स्वच्छता न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला."
> — महेंद्र बनकर

> यासंदर्भात दोन दिवसांमध्ये सर्व साहित्य हलवण्यात येईल व कार्यालय संपूर्णपणे स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.क्षेत्रीय कार्यालय नक्की भांगराचे साहित्य ठेवण्याची जागा आहे का ?"
> — बाळासाहेब ढवळे
> हडपसर क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त

रोज सर्व अधिकारी या ठिकाणी येतात त्यांना ही परिस्थिती दिसत नाही का ? सर्व गोष्टी माहीत असून देखील विनाकारण येणाऱ्या नागरिकांना त्रास होत हे दिसत असताना हडपसर क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी धृतराष्ट्राच्या भूमिकेत अंध असल्याची भूमिका पार पाडत आहे का ? असा प्रश्न महेंद्र बनकर यांनी केला आहे. या ठिकाणी आम्ही कार्यालयात आलो असता गाडी पार्क करता येत नाही. एवढे भंगार या ठिकाणी आणून टाकले आहे. अशी तक्रार तृप्ती टिळेकर यांनी केली.

राष्ट्रसंचार योगदिन विशेष रा

## महाराष्ट्रातील ५९ सामाजिक संस्थांमध्ये योग यज्ञ २०२४

### महा एनजीओ फेडरेशन व भाजप सेवा प्रकोष्ठ तर्फे

**पुणे :** महा एनजीओ फेडरेशन आणि भाजप सेवा प्रकोष्ठ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या ५९ सामाजिक संस्थांमध्ये योग यज्ञ करण्यात आला. यामध्ये सामाजिक संस्थेतील सर्व प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राज्यभर राबविण्यात आला. योगाच्या माध्यमातून समाजात शारीरिक आरोग्य आणि सुसंवाद निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. महा एनजीओ फेडरेशनचे संचालक योगेश बजाज आणि वरिष्ठ संचालक मुकुंद शिंदे यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाद्वारे योगाचे महत्त्व आणि फायदे जन सामान्या पर्यंत पोहोचवण्याचा आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने समाजातील विविध घटकांपर्यंत संदेश पोहोचविण्यात आला.

> भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशां पैकी १७५ देशांच्या सह प्रतिनिधींनी ह्या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता आणि सदर प्रस्ताव मंजूर ही झाला होता. त्यानंतर २१ जून २०१४ पासून महा एनजीओ फेडरेशन जागतिक योग दिन साजरा करीत आहे.
> -शेखर मुंदडा



## महत्वपूर्ण निर्णय

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, रेल्वे प्रशासन व पुणे मनपा अधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली

### खडकी रेंज हिल्स येथील दोन्ही अंडरपास येथील

## वाहतूककोंडीचा प्रश्न सुटणार : आ. शिरोळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकी रेंज हिल्स येथील दोन्ही अंडरपास जवळील वाहतूक कोंडीचा प्रश्न आता लवकरच सुटणार असून त्याबाबत त्वरित ठोस पावले उचलण्यात येणार आहेत. खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, रेल्वे प्रशासन व पुणे मनपा अधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली असून त्यामध्ये पुढील कार्यवाही बाबत चर्चा होऊन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत, अशी माहिती आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी दिली.

> या भागातील वाहतूककोंडी सोडविण्याकरिता रस्त्याची रुंदी वाढविण्यात येणार आहे. येथील अंडरपासची रुंदी ६ मीटर असून ती भविष्यात १८ मीटरपर्यंत वाढविण्यात येईल. प्रथमतः यावर उभारण्यात येणाऱ्या पुलाकरिता जनरल अरेंजमेंट ड्रॉईंग (जीएडी) तयार करण्यात येणार आहे. हे ड्रॉईंग रेल्वे प्रशासनाकडून कडून तयार करण्यात येणार आहे आणि या कामाकरिता लागणारा निधी पुणे मनपाकडून वितरीत करण्यात येणार आहे." — सिद्धार्थ शिरोळे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात झालेल्या बैठकीला आमदार सिद्धार्थ शिरोळे यांसह खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सीईओ, रेल्वेचे डीआरएम, पुणे मनपा मुख्य अभियंता श्रीनिवास बोनाला तसेच डिफेन्स इस्टेट ऑफिसर आणि अम्युनिशन फॅक्टरी खडकी चे अधिकारी आदी उपस्थित होते.

याबाबत लागणाऱ्या परवानग्या खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड आणि रेल्वे बोर्ड येत्या तीन ते चार महिन्यांमध्ये घेणार आहे. पुलाचे काम चार महिन्यानंतर सुरु होणार असून, रेल्वे ओव्हरब्रिजचे काम रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येईल. तसेच तेथील रस्ते किंवा इतर पायाभूत सुविधा या पुणे मनपातर्फे करण्यात येणार आहेत.

### पुण्याच्या वाहतुककोंडीला कॉंग्रेसच जबाबदार

## धीरज घाटे यांची जोरदार टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> कॉंग्रेसच्या सत्ता काळात जे उड्डाणपूल बांधले ते नियोजन शून्य होते. म्हणूनच विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल पाडावा लागला. त्यामुळेही शहरात वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. मेट्रो सेवा सुरु करावी असा प्रस्ताव मंजूर करणारी पुणे महानगरपालिका ही देशातील पहिली महापालिका होती. सन २००५ मध्ये हा प्रस्ताव मंजूर झाला. परंतु पुढच्या दहा वर्षांमध्ये अन्य महानगरांमध्ये मेट्रो सुरू झाली पुण्यात ती सुरू होऊ शकली नाही याला कॉंग्रेसचे उदासीन नेतृत्व जबाबदार होते."
> — धीरज घाटे

**पुणे :** कॉंग्रेसच्या नेतृत्वातील दूरदृष्टी व इच्छाशक्तीचाअभाव, नियोजनशून्य कारभार आणि राजकीय उदासीनता यामुळे पुणेकरांना सध्याच्या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याची टीका भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी केली. शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाल्याने कॉंग्रेसने काल घोड्यावरून रपेट असे आंदोलन केले होते. त्यावर घाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे टीका केली आहे.

घाटे म्हणाले, शहरातील वाहतुकीची कोंडी नियंत्रणात आणावी यासाठी १९८७च्या विकास आराखड्यात एचसीएमटीआर हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता. शहर आणि उपनगरांना 38 किलोमीटरच्या मार्गाने जोडण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. परंतु कॉंग्रेसच्या सत्ता काळात त्यांना या प्रकल्पाला साधी मान्यताही देता आली नाही. वाहतुकीची कोंडी बिकट होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. महायुती सरकारने नुकतीच या प्रकल्पाला मान्यता दिली आहे.

महापालिका क्षेत्रातील उड्डाणपुलासाठीची भूसंपादन प्रक्रिया महापालिकेने करून द्यावी सर्व उड्डाणपूल बांधण्याची जबाबदारी राज्य सरकार घेईल असा प्रस्ताव युती सरकार सत्तेत असताना तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांनी दिला होता. त्यावेळी पुणे महापालिकेत कॉंग्रेसची सत्ता होती. उड्डाणपूल बांधले गेले तर त्याचे श्रेय भाजपला मिळेल या भीतीने कॉंग्रेसने हा प्रस्ताव फेटाळून लावला.

सार्वजनिक वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा मेट्रो प्रकल्प भाजपने मान्यता देऊन सुरू केला. त्याचा पहिला टप्पा पूर्णही केला आणि दुसऱ्या टप्प्याचे काम वेगाने सुरू आहे. कॉंग्रेसने वेळीच मेट्रोचे काम सुरू केले असते तर आज उद्भवलेली वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली नसती.

सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्याचा उद्देशाने निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कॉंग्रेसने कात्रज ते स्वारगेट या मार्गावर प्रायोगिक तत्त्वावर बीआरटी सुरू केली. परंतु घाईघाईने केलेल्या या प्रकल्पामध्ये अनेक त्रुटी राहिल्या. परिणामी बीआरटी प्रकल्प अपयशी ठरला. वाहतूक कोंडी होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. कॉंग्रेसने काल केलेले आंदोलन ही स्टंटबाजी असून चोराच्या उलट्या बोंबा असल्याची टीका घाटे यांनी केली आहे. कॉंग्रेस पक्षाने यासाठी पुणेकरांची माफी मागावी अशी मागणी घाटे यांनी केली आहे.

## 'लोकसेवा'कडून वाङ्मयचौर्य झाले नाही : न्यायालयीन निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी लोकसेवा पब्लिकेशनने प्रकाशित केलेली 'क्लास नोट्स भारतीय अर्थव्यवस्था' आणि 'क्लास नोट्स राज्यघटना' ही दोन्हीही पुस्तके आप्पा उर्फ हनमंत हातनूरे यांनी स्वतः लिहिलेली असून त्यात कोणत्याही स्वरूपाचे कॉपीराइट कायद्याचे उल्लंघन झाले नाही, असा निकाल जिल्हा सत्र न्यायालयाने दिला आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत लोकसेवा पब्लिकेशनचे लेखक आप्पा हातनुरे, संपादक साईनाथ डहाळे, प्राध्यापक शरद गायके, ॲड. अभिजीत देसाई (मुंबई उच्च न्यायालय) यांनी ही माहिती दिली.

आप्पा हातनुरे म्हणाले, "लोकसेवा पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकांत रंजन कोळंबे यांच्या पुस्तकातील मजकूर घेऊन क्लास नोट्स लिहिल्याचा आरोप भगीरथ प्रकाशनाकडून करण्यात आला होता. मात्र, कोळंबे यांच्या पुस्तकातील कोणत्याही स्वरूपाचा मजकूर आम्ही कॉपी केलेला नव्हता. शब्द न शब्द' कॉपी केल्याचा कोळंबे यांचा आरोप पुराव्यांमध्ये आढळून आला नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे लोकसेवा पब्लिकेशनची पुस्तके अथवा क्लास नोट्स या अधिकृत आहेत."

Selected

## रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाने गाड्या रद्द

**पुणे :** रेल्वे विभागाद्वारे पुणतांबा ते कान्हेगाव दरम्यान रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सुरू असल्याने येत्या दि. २३ ते ३० जूनदरम्यान काही रेल्वे रद्द केल्या आहेत. २८ जूनला पुणे-मुंबई (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) इंटरसिटी एक्स्प्रेस, २९ आणि ३० जूनला पुणे-मुंबई डेक्कन एक्स्प्रेस तसेच इंटरसिटी एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. २९ जूनला मुंबई-पुणे डेक्कन एक्स्प्रेस तसेच इंटरसिटी एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. ३० जून रोजी पुणे-मुंबई; तसेच मुंबई-पुणे डेक्कन एक्स्प्रेस रद्द राहणार आहे. या दिवशी मुंबई-पुणे इंटरसिटी एक्स्प्रेसही रद्द राहणार आहे. २३ जून रोजी पुणे-जबलपूर स्पेशल आणि २४ जून रोजी परतीची जबलपूर-पुणे स्पेशल रद्द करण्यात आली आहे. २६ जून रोजी वीरांगना लक्ष्मीबाई झाशी जंक्शन स्पेशल-पुणे आणि परतीची २७ जून रोजीची पुणे-वीरांगना लक्ष्मीबाई झाशी जंक्शन स्पेशल एक्स्प्रेस रद्द राहणार आहे. २८ जून रोजी दादर साईनगर शिर्डी एक्स्प्रेस, २९ आणि ३० जून रोजी मुंबई-साईनगर शिर्डी वंदे भारत एक्स्प्रेस, साईनगर शिर्डी-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेस, दादर-साईनगर शिर्डी (१२१३१/३२) एक्स्प्रेस, दादर-साईनगर शिर्डी (११०४१/४२) एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत.

## वाढवलेल्या पाणीपट्टीविरोधात आवाज उठवणार: नाना पटोले

**पुणे :** जलसंपदा विभागाने पाणी पट्टीचे दर वाढवले आहेत. बागायतदारांसाठी दहा टक्के, कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी सात टक्के दर वाढवण्यात आला आहे. पिण्याची पाणीपट्टी देखील वाढणार आहेत. आम्ही याचा निषेध करतो. विधानसभेच्या अधिवेशनात आम्ही आवाज उठवू असे नाना पटोले शनिवारी पुण्यात म्हणाले. कॉंग्रेस भवन येथे कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बैठक बोलावली होती यावेळी ते बोलत होते. जातीनिहाय जनगणना करायला हवी, त्यातून प्रश्न सुटतील. महाविकास आघाडीतील नेत्यांना स्वतःच्या पक्षातील नेत्यांना खुष करण्यासाठी काही वक्तव्ये करायला लागत आहेत. पवारसाहेब एक पाऊल मागे आले तर आम्ही तीन पावले मागे आलो. तीन पक्षातील जागावाटप चर्चेनंतर नक्की होईल. भाषण वेगळे आणि नेत्यांमधील चर्चा वेगळी आहे. आम्ही स्वतःला कधीच मोठा भाऊ म्हणत नाही. आम्ही राजकीय पक्ष आहोत असे पटोले म्हणाले. पुणे लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव का झाला? त्याचा बुथ निहाय आढावा घेणार असल्याचे पटोले म्हणाले. सरकारने मराठा विरुद्ध ओबीसी असा वाद सुरू केला असून, हे सरकार जातीयवादी असल्याचे वक्तव्य त्यांनी केले.



## पालिकेकडून ५६० निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना नोटीस

**पुणे :** शहरात या महिन्यात डेंग्यूचे ६३ संशयित रुग्ण आढळले आहेत. त्यातील २१ रुग्ण या आठवड्यात आढळले आहेत. या वर्षभरात शहरात डेंग्यूचे ३९३ संशयित रुग्ण आढळले आहेत. याचबरोबर चिकुनगुनियाचे ९ रुग्ण वर्षभरात आढळले आहेत. डासोत्पत्ती स्थाने आढळल्याप्रकरणी महापालिकेकडून ५६० निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना नोटीस बजाविण्यात आली असून, १ लाख ६ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पावसाळा सुरु झाल्यापासून डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ होऊ लागली आहे. मंगळवार पेठेतील सदाआनंदनगरमध्ये २० डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. दरम्यान पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु केल्या आहेत.

## विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा



**पुणे :** उपद्रव मूल्य जास्त असलेले लोक आपले हिरो बनलेले आहेत. त्यामुळे आपल्या समाजाचे खुप मोठे नुकसान होत आहे. हे जर कमी करायचे असेल तर व्यक्तींमधील सृजन मूल्य वाढवणे गरजेचे आहे. योगमुळे सृजन मूल्य वाढून उपद्रव मूल्य कमी होते आणि त्यामुळे हिंसक होत चाललेला आपला समाज अधिक संवेदनशील होतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राजकुमार राठी पतंजली योग चेअर यांच्यावतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागातील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ) सुरेश गोसावी, आंतरराष्ट्रीय योग गुरू डॉ. संप्रसाद विनोद, योग तज्ञ डॉ. गिरीश वेलणकर, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्रभारी कुलसचिव प्रा.(डॉ) विजय खरे आदी उपस्थित होते. तंत्रज्ञानामुळे अनुभवाला महत्त्वच राहिलेले नाही. कारण सध्या कुठल्याही गोष्टीचा अनुभव मिळण्याआधीच त्या गोष्टीची आपल्याला माहिती मिळत आहे. या अनुभवहीन जगण्यामुळे आपण पोकळ होत चाललो आहे. मात्र योगच्या बाबतीत तसे होत नाही, असे डॉ. कुलकर्णी म्हणाले.

### पावसाळी अधिवेशनात आमदार आवाज उठवणार की शांत बसणार ?

## होर्डिंग धोरणाबाबत काय असेल भूमिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** होर्डिंग पडण्याच्या घटना राज्यभर होत असताना नागरिकांच्या सुरक्षेसाठी आमदारांनी विधिमंडळ अधिवेशनात आवाज उठवून कठोर कारवाईसाठी सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले पाहिजे. यासाठी पुणे शहर व जिल्ह्यातील आमदार काय भूमिका मांडणार, याकडे लक्ष लागले आहे.

• एकीकडे पुणे सुंदर शहर केले जाईल, असा दावा आमदार करत असताना दुसरीकडे होर्डिंगच्या विषयाकडे सोयिस्कर दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे आमदार विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात होर्डिंग धोरणावर आवाज उठवणार की शांत बसणार, याकडे लक्ष लागले आहे. होर्डिंगचा भस्मासुर केवळ पुण्यात नाही तर राज्यातील सर्वच शहरांमध्ये त्यांचा सुळसुळाट झाला आहे.



होर्डिंग पडून नागरिक दगावण्याच्या अनेक घटना आत्तापर्यंत घडल्या आहेत. त्यामुळे होर्डिंगच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना राज्य सरकार, महापालिका, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ठोस पावले उचलत नाहीत. होर्डिंग लॉबीमध्ये प्रशासन आणि राजकीय पुढाऱ्यांचे हितसंबंध गुंतल्याने हा गंभीर विषय दुर्लक्षित ठेवला जात आहे. शहरातील महत्त्वाचे चौक, रस्त्यांवरील इमारती, मोकळ्या जागा, इमारतींच्या फ्रंट मार्जीनमध्ये होर्डिंग उभारून त्यावर जाहिराती लावल्या जातात. यातून होर्डिंग व्यावसायिकांना महिन्याला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. पुणे शहरात दोन हजार ५९८ अधिकृत होर्डिंग आहेत, त्यातून या व्यवसायाची वर्षाची किमान ४५० कोटी रुपयांची उलाढाल होत आहे. महापालिकेला होर्डिंग शुल्कातून मात्र केवळ ७० ते ७५ कोटी रुपये उत्पन्न मिळत आहे.

नियमांचे पालन होर्डिंग व्यावसायिकांकडून केले जात नाही. तसेच महापालिका अधिकाऱ्यांना नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

#रा

# विश्ववेध



## लोहाची कमतरता, कर्करोगाचा धोका

कर्करोगाच्या पेशी रक्तातले लोह शोषून घेऊ शकतात. हे प्रमाण कमी असले तरी ते ॲनिमिया होण्यास कारणीभूत ठरु शकते. प्रचंड थकवा, दमल्यासारखे वाटणे, अशक्तपणा या नेहमीच्या लक्षणांप्रमाणे डोकेदुखी, निद्रानाश आणि पचनाच्या तक्रारी यात दिसून येतात. रक्तातले हिमोग्लोबिन कमी होणे किंवा लाल रक्त पेशी प्रमाणापेक्षा कमी होणे याला आपण ॲनिमिया असे म्हणतो. फक्त रक्ताच्या कर्करोगामुळेच नाही तर इतर छातीचा कर्करोग, आतड्याचा कर्करोग यांसारख्याकर्करोगामध्ये सुद्धा ॲनिमिया होऊ शकतो. पण प्रत्येक वेळी ॲनिमिया हा कॅन्सरचे लक्षण असतो असे नाही. पण ॲनिमिया हा तापासारखा असतो, ज्याची गंभीर लक्षणे दिसत नसली तरी तो गंभीर असू शकतो.

एका पाहणीनुसार, हिमोग्लोबीनची पातळी कमी असणाऱ्यांना कर्करोगाचा धोका अधिक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे ॲनिमियाची लक्षणे दिसल्याबरोबर, योग्य तपासणी करुन घेणे महत्त्वाचे आहे.

## स्मार्टफोन वापराबाबत नवं संशोधन

स्मार्टफोन हा आता आपल्या दैनंदिन जीवनाचा जणू काही अविभाज्य भाग बनला आहे. केवळ कॉल करणे किंवा घेणे इतक्या कामासाठी हे उपकरण मर्यादित नाही. हे एक बहुपयोगी उपकरण बनवलेले आहे. सर्चिंगपासून ऑनलाईन पेमेंटपर्यंत अनेक कामे फोनच्या सहाय्याने केली जात असतात. आता 'विनो'ने एक रिसर्च प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये भारतात स्मार्टफोनचा सर्वाधिक वापर कशासाठी केला जातो याचा खुलासा झाला आहे.

जर स्मार्टफोनवर यूजर अक्टिव्हिटीचा विचार केला तर स्मार्टफोनचा सर्वाधिक वापर हा युटिलिटी (उपयुक्त वस्तूंच्या) बिलाचे पेमेंट करण्यासाठी होतो असे दिसून आले. रिपोर्टनुसार सुमारे ८६ टक्के लोक फोनवरून यूटिलिटी बिलाचे पैसे देतात.


ऑनलाईन शॉपिंगसाठी स्मार्टफोनचा वापर सुमारे ८०.८ टक्के केला जातो. तसेच सुमारे ६१.८ टक्के लोक स्मार्टफोनचा वापर जरूरी सामानाची ऑर्डर देण्यासाठी करतात. ऑनलाईन सर्व्हिससाठी ६६.२ लोक स्मार्टफोन वापरतात.

याशिवाय ग्रॉसरी आयटम म्हणजेच किराणा मालाची ऑर्डर देण्यासाठी ७३.२ टक्के लोक स्मार्टफोन वापरतात. डिजिटल कॅश पेमेंटसाठी ५८.३ लोक स्मार्टफोन वापराच्या प्रमाणाचा विचार केला तर सुमारे ६२ टक्के पुरूषांकडे स्मार्टफोन असतो. महिला याबातीत मागे असल्याचे दिसून आले.

देशात केवळ ३८ टक्के महिलांकडेच स्मार्टफोन आहे. मोठी शहरे आणि छोट्या शहरांची तुलना केली तर ५८ टक्क्यांसह मेट्रो पुढे आहेत. त्यानंतर ४१ टक्क्यांसह नॉन मेट्रो सिटींचा क्रमांक लागतो.

## ८५ हजार रूपयांची भाजी!

सध्या आपण काही भाज्यांच्या वाढलेल्या दरांमुळे त्रस्त आहोत. अशा स्थितीत एक भाजी अशी आहे जिची किंमत आपले डोळे विस्फारू शकते. युरोपियन देशांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली आणि 'जगातील सर्वात महाग भाजी'म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भाजीचे नाव आहे 'हॉपशूटस्'ही भाजी इतकी महाग असण्याचे कारण म्हणजे या हॉपशूटस्मध्ये अनेक औषधी गुणधर्म भरपूर आहेत. या भाजीची किंमत सुमारे ८५ हजार रूपये किलो असून भारतात या भाजीची लागवड सहसा केली जात नाही. अनेक मिडिया रिपोर्टनुसार, सर्वात आधी हिमाचल प्रदेशच्या शेतात याची लागवड करण्यात आली होती.




एका अहवालानसार, हॉप शूटस् कापणीसाठी 'बॅक-ब्रेकिंग'आहेत आणि हेच एकमेव कारण आहे की हॉपशॅटसची किंमत इतकी महाग आहे. युरोप आणि उत्तर अमेरिकेतील मूळच्या लोकांनी जगातील सर्वात महागड्या भाजीची लागवड करण्यास सुरूवात केली. ही वनस्पती मध्यम गतीने ६ मीटर (१९ फूट ८ इंच) पर्यंत वाढू शकते आणि सुमारे २० वर्षे जगू शकते.

हॉपशूटला कापणीसाठी तयार होण्यासाठी तब्बल तीन वर्षांचा कालावधी लागतो. या वनस्पतीची कापणी करण्यासाठी बरेच शारीरिक श्रमही करावे लागतात, कारण वनस्पतीच्या लहान हिरव्या टोकांना तोडताना अतिशय काळजी घेणे आवश्यक असते. वैद्यकीय अभ्यासानुसार, असे सूचित केले गेले आहे आहे की, भाजी क्षयरोगाविरूद्ध अँटीबॉडी बनवू शकते तसेच चिंता, निद्रानाथ, अस्वस्थता, तणाव, अटेंशन डेफिसिट-हाइपरक्टिविटी डिसऑर्डर अशा विविध समस्यांवर मदत करते. या भाजीचा वापर मद्य, हर्बल चहा, हर्बल, औषधे, शीतपेये अशा वेगवेगळ्या उत्पादनांसाठी केला जात असतो.

नवं तंत्रज्ञान

## कॉर्टिकल इम्प्लांट : दंतरहिततेला सार्थ पर्याय

**कायमस्वरुपी दात बसवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या क्लिष्ट व अधिक वेळखाऊ पारंपरिक दंतप्रत्यारोपण शस्त्रक्रियेला एक उत्तम, आधुनिक, शास्त्रीय आणि कमी त्रासदायक व सहजसाध्य पर्याय उपलब्ध आहे. याला 'कॉर्टिकोबेसल डेंटल इम्प्लांट' असे म्हणतात. या उपचारपद्धतीविषयी...**



PRE OP RADIOGRAPH POST OP RADIOGRAPH

निरोगी शरीरासाठी पोषण आहाराचे जितके महत्त्व आहे तितकेच ग्रहण केलेल्या अन्नाची पाचनप्रक्रियाही सुव्यस्थित असणे आवश्यक आहे. अन्यथा, अपचन, त्यामुळे होणारी ॲसिडिटी यांसह अनेक समस्या जडतात आणि त्याकडे दुर्लक्ष होत राहिल्यास पुढे जाऊन गंभीर व्याधी जडण्याचीही शक्यता असते. अलीकडील काळात आरोग्याविषयीची जागृती वाढल्यामुळे पचनक्रिया योग्य राहावी यासाठी जेवणानंतर चालणे, नियमित व्यायाम करणे, तडस लागेपर्यंत न जेवणे यांसारख्या बाबी अनेक जण करताना दिसतात. परंतु हे सर्व करत असताना एक मुख्य बाब दुर्लक्षित राहते, ती म्हणजे आपण ग्रहण करत असलेल्या अन्न नीट चावले न जाणे. यामध्ये दातांची भूमिका महत्त्वाची असते. किंबहुना, पचनप्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या शरीरातील अवयवांमध्ये दात हे पहिल्या स्थानी असल्याने त्यांची भूमिका सर्वाधिक असते. परंतु दातांच्या आरोग्याबाबत आजही पुरेशी जागरुकता दिसत नाही. परिणामी दंतव्याधींचा सामना करावा लागतो.

खरे पाहता, आरोग्याच्या दृष्टीनेच नव्हे तर सौंदर्य, व्यक्तिमत्व यामध्येही स्वच्छ, निरोगी दात महत्त्वाचे ठरतात. याची जाणीव दात गमावल्यानंतर प्रकर्षाने होते. दात गमावल्यानंतर अन्न चावून खाण्यामध्ये अडचणी येतात. अन्नामध्ये पुरेशा प्रमाणात लाळ मिसळली जात नाही. सुग्रास अन्न असूनही जेवणाचा आस्वाद घेणे दुर्मिळ होऊन बसते. अन्नाचे नीट चर्वण न केले गेल्यामुळे अपचनाच्या समस्या वाढतात. अशीच स्थिती कायम राहिल्यास चेहऱ्यावर कमी वयातच वृद्धत्वाच्या खुणा दिसू लागतात.

वास्तविक आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आता दात गमावल्यानंतरची काळजी दूर करणे शक्य झाले आहे. यामध्ये कवळी बसवणे हा पारंपरिक पर्याय तर आहेच; पण त्याजोडीला दंतप्रत्यारोपणही आता सहजशक्य झाले आहे. कवळी वापरण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेकांना अडचणी येतात. याचे कारण कवळीला हाडांचा पुरेसा आधार नसतो. त्यामुळे टणक पदार्थ खाता येत नाहीत किंवा खाताना त्रास होतो. तसेच रात्री झोपताना दातांची कवळी काढून ठेवावी लागते. हिरड्यांची झीज झाली असल्यास कवळी नीटप्रकारे न बसल्यामुळे हिरड्यांना सूज येणे, हिरड्यांमधून रक्त येणे असेही प्रकार पाहायला मिळतात.

यावर उपाय म्हणून पारंपरिक दंतप्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करता येते. पण यामध्ये दात बसवण्यासाठी बराच काळ जावा लागतो. त्यामुळे रोजच्या खाण्याच्या सवयी सुरू होण्यास बराच विलंब होतो. यामध्ये जबड्याच्या कमी कडक भागात नवीन दात बसवले जातात. यानंतर रोपण आणि हाड जुळून येण्यासाठी काही दिवस वाट पहावी लागते. यावर उपाय म्हणजे आता नवीन दात बसवण्यासाठी कॉर्टिकल इम्प्लांट नावाचे नवीन तंत्रज्ञान वापरले जाते. हे तंत्रज्ञान प्रामुख्याने ऑर्थोपेडिक संकल्पनेवर काम करते. यामध्ये इम्प्लांट हाडाच्या कठीण भागावर किंवा जबड्यात बसवून त्यावर नवीन दात बसवले जातात. याद्वारे ७२ तासांत नवीन दात त्यांच्या जागी स्थिर होतात. हे तंत्रज्ञान शस्त्रक्रिया विरहित असल्यामुळे यामध्ये रक्तस्त्राव कमी होतो आणि सूज येण्याची शक्यताही कमी असते.रूग्णांना या प्रक्रियेनंतर लवकरच दैनंदिन जीवनातील खाण्याच्या सवयीप्रमाणे खाणे सुरू करता येते. पायोरियासारख्या दंतविकारांबाबत या तंत्राचा वापर करून प्रभावित दात काढून नवीन दात बसवता येणे शक्य आहे. कॉर्टिकल इम्प्लांटद्वारे जबड्याच्या कठीण हाडात दात बसवले जात असल्याने ते पारंपरिक दंतरोपणांपेक्षा अधिक काळ टिकतात.

ही आधुनिक पद्धती बऱ्याच अंशी वेदनारहित असल्यामुळे अलीकडील काळात ती चांगलीच लोकप्रिय ठरत आहे. यामध्ये की-होल पद्धतीचा वापर केला जातो. कॉर्टिकल इम्प्लांटस् जबड्याचे हाड रिसॉर्ब झाले असेल तरीही करता येते. अशा प्रकरणांमध्ये पारंपरिक दंतप्रत्यारोपण शक्य होत नाही. त्यामुळे कॉर्टिकल इम्प्लांटस्च्या पर्यायाचा अवलंब करुन दातांशिवाय आयुष्य जगताना येणाऱ्या अडचणींना कायमचा बाय बाय करता येतो. दुधाचे दात जाऊन कायमस्वरुपी म्हणून आलेले दात पडले की पुन्हा येत नाहीत, असे आपण पूर्वापार ऐकत आलो आहोत; पण एकविसाव्या शतकातील नवंतंत्रज्ञानाच्या युगात हा पारंपरिक विचार मागे पडला आहे, असे म्हणावे लागेल.

**- डॉ. प्रीतम साळुंखे**
दंतविकारतज्ज्ञ

## कांस्युगातील कंगव्याचा शोध

दागिन्यांमध्येही अनेक प्रकार पाहायला मिळत असतात. आपल्याकडेही प्राचीन काळापासून डोक्यापासून पायापर्यंतचे अनेक प्रकारचे दागिने प्रचलित आहेत. त्यामध्ये केसांमधील चुडामणीसारख्या दागिन्याचाही समावेश होतो. आता ब्रिटनमध्ये तीन हजार वर्षांपुर्वीच्या अशाच केसांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सोन्याच्या दागिन्याचाही समावेश होतो.

आता ब्रिटनमध्ये तीन हजार वर्षांपूर्वीच्या अशाच केसांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सोन्याच्या दागिन्याचा शोध लागला आहे. वेल्समध्ये पुरातत्त्व संशोधकांनी कांस्ययुगातील दफनभूमितील उत्खननात हा दागिना तसेच ब्रिटनमधील सर्वात जुना ठरलेला लाकडी कंगवाही शोधला आहे.

एका थडग्यात या वस्तू आढळून आल्या. हे थडगे तीन हजार वर्षांपूर्वीच्या एका व्यक्तीचे असून त्याच्या देहाचे अवशेषही याठिकाणी सापडले आहेत.

त्याच्या देहाबरोबर अशा सुंदर आणि अत्यंत दुर्मीळ वस्तूही ठेवण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे लाकडाचा कंगवाही इतक्या वर्षांनंतर एखाद्या कोळशासारखा टिकून राहिलेला दिसून आला. इंग्लंडमधील आर्कियोलॉजिकल फर्म असलेल्या रेड रिव्हर आर्कियोलॉजीचे संचालक डेव्ह गिलबर्ट यांनी सांगितले की या ठिकाणी सापडलेली सर्वात




आकर्षक वस्तू म्हणजे ही सोन्याची कडी.

लाकडी कंगवाही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. त्याला छोटे आठ दात आहेत. सहसा लाकडाच्या किंवा अन्य जैविक पदार्थांच्या वस्तू काळाच्या ओघात मातीत विघटित होऊन जात असतात. या थडग्यातील माणसाचे दहन करण्यात आले होते. त्याच्याबरोबरच या वस्तूही ठेवल्या असल्याने त्यांना आगीची झळ बसलेली असावी. त्याचा परिणाम म्हणून हा कंगवा कोळशासारखा बनून टिकून राहिला असावा, असेही त्यांनी सांगितले.

## चेतासंस्थेतील विकाराचा छडा लागणार

**न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर म्हणजेच चेतासंस्थेशी संबंधित विकाराचा छडा आता एक सामान्य डीएनए चाचणीतूनही लावता येऊ शकेल. आजाराचे निदान करण्यासाठी जीनोम सिक्वेन्सिंगच्या दीर्घ आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियेची गरज राहणार नाही.**



जीनोमिक इंग्लंड आणि क्वीन मेरी युनिव्हर्सिटीमध्ये अनेक वर्षांपासून हनटिंग्टन रोगावर संशोधन केले जात होते. या शोधामध्ये डीएनएच्या नव्या तंत्राची माहिती समजली. आतापर्यंत न्यूरो डिसऑर्डरच्या कारणांना शोधणे अतिशय कठीण बनले होते. याचे कारण म्हणजे अनेक वेळा या आजाराची लक्षणे अनुवंशिक रूपात मिळत नाहीत. त्यामुळे लक्षणे शोधण्यातच अनेक वर्षे जात होती.

मात्र, डीएनए आधारित नव्या संशोधनानुसार आता अशा रोगाचे अचूकपणे निदान होऊ शकेल.

क्वीन मेरी विद्यापीठाचे प्रा. मार्क कॉलफिल्ड यांनी दिलेल्या माहितीनुसार या आजाराचे वेळीच निदान झाल्याने त्यावर चांगले उपचारही होऊ शकतील.

डॉ. एरियाना टुची यांनीही म्हटले आहे की या नव्या शोधानुसार न्यूरो डिसऑर्डरशी संबंधित जीन किंवा जनुकाचा डीएनए ॲल्गोरिदमने छडा लावता येऊ शकतो.

## बिस्किटांना छिद्रे का असतात?

क्रिस्पी, टेस्टी बिस्किटे खाण्यास बहुतेक सर्वांनाच आवडतात. चहाबरोबर ही बिस्किटे आणखी चवदार लागतात. यामुळेच जगभरात बिस्किटांचा बाजार हजारो कोटी रुपयांच्या घरात आहे. बिस्किटे अनेक प्रकारच्या आकारांत आणि डिझाईन्समध्ये असतात. मात्र, या बिस्किटांमध्ये एक गोष्ट समान असते.

ती म्हणजे, बिस्किटात असणारी छिद्रे. बिस्किटांना ही छिद्रे का बनविली जातात, असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का? बहुतेक लोकांना वाटते की, बिस्किटांना आकर्षक बनविण्यासाठी छिद्रे केली असणार. मात्र, हा समज साफ चुकीचा आहे. खरे तर बिस्किटांना असलेल्या छिद्रांना 'डॉकर्स' असे म्हटले जाते. बेकिंगच्या वेळी या छिद्रांतून हवा निघून जाते. या छिद्रांमुळे बिस्कीट जास्त फुगत नाही, अथवा त्याचा आकारही बदलत नाही.



बिस्किटांना आकार कायम राहावा म्हणून मशिनच्या मदतीने समान अंतरावर बिस्किटांवर छिद्रे काढली जातात. यामुळे ते चारीही बाजूने चांगले भाजले जाते. त्यानंतर ते क्रंची आणि क्रिस्पी बनतात. बिस्किटांना छिद्रे बनविण्यास एक शास्त्रीय कारण जबाबदार आहे, ते म्हणजे बिस्कीट तयार करताना त्याच्यातील उष्णता बाहेर काढणे. जर ही उष्णता बाहेर काढली नाही तर बिस्किटे मध्येच तुटू लागतात आणि प्रसंगी त्याचा आकारही बदलतो.



## अनशा पोटी चहा घेताय?

अनेक लोकांची दिवसाची सुरुवात चहानेच होत असते. काही लोकांना तर डोळे उघडताच पलंगावरच 'बेड टी' हवा असतो. ही सवय झोप घालवण्यासाठी मदत करीत असली तरी आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

रिकाम्या पोटी चहा पिल्याने अनेक समस्या निर्माण होऊ शकतात असे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

चहा आणि कॉफीमध्ये नैसर्गिकरीत्याच आम्लियता असते. त्यामुळे रिकाम्या पोटी त्यांचे सेवन केल्याने आम्लाचे मूळ संतुलन बिघडू शकते व त्यामुळे पित्ताचा तसेच अपचनाचा त्रास उद्भवू शकतो. चहामध्ये 'थियोफिलाईन' नावाचाही एक घटक असतो. त्याच्यामुळे निर्जलीकरण होते आणि बद्धकोष्ठतेची समस्या निर्माण होते. तसेच दात न घासताच चहा पिण्याच्या सवयीने जीवाणू तोंडात साखरेचे विघटन करू शकतात व तोंडात आम्लाचा स्तर वाढू शकतो.

त्यामुळे दातांमधील इनॅमलचा र्‍हास होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, सकाळी उठल्यावर सर्वात आधी एक कप कोमट पाण्यात लिंबूचा रस आणि काळ्या मिरीची पूड टाकून पिणे आरोग्यासाठी लाभदायक ठरते. वजन घटवण्यासाठी हा चांगला उपाय आहे तसेच यामुळे रोगप्रतिकारक शक्तीही वाढते.

## सर्वात आनंदी प्राणी!

सर्वात सुखी माणसाचा सदरा शोधण्यात माणसाचे आयुष्य संपून जाऊ शकते. मात्र, काही लोकांच्या चेहऱ्याची रचनाच अशी असते की ते हसत आहेत असे वाटावे! असाच एक प्राणी आहे जो नेहमी हसतमुखच दिसतो. त्याला अनेक लोक 'जगातील सर्वात आनंदी प्राणी' असेही म्हणतात!



या प्राण्याकडे पाहिले की वाटते तो जणू काही हसतच आहे. त्याच्या चेहर्याची रचनाच तशी असल्याने हा भास होत असतो.

मात्र, या हसतमुख प्राण्याकडे अनेक लोक आकर्षित होतात. या प्राण्याचे नाव आहे 'क्वॉका'. पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या दलदलीच्या भागात आणि जंगलांमध्ये हा प्राणी आढळतो. तो उंदरासारखा दिसत असला तरी त्याचा आकार मात्र एखाद्या मांजराइतका मोठा असतो.

हे प्राणी 'मार्सुपियल्स'च्या कुळात येतात. या कुळातील प्राण्यांच्या माद्या आपल्या पोटावरील पिशवीत पिल्लांना ठेवतात. ऑस्ट्रेलियातीलच कांगारू या कुळातील आहेत. क्वॉका प्राणी त्याच्या हसऱ्या चेहऱ्यामुळे पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहेत. अनेक पर्यटक त्यांच्याबरोबर सेल्फीही घेतात. जणू काही हे प्राणी कॅमेऱ्याकडे पाहून हसत आहेत असा भास त्यामधून होतो. रॉटनेस्ट बेटावरही हे प्राणी मोठ्या संख्येने आढळतात.

## संगमाखाली लुप्त नदी



आजपर्यंत खोदाईवेळी गावे, इमारती, मूर्ती अथवा अन्य वस्तू सापडल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मात्र, प्रयागराजमध्ये एक अनोखी घटना उघडकीस आली आहे. येथे नद्यांच्या खाली आणखी एक लुप्त नदी वाहत असल्याचे पुरावे सापडले आहेत. हेलिकॉप्टरच्या मदतीने करण्यात आलेल्या 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक सर्व्हे'दरम्यान ही आश्चर्यकारक बाब उघड झाली आहे.

या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी आढळू शकते आणि ते भविष्यात उपयोगी पडू शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. ॲडव्हान्स्ड अर्थ अँड स्पेस सायन्स' नामक जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनातील माहितीनुसार, प्रयागराजमध्ये सध्या असलेल्या गंगा आणि यमुना या नद्यांच्या संगमाखाली एक प्राचीन नदी आढळून आली आहे. हे संशोधन 'सीएसआयआर-एनजीआरआय'च्या शास्त्रज्ञांनी संयुक्तपणे केले आहे. या शास्त्रज्ञांच्या मते, संगमाखालील नदीचा संबंध थेट हिमालयाशी असू शकतो. यामुळे तिसरी नदी ही सरस्वतीही असू शकते. धार्मिक मान्यतेनुसार संगम म्हणजे तीन नद्यांचे मीलन होय. मात्र, प्रयागराजचा विचार केल्यास वैज्ञानिकदृष्ट्या सरस्वती नदी सुकली आहे. यामुळे संगमाखाली तिसरी नदी आढळून येणे, ही एक आश्चर्यकारक घटना आहे.

खरे तर शास्त्रज्ञ पाण्याचा शोध घेण्यासाठी 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक सर्व्हे' करत होते. जेणेकरून जमिनीखालील पाण्याचा शोध लागू शकेल. ज्याचा वापर पिण्यासाठी, शेती व अन्य कारणांसाठी केला जाईल.

यासाठी त्यांनी हेलिकॉप्टरवर 'ड्यूल मोमेंट ट्रांझिट इलेक्ट्रोमॅग्नेटिक' तंत्र बसविले आणि गंगा-यमुनेचे इलेक्ट्रोमॅग्नेटिक मॅपिंग केले.



## शरद पवार : संसदेत तुमचे प्रश्न मांडण्यासाठी सुप्रिया सुळे कमी पडणार नाहीत

# माझा विश्वास मतदारांनी खरा केला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती लोकसभेच्या निवडणूकीची संपूर्ण देशात चर्चा झाली होती. अनेकांनी वेगवेगळे अंदाज व्यक्त केले होते. सुप्रिया सुळे यांचा पराभव होईल, असे खात्रीशीर सांगितले जात होते. पण माझा मतदारांवर विश्वास होता, तो त्यांनी खरा करून दाखवला. यापुढेही संसदेत तुमच्या प्रश्नांची मांडणी करण्यासाठी व ते सोडविण्यासाठी सुप्रिया कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास जेष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुक झाल्यानंतर डोर्लेवाडी (ता. बारामती) येथे महाविकास आघाडीच्या वतीने जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी शरद पवार बोलत होते.


**डोर्लेवाडी (ता.बारामती) :** येथे जनसंवाद कार्यक्रमानिमित्त बोलताना जेष्ठ नेते शरद पवार व उपस्थित मान्यवर

यावेळी बारामती तालुका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष एस. एन जगताप, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतिश खोमणे, सदाशिव सातव, युगेंद्र पवार, सरपंच सुप्रिया सुळे, ग्रामीण विभागाचे पदाधिकारी प्रशांत बोरकर, पोपट मोरे, रुपाली लोणकर, सुभाष निंबाळकर, विठ्ठल करे, दत्ता नवले, सचिन दळवी, ग्रामपंचायत सदस्य सचिन निलाखे, सुनिल म्हेत्रे, राहुल भोपळे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पवार म्हणाले, गेली ५ दशकाहून अधिक वेळा येथील जनतेने मला निवडून दिले आहे. मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री, कृषीमंत्री अशी अनेक पदे सांभाळताना ग्रामीण भागातील जनतेसाठी कृषी, शैक्षणिक, औद्योगिक आदी क्षेत्रात भरीव काम करता आले.

अनेक योजना राबविल्या त्याची दखल इतर राज्यांनी घेतली. निवडणुकीला उभा राहिल्यानंतर ५० वर्षे बारामतीत कधीही मत मागायला आलो नाही व तुम्हीही कधी या म्हणून सांगितले नाही. पण प्रत्येक वेळी तुम्ही मला निवडून दिले. जनतेशी नाळ कायम राहिल्यानेच सुप्रियाचा विजय निश्चित होईल हा विश्वास होता. यावेळी युगेंद्र पवार, सचिन दळवी यांनी मनोगत व्यक्त केले. सोमनाथ गाडे यांनी प्रास्ताविक केले. मनोज काळोखे, जावेद शेख यांनी प्रास्ताविक केले. अक्षय मोरे यांनी आभार मानले.

### ...कारण माझा विश्वास होता: शरद पवार

● लोकसभेच्या निवडणुकीत तुम्ही लोकांनी चांगले काम केले. साऱ्या हिंदुस्थानात परदेशात देखील चर्चा होती की, बारामतीत काय होणार मी दिल्लीला गेलो की लोकं दबक्या आवाजात हळूच विचारायचे ताईंचे कसे होईल, आपले सीट लागेल का, यंदा जरा अवघड दिसते आहे. पण माझी खात्री असायची कारण माझा विश्वास तुमच्यावर साऱ्या जनतेवर आहे. लोकांनी काहीही सांगितले, पण ज्यावेळी मतमोजणी झाली. त्यावेळी साऱ्या हिंदुस्थानला कळाले की, बारामती आणि तालुक्यातील जनता साधीसुधी नाही ती कुठे बटण दाबायचे हे दाखवत नसते.



## शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अरींजय फाऊंडेशनचा ३५० वृक्षारोपणाचा उपक्रम

**राजगुरूनगर :** श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्ताने पर्यावरणाची बांधिलकी जपण्यासाठी अरिंजय फाऊंडेशनच्या माध्यमातून खेड तालुक्यातील विविध गावांमधे ३५० वृक्ष लागवड करण्यात आले. याची तयारी म्हणून एक महिन्या आधीच कोहिनकरवाडी, ढुम्या डोंगर, वाफगाव, जऊळके, सुरकुंडी, शिरोली या गावांमध्ये खड्डे घेण्यात आले होते. शुक्रवारी ( दि. २०) रोजी कोहिनकरवाडी, वाफगाव, जऊळके या ठिकाणी एकूण ३५० वृक्ष लागवड करून श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना अनोखी मानवंदना देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन अरींजय फाउंडेशन काम करत असून पर्यावरण, गरीब कल्याण, रोजगार निर्माण, संस्कृती जतन, महिला सशक्तीकरण विषयात काम करत आहे. या अभियानात मयूर भगत, ओंकार सोनार, सहदेव राजपुरोहित, मयूर गायकवाड आदी सहभाग होते.

## शिक्षण व संशोधन क्षेत्रात

# गुंतवणूक वाढविण्याची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीचे फायदे अधिकाधिक समाज घटकांपर्यंत कसे पोचतील, यासाठी प्रयत्न करायला हवेत. स्टार्टअप्समध्ये भारताने मोठी मजल मारली असली, तरी बौद्धिक संपदेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यात आपण पुरेसे गंभीर नाही. शिक्षण व संशोधन क्षेत्रासाठीची गुंतवणूक आणखी वाढविण्याची गरज आहे, असे मत केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर यांनी व्यक्त केले.

विज्ञान भारतीच्या वतीने लोणी काळभोर येथील एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या प्रांगणातील विश्वशांती स्तूप येथे आयोजित सहाव्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रा. करंदीकर बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, विज्ञान भारतीचे अध्यक्ष डॉ. शेखर मांडे, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी एडीटीचे प्रमुख डॉ. मंगेश कराड आदी उपस्थित होते. यावेळी अधिवेशनाच्या स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, विज्ञान भारतीने सातत्याने समाजात वैज्ञानिक संस्कार रुजवण्याचे कार्य केले आहे. प्राचीन भारतीय परंपरेतील ऋषी हे त्या काळातील संशोधकच होते. आरोग्य, स्थापत्य, वास्तूनिर्माण, प्रशासन, औषधनिर्माण, शल्यचिकित्सा अशा कित्येक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. आधुनिक काळातील भारतानेही अंतराळ संशोधन, क्षेपणास्त्रनिर्मिती, अणुविज्ञान क्षेत्रात प्रगतीची शिखरे गाठली आहेत. विकास, संशोधनाला विवेकाची जोड दिल्यानेच हे शक्य झाले आहे.

डॉ. विजय भटकर यांनी 'पिंडी ते ब्रह्मांडी', या न्यायाने आपल्या आचरणात विज्ञान निष्ठेचा स्वीकार केला, तर आपोआपच तो सार्वत्रिक होईल, असे मत मांडले.

आपली भूमिका ज्ञानमय, विज्ञानमय आहे. सातत्याने विकासाकडे नेणारी अध्यात्म यात्रेची विश्वकल्याणाचा संदेश देत सदैव पुढे जात राहील, असे डॉ. विश्वनाथ कराड यांनी सांगितले.

## अधिवेशन!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** लोणी काळभोर येथील एमआयटी महाविद्यालयात आयोजित विद्यापीठाच्या प्रांगणातील विश्वशांती स्तूप येथे सहावे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. यावेळी मंचांवर उपस्थित असणारे मान्यवर.



## कोंढापुरीच्या आश्रमशाळेच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप

**शिक्रापूर:** कोंढापुरी येथील आशीर्वाद ट्रस्टच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या गुरुकुल वसतीगृह आश्रम शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. गरजू शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात मिळाला आहे. कोंढापुरी येथे आशीर्वाद ट्रस्टच्या माध्यमातून शिवाजी शिंदे यांनी गुरुकुल वसतीगृह स्थापन करत भटक्या जमातीतील मुलांसह निराधार बालकांचा सांभाळ करत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्या शालेय गरजू मुलांना निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेरखान शेख यांच्या संकल्पनेतून वह्या व पेन सह शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी गुरुकुल वसतीगृहाच्या संचालिका सावित्रा शिंदे, शिवाजी शिंदे, निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे संचालक दत्ता कवाद, अर्शलान शेख उपस्थित होते.

## सविंदणे येथे वृद्ध व अपंगाना व्हिलचेअर, वॉकर, स्टिकचे वाटप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** सविंदणे (ता. शिरूर) येथे ग्रामपंचायतच्या प्रयत्नांतून व हेल्प इज इंडिया या संस्थेच्या वतीने गावातील वृध्द, अपंग अशा ४० व्यक्तींना व्हीलचेअर, वॉकर व स्टिकचे (काठ्या) वाटप करण्यात आले. यावेळी गावच्या सरपंच शुभांगी पडवळ यांच्या पुढाकाराने यापूर्वी हेल्प इज इंडिया संस्थेच्या वतीने ४५ वृद्धांचे मोफत मोतीबिंदू ऑपरेशन करण्यात आले होते. या संस्थेचे गावांसाठी कायम मोलाचे सहकार्य लाभले आहे.

यापुढील काळात गरजूंना सहकार्य करण्यात येइल, असे संस्थेच्या वतीने विवेक कुलकर्णी यांनी सांगितले. ज्या वृध्द व अपंग यांना चालता येत नाही. अशा नागरिकांना घरोघरी जाऊन वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी वृध्द महीला व पुरूष रांघटनेचे सभासद उपस्थित होते. यावेळी सरपंच शुभांगी पडवळ, उपसरपंच नंदा पुंडे, माजी सरपंच सोनाली खैरे, भोलेनाथ पडवळ, भाऊसाहेब लंघे, मनीषा नरवडे, ईश्वर पडवळ, गोरक्ष लंघे, रवि पडवळ, डॉ. अश्विनी कदम, सावकार लंघे, पोपट शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र पुणे संचलित न्यू इंग्लिश स्कूल, लाखनगाव (ता. आंबेगाव) विद्यालयात ट्रेसेबल गिविंग फाऊंडेशन, हॉगकॉग-चीन यांच्या वतीने बुक्स फॉर चेंज या योजनेअंतर्गत नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरण मुख्याध्यापक अनिल देसले यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर फाऊंडेशनच्या वतीने मागील वर्षी देखील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली होती. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक देण्याची योजना आणणारे ट्रेसेबल गिविंग फाऊंडेशनचे नरेशजी सुराणा आणि टिजीएफ सर्व टीमचे विद्यालयाच्या, विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या वतीने मुख्याध्यापक अनिल देसले यांनी विशेष आभार व्यक्त केले. शिकारे यांनी केले.

## पाटीच्या कारणावरून दोन गटात हाणामारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या शाळेच्या संरक्षण भिंतीला माजी सरपंचांच्या नावाची पाटी लावण्याच्या कारणातून दोन गटात वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना वाघाळे ता. शिरूर येथे घडली. याप्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीसांनी दोन्ही गटांच्या १४ जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल केले असल्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले.

वाघाळे (ता. शिरुर) येथे २० वर्षांपूर्वी सोनबा लहानू थोरात हे वाघाळे गावचे सरपंच होते. ते मयत झाल्यावर त्यांच्या नावाची पाटी गावातील रयत शिक्षण संस्थेच्या संरक्षण भिंतीच्या आतमध्ये लावलेली होती.

सध्या भिंतीची उंची वाढली असल्याने सोनबा थोरात यांचा मुलगा अशोक यांनी नवीन मार्बल पाटी बनवून आणली व ती पाटी शाळेच्या भिंतीच्या बाहेर लावली होती. त्यांनतर गावातील राजेंद्र भोसले यांनी दिवंगत माजी सरपंच सोनबा थोरात यांच्या कुटुंबियांना पाटीबाबत चर्चा करण्यासाठी चौकात बोलावले.

त्यावेळी अशोक थोरात व राजेंद्र भोसले कुटुंबियांत वाद होऊन लोखंडी गज, लाकडी काठी व दगडाने हाणामारी झाली. याबाबत संगिता अशोक थोरात (वय ५५) व शालन साहेबराव भोसले (वय ५५ दोघी रा. वाघाळे ता. शिरुर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनला एकमेकांच्या विरोधात फिर्याद दिली आहे.


### REPLY TO CAUTION NOTICE

Reply to Caution Notice published in Daily Prabhat Newspaper dated 24/01/2024 is hereby given at large that **"MR. MOHAN ROBERT ABHANE"** residing at Pune- Seventh day Adventists Mission Compound, Post Box-1417, Salisbury Park, Pune- 411037 Maharashtra is the **legal owner and having right, title and interest in "Flat No 1, Building No 1 of Vardhaman Co-Operative Housing Society Limited, Prakash Colony, Plot No-470, Gultekadi, Pune-411037" (the said Flat) as per "REGISTERED WILL" of Late "Mr. Robert Alexander Abhane"** which was duly registered at Haveli No. 2, Pune having Serial No. 7071/1982 on 12/11/1982. **My client Mr. Mohan Robert Abhane has obtained "PROBATE"** in his favour by filling Probate Application bearing Misc. Application No. 380/2008 before the Hon'ble Civil Court Senior Division, Pune against Junita Vishwamitra Abhane and others. **The Hon'ble Court was pleased to allow the said application on 23/09/2010 in favour of my client Mr. Mohan Robert Abhane and since then my client Mr. Mohan Robert Abhane and his two sons Mr. Ratnadeep Mohan Abhane and Mr. Amardeep Mohan Abhane became the absolute owners of the said flat.** My client had applied to get the membership of the said flat to the Vardhaman Co-Operative Housing Society Limited (the said Society). The said **Society** has issued the **"Certificate of Membership dated 28/10/1994 to my client Mr. Mohan Robert Abhane and accordingly allotted my client five shares of Rs. 50/- each bearing No. 1 to 5 having corresponding Share Certificate No. 0001 dated 31/08/2008" and the other documents like Pune Municipal Corporation Property Tax Bill (Account NO. F/3/12/00964000), Maintenance and Sinking Fund Receipt are issued in the name of my client Mr. Mohan Robert Abhane.**

**Your client Mr. Rajdeep Vishwamitra Abhane** is illegally seized and possessed as well as without having any right, title and interest (As Trespassers) in the said Flat or any part of it staying with his family members. Therefore, the public at large is hereby cautioned not to deal with the said person/s in respect of the said Flat without the written consent of **my client "Mr. Mohan Robert Abhane and his two sons Mr. Ratnadeep Mohan Abhane and Mr. Amardeep Mohan Abhane" (Registered Owners of the "Flat No 1, Building No 1 of Vardhaman Co-Operative Housing Society Limited, Prakash Colony, Plot No-470, Gultekadi, Pune-411037)** failing which my client shall be constrained to proceed with legal action against the person/s indulge in any kind of illegal activities in respect of the said Flat.

Date: 22/06/2024
Place: Pune

**Adv. Sachin Mangal Maruti Gaikwad**
**Office No:** 7, Ground Floor, Hill View Plaza Housing Society, 22/1A,
Near Siddhi Hospital, Balaji Nagar
Dhankawadi, Pune-411043.
9922071703/9765005390


## मतदान अधिकारी घरोघरी जाऊन करणार सर्वेक्षण

**पुणे :** राज्याच्या विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत असून, त्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार यादीचे अद्ययावत करण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहेत.

त्यानुसार २५ जून ते २४ जुलै या महिन्यात केंद्रस्तरीय मतदान अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करणार आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनानेदेखील मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी पावले उचलली आहे. याच महिनाभराच्या काळात नवीन मतदारांची नोंदणी तसेच दुबार मतदार वगळणे, पत्त्यात तसेच नावांमध्ये दुरुस्ती आदी उपक्रम राबविले जाणार आहेत. तर २५ जुलै रोजी तात्पुरती, तर अंतिम मतदारयादी २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे.

## तहसीलदार ज्योती देवरे यांच्याकडून दगड खाणींची ड्रोनद्वारे

# खाण व्यावसायिकांना महसूल विभागाचा दणका!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली:** पुणे जिल्ह्याच्या पूर्व पट्ट्यातील वाघोली नजीकच्या लोणीकंद तसेच भावडी या दोन गावांमधील खाण उद्योजकांचा वाढता धुमाकूळ, शासनाची फसवणूक होत असल्याने पंधरा दिवसापासून गौण खनिज दगड खाणींची मोजणी सुरू केल्याची माहिती गौन खनिज तहसीलदार ज्योती देवरे यांनी माध्यामांना दिली.



लोणीकंद व भावडी या दोन्ही गावांच्या परिसरामध्ये अनेकांचे दगड क्रेशर खाणींचे उद्योग आहेत, काही खाणींचा परवाना २२ जानेवारी २०२४ रोजी संपलेला असून कित्येक व्यावसायिक विनापरवाना चोरून खाण चालवत असल्याचा प्रकार उघड झाला आहे, त्याचप्रमाणे पूर्वीच्या परवानगी मध्ये अनेकांनी शासनाला भरलेल्या रॉयल्टीच्या कितीतरी अधिक पटीने उत्खनन केल्याचा प्रकार घडला असल्याने या बाबी शासनाच्या लक्षात आले आहेत.

शासनाच्या डोळ्यात माती टाकत तसेच शासनाची झालेली फसवणूक याला वाचा फोडण्यासाठी पुणे जिल्ह्याच्या कारवाई मध्ये धडाकेबाज म्हणून ओळख असणाऱ्या गौण खनिज तहसीलदार ज्योती देवरे यांनी बेधडकपणे, खाण उद्योगांमध्ये झालेल्या उत्खननाची ड्रोन द्वारे पंधरा दिवसापासून मोजणी चालू केल्याने, खाण उद्योजकांचे धाबे दणाणले आहेत, तहसीलदार देवरे यांचे खाण उद्योगाच्या ठिकाणी आगमन होताच लबाड खाण उद्योजक, वाहतूकदार यांची पळापळ झाली, काही मिनिटातच वाहतूक करणाऱ्या गाड्या पूर्णपणे बंद झाल्याचे चित्र दिसून आले पंधरा दिवसापासून लोणीकंद, भावडी, पुरंधर, शिरूर, मावळ, नऱ्हे आंबेगाव, फुरसुंगीसह पुणे परिसरात जवळपास ऐंशी ते नव्वद विनापरवाना गौन खनिज वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की,माझा मुलगा चैतन्य ज्ञानदेव चव्हाण यांचे दिनांक ८ जानेवारी २०२४ रोजी अपघाती निधन झाले आहे. त्यांचे नावे प्रा.प.कार्यालय, पुणे येथे बजाज पल्सर मोटर सायकल क्रमांक एम.एच.-१२,डब्लू सी-४६७१ ,परवाना क्रमांक एम.एच-१२२०२१००५२४९९ नोंद आहे. त्यांचे पश्चात वारसदार म्हणून मी त्यांचा वडील श्री.ज्ञानदेव दत्तू चव्हाण असे कळवितो की,उपरोक्त वाहन व परवाना माझे नावे करण्याकरिता अर्ज दिला असून सोबत कुणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे. सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,ज्या कोणाची तक्रार अथवा हरकत असल्यास त्यासंबंधीत व्यक्तीने प्रा.प.कार्यालय,पुणे येथे १५ दिवसांचे आत समक्ष अथवा लेखी कळवावे, अन्यथा याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाहन व परवाना माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

दि.२३/०६/२०२४

कळावे

वडील - श्री.ज्ञानदेव दत्तू चव्हाण, श्रीराम पंचमी,बिल्डींग नं.१, फ्लॅट नं.२, पाषाणमळा, शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे


'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

SUNDAY EDGE
23•06•2024
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar

# ओढ वारीची, ओढ विठ्ठल भेटीची..





## चला वारीला...

विठ्ठल वळसे पाटील
राष्ट्रसंचार

**पंढरीसी जा रे आल्यानो संसारा ।**
**दीनाचा सोयरा पांडुरंग ॥१॥**
**वाट पाहे उभा भेटीची आवडी ।**
**कृपाळू तांतडी उतावीळ ॥२॥**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरीचा पांडुरंग होय. या दैवताची आषाढी एकादशीला पंढरपूरची यात्रा असते. पंढरपूर वारी म्हटल की महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र राज्यातून विठ्ठल नामाचा गजर करत ही प्रबोधन व धार्मिक, सांस्कृतिक परंपरा आज आठशे वर्षांपासून अविरत चालू आहे. वारी म्हणजे आत्मशुद्धीचे साधन आहे. लाखो भाविक भक्त आषाढ आणि कार्तिक शुद्ध एकादशीला ही वारी पार करतात. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज बरोबर राज्यातील अनेक संतांच्या पादुका पालखीत घेऊन विठ्ठलाला भेटण्यास पंढरपूरला येतात. संत तुकाराम महाराज वरील अभंगातून सांगतात. संसारिक लोकांनी एकदा तरी पंढरीला जावे. दीनांचा सोयरा अर्थात पांडुरंग भेटीसाठी आतूर असतो. भक्तांची तो वाट पाहत असतो. कृपाळू असल्याने त्याची भेट होते. त्याचे मनापासून दर्शन झाले की आपल्या मागचे संचित, कष्ट नाहीसे होतात. म्हणून पांडुरंग भेटीची ओढ वैष्णवांना लागली आहे.

जून महिन्यात संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांचे अनुक्रमे जेष्ठ कृष्ण पक्षे ७ व ८ अर्थात जून २८ व २९ रोजी पालखी प्रस्थान होत आहे. त्या निमित्त गावोगावी पालखी मागे चालणाऱ्या अनेक दिंड्यांची तयारी सुरु आहे. निघण्यापासून पासून ते परत वारी पर्यंते मुक्कामाचे ठिकाण, राहण्याची व जेवणाची सोय, सोबत तंबू तसेच वाहतूकीसाठी गाडीची सोय आदी गोष्टींची आवराआवर चालू आहे. ध्वज अर्थात पताका तयार करणे पालखीसाठी बैलजोडी, रथाची तयारी, दिंडीतील विणेकरी, चोपदार, मृदुंग, अनेक टाळकरी, पताकावाले, तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला, पाण्याचा हंडा घेतलेले व सोबत चालणारे वैष्णव यांचा मेळ घालून पंढरीचा मेळा पाहण्यासाठी तयारी होत आली असून यात कधी भेट होईल अशी भोळ्या भक्तांना ओढ लागली आहे.



**जाता पंढरीसी सुख वाटे जीवा।**
**आनंदे केशवा भेटताचि।।**

संत सेना महाराज आपल्या अभंगातून पंढरीच्या सुखाचा महिमा वर्णन करतात. पंढरपूरला गेल्यावर जिवाला वेगळेच सुख लाभते. भेटल्यावर जो आनंद होतो अश्या सुखाला त्रिभुवनात उपमा नाही. सर्व तीर्था पंढरपूरचे महात्म्य वेगळेच आहे. विठ्ठल नामाचा गजर, दिंड्या पताका यांनी पंढरपूर नागरी दुमदुमते. असे सेवक अर्थात वैष्णव विश्वात कुठेही आढळणार नाहीत चंद्रभागा नदी व भक्त पुंडलिक या समान साऱ्या त्रिलोकात काहीही नाही. वेणुनाद व रानात बालगोपालांनी केलेला काला अमृताहूनही गोड आहे. याला दुसरी उपमा नाही. कमरेवर हात ठेवून उभा असलेला विठ्ठल आणि त्याचा निर्धार इतरत्र नाही. विठ्ठलाच्या सहवासात जी विश्रांती मिळते. ती इतर कुठेही नाही.

वैष्णवांचा मेळा म्हणजे पंढरपुरची वारी या वारीत वारकरी संगे म्हणजे वैष्णवां बरोबर



**वैष्णवां संगती सुख वाटे जीवा ।**
**आणिक मी देवा कांही नेणे ॥१॥**
**गाये नाचे उदे आपुलिया छंदे ।**
**मनाच्या आनंदे आवडीनें ॥२॥**

पांडुरंगाच्या भेटीस जाताना मनाला जे सुख लाभते ते इतर कशात नाही या अभांगातून आणि वारीच्या भक्ती सागरातून समजते. मृग नक्षत्रात वरुण राज्याची कृपा झाली की शेतकरी लगबगीने आपली शेती मशागत उरकून घेतो. आषाढाच्या सरींनी वारीच्या सुरुवातीस धरणी हिरवा शालू पांघरून नटलेली असते. बीज अंकुरास आलेले असते. अश्या सुखमय वातावरणात पांडुरंगाच्या भेटीची आस भक्तांना लागलेली असते

**रुप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी ॥१॥**
**तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा ॥२॥**
**बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठलीं आवडी ॥३॥**
**सर्व सुखाचे आगर। बापरखुमादेविवर ॥४॥**

संत ज्ञानेश्वर पांडुरंग भेटीचे वर्णन करतात. या परमात्म्याच्या दर्शनाने सुखाचा लाभ झाला. विठ्ठल अर्थात माधव आहेच तसा सुदंर सर्व सुखाचे आगरच आहे. माझा गतजन्माच्या सकृतामुळे तो देव विठ्ठल मला आवडायला लागला. मतात पित्यामुळे तो मला प्राप्त झाला असे माऊली म्हणतात. हृदयातील प्रेम असले की भेट होते. आणि रूप पाहून सुखाची प्राप्ती होतेच. अशीच ओढ ही वैष्णवाला लागते तो विठ्ठल नामाबरोबर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम भक्त पुंडलिकाचे नामस्मरण करतो. कारण संतांनीच देव भेटीचा मार्ग दाखवला



आहे. सतत मुखात विठ्ठलाचे नाम असावे म्हणून तो आपले देहभान विसरुन भक्तीरसात गुंतून जातो.

**माझे माहेर पंढरी ।**
**आहे भीवरेच्या तीरीं ॥१॥**
**बाप आणि आई ।**
**माझी विठ्ठल रखुमाई ॥२॥**

एकनाथ महाराज आपल्या अभंगातून पंढरपूर हे समस्त वारकऱ्यांचे माहेर घर आहे असा उल्लेख करतात. कारण एखाद्या माहेरवाशीणला जशी माहेरची ओढ लागते तशीच वारकऱ्यांना लागते. पंढरपूर केवळ तीर्थक्षेत्र नाही तर ते भक्तांसाठी हक्काचे घर आहे. चंद्रभागेच्या स्नान करता सर्व पापे भंग पावतात. अश्या माहेरची आठवण वैष्णवांना येणारच !



भाविकांना आषाढी एकादशी हा सोन्याचा दिवस असतो. विश्वरुपी विठ्ठलाचे दर्शन सारखे सुख सोहळा नाही. अश्या हरिला बाह्य अंतरी पहिल्याचा आनंद काही वेगळाच असतो. हाच सुखाचा प्रसाद घेऊन भाविक पुन्हा सुखाने संसार करु लागतो. अश्या सुखाचा सोहळा पाहण्यासाठी अनुभवण्यासाठी पंढरपूर यात्रेची ओढ लागली असेल तर ती ओढ विठ्ठल पूर्ण करतोच.

# सिडबॉल खरंच उपयुक्त ?

## पर्यावरण

शेखर गायकवाड
आपलं पर्यावरण संस्था, नाशिक
राष्ट्रसंचार



पावसाळा आला की सीड बॉल तयार करून प्रवासामध्ये जाताना इतरत्र फेका .... अशी एक टूम काही वर्षांपसून व्हाट्सअप युनिव्हर्सिटीमध्ये दिसून येते.

सध्या तापमान वाढीमुळे व धरणात पाणी कमी झाल्यामुळे, लोक निसर्गाप्रती सहजक झालेत. त्यात ९० टक्के लोकांनी बसल्या बसल्या फक्त व्हाट्सअप वर आलेले निसर्ग वाढीचे संदेश न समजून घेता पुढे पाठवण्यामध्येच धन्यता मानून व आपली मर्यादा व मानसिकता दाखवून दिली. केनियामध्ये बघा कसे सिड बॉल फेकून काय किमया केली, कापुराचे एक झाड( जे एका नर्सरी वाल्याने स्वतःची मार्केटिंग करण्यासाठी केलेला कापुराबाबत चुकीची माहिती व आपल्य जैवविविधतासाठी घातक असलेला चुकीचा संदेश) बघा किती किलोमीटरपर्यंत वातावरण शुद्धीकरण करते, चीनमध्ये बघा वाळवंटात झाडे लावत आहेत (वाळवंट पण हा पृथ्वीतलावरचा एक महत्त्वाचा भाग आहे) आणि मजेशीर गोष्ट म्हणजे बाभळीच्या झाडाजवळ बी लावा आणि झाडे जगवा, तर कुठल्या गावात हजारोच्या संख्येने नुसते एकसुरी पिंपळ किंवा निम लावलेल्याचा व्हिडिओ किंवा माहिती फिरत असते. अहो पण या सर्वांचा नीट आपण अभ्यास केला आहे का ? ह्याच्या परिणाम व दुष्परिणाम विषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला का ? नाही. फक्त आपण कुठलाही विचार न करता आलेला संदेश पुढे पाठवून पर्यावरणाचा खूप मोठे काम केल्याचा अर्विभाव करून मोकळे होतो. पण हे जे नेहमी साधारण तीन-चार वर्षांपासून संदेश फिरत आहेत त्यात किती तथ्य आणि उपयुक्तता आहे याचा कुठे विचार केलेला दिसत नाही.

सिडबॉलने जर जंगल तयार होऊ लागली तर मग कशाला आपल्याला एवढे कष्ट करावे लागले असते, आणि निसर्गाची एवढी काळजी करण्याची पण गरज राहिली नसती.

दुसरं उदाहरण असं बाबळीच्या वाढलेल्या झाडाखाली किंवा झुडपात बिया टोचण्याची काय गरज. बाबळीच झाडच मुळी आपल्या पर्यावरणीय ( वेडी बाभूळ आणि सुबाभूळ सोडून) दृष्ट्या महत्त्वाचे आहेच. म्हणजे मला जंगल तयार करायचं तर आधी बाबळीने आच्छादलेलं रान बघायची गरज भासेल व ते सापडल्यानंतर त्या बाभळीच्या झाडाखाली बिया टोचाव्या लागतील हा साधा विचार केला तरी नेमकं हे काय आहे हे लक्षात येत.

आज आपण न समजता जे काही असले प्रयोगाचे संदेश पाठवण्यास मश्गुल आहोत. त्यामुळे बऱ्याच गोष्टींवर त्याचा दुष्परिणाम होत आहे. बर सिडबॉल करताना कुठलाही विचार न करता ठराविक वृक्षांच्या बियांचा वापर केला जातो आणि वाटेल तिकडे जाऊन फेकून येतो त्यामुळे होत आहे काय तर तेथील स्थानिक जैवविविधता धोक्यात येते. प्रत्येक ठिकाणची एक प्रदेशनिष्ठ जैवविविधता असते ते विचारात घेऊनच आपल्याला काम करण्याची गरज आहे. त्या ठिकाणच्या प्रदेशनिष्ठ वृक्षांची माहिती करून घेऊन, त्या वृक्ष प्रजातींच्या बिया गोळा करून आपल्याला त्याचे सीडबॉल बनवून फेकले तर थोडाफार उपयोग होऊ शकतो. पण सध्याच्या वातावरणाचा विचार करता सीडबॉलच्या बाबतीत आपल्याला पुढील गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे. आता आपण फेकलेले सिडबॉल मधून काही बिया अंकुरतात व रोपे दिसू लागतात बरेच ठिकाणी ही रोपे गवतात किंवा पावसाळी वेलीं मध्ये झाकोळली जातात, दुसरं महत्त्वाचं असं त्या भागाला संरक्षण नसेल तर चराईमुळे गुरं खातात, थोडीफार टिकली तर ऑक्टोबर हिट मुळे मरतात, हा टप्पा ओलांडल्यास, पुढे गवत वाळल्यामुळे लागणाऱ्या वनव्यापासून त्यांना धोका असतो. या संकटातून सुटल्या नंतर जे काही सध्या एप्रिल मे महिन्यात भयंकर तापमान असल्या कारणाने व जमिनीतील जलस्तर पातळी खालवल्यामुळे ही रोप मरतात. गेल्या काही वर्षांपासून पावसाचे प्रमाण तर पूर्वीपेक्षा कमी झालेच आहे. पूर्वी ज्या पद्धतीने पाऊस पडत होता आता त्याची पडण्याची पध्दत पण बदलली आहे. येतो तर अर्धा एक तासात धो धो पडून वाहून



जातो. पूर्वी पाऊस आठ-आठ पंधरा-पंधरा दिवस पावसाच्या सतत सरी पडत असायच्या, त्याला आपण भिज पाऊस म्हणत असू. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत चांगल्याप्रकारे मुरत राहायचं, वाहून जात नव्हत, व जमिनीचा जलस्तर वाढण्यास मदत होते होती. त्यामुळे बिया फेकून अंकुरलेला रोपाला जमिनीतून उन्हाळ्यात पण पोषक वातावरण मिळत असे. ते सध्याच्या वातावरण बदलामुळे मिळत नाही. त्यामुळे सीडबॉल फेकून जो काही आपण निसर्गाप्रती काम केल्याचा उपक्रम दाखवून मोकळे होतोय हे आपण स्वतःलाच फसवतोय तर निसर्गाची काय बात.

**• सांगायचे एवढंच आहे की खरंच निसर्ग वाढीसाठी आपल्याला दुरदृष्टी ठेवून काम करायचं असेल तर शाश्वत कृतीशील काम करण्यासाठी सज्ज व्हा आणि रोजच्या आपल्या दैनंदिन व्यवहारातून आठवड्यातून एकदा थोडा वेळ काढून निसर्ग संवर्धनाच्या शाश्वत कामाला लागा. योग्य ठिकाणी योग्य वृक्षांची लागवड करुन ते तीन वर्ष जोपासा.**



# पद, पैसा, प्रतिष्ठा आणि शाश्वत दृष्टीकोन

**पद, पैसा आणि प्रतिष्ठा मधून मिळवलेली अल्पकालीन समृद्धी ही पर्यावरण व त्याच्या आरोग्याला कमी लेखणारी समृद्धी व शेवटी मृगजळ एक आहे. जर तसे नसेल तर श्वास न घेता पैसा मोजून बघा, माती व पाण्याशिवाय जीवसृष्टीची व तुमच्या पदाची किंवा प्रतिष्ठेची कल्पना करून बघा. शक्य नाही ना...., त्यासाठी शाश्वत पद्धतीचा अवलंब करून आपण स्वतःचे व समाजाचे आर्थिक व आरोग्याचे येऊ घातलेले धोके कमी करू शकतो. सावर्जनिक व वैयक्तिक प्रगती ही शाश्वत क्रिया आणि शाश्वत संवर्धन जिन्याच्या पायऱ्या चढूनच येऊ शकते व खरी समृद्धी नियमित शाश्वततेद्वारेच साध्य होऊ शकते हे अधिकाधिक स्पष्ट होते.**






आजच्या दैनंदिन आव्हानांमध्ये आरोग्य समस्या, वैद्यकीय खर्च, होत असलेला जलस्रोतांचा ऱ्हास, वायु प्रदूषण, आणि मातीचे प्रदूषण. ह्या बाबी शाश्वत विकासाची व शाश्वत दृष्टीकोनाची तातडीची गरज अधोरेखित करीत आहेत. येणाऱ्या पिढ्यांसाठी एक समृद्ध व सुनिश्चित भविष्य साकारण्याचा मार्ग आज आपल्या रोजच्या जगण्याच्या व शाश्वत दृष्टीकोनाच्या वचनबद्धतेत आणि त्याच्या पूर्ततेत आहे. अधिक सातत्यपूर्ण शाश्वत भविष्याला समर्थन देणारी व निर्णय घेण्याची शक्ती आपल्या सर्वांकडे आहे. चला शाश्वत विकास व शाश्वत दृष्टीकोन हा केवळ एक पर्याय नाही तर खऱ्या समृद्धीसाठी अति आवश्यक घटक म्हणून स्वीकारूया. ज्यामुळे आपण वैद्यकीय खर्च कमी करून एक चांगले आयुष्य जगू शकू आणि आपल्या नैसर्गिक संसाधनांची दीर्घायुष्य सुनिश्चित करू शकू.

शाश्वत विकास हा शाश्वतता साधण्यासाठीचा चौकट आहे. यामध्ये पर्यावरणीयदृष्ट्या स्थिर, आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आणि सामाजिकदृष्ट्या न्याय असे विकास साधण्यासाठी विविध धोरणे आणि पद्धतींचा समावेश होतो. युनाइटेड नेशन्स ब्रन्डटलँड कमिशन १९८७ च्या अहवालामध्ये दिलेली शाश्वत विकासाची व्याख्या सर्वात जास्त मान्यता पावली आहे, ज्यात शाश्वत विकास म्हणजे असा विकास की, "जो विकास वर्तमानातील गरजा पूर्ण करतो, पण भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा आणत नाही."

### शाश्वत विकासाचे मुख्य तत्त्वे:

१. पर्यावरण संरक्षण: नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे, प्रदूषण कमी करणे आणि जैवविविधतेचे संवर्धन करणे, जेणेकरून पृथ्वी स्वस्थ राहील आणि त्यावरील जीवन टिकवू शकेल.

२. आर्थिक व्यवहार्यता: रोजगार निर्माण करणारी, दारिद्र्य कमी करणारी आणि जीवनाची गुणवत्ता सुधारणारी, आर्थिक वाढ आणि विकास प्रोत्साहित करणे, तसेच पर्यावरणाचे आरोग्य राखणे.

३. सामाजिक समता: संसाधन, संधी आणि लाभांचा सर्व लोकांना, त्यांच्या पार्श्वभूमी किंवा परिस्थिती विचारात न घेता, न्याय्य प्रवेश सुनिश्चित करणे आणि सामाजिक न्याय आणि समावेशिता प्रोत्साहित करणे.

४. पिढ्यानपिढ्यांची जबाबदारी: आजच्या क्रियाकलापांचा भविष्यातील पिढ्यांवर होणारा परिणाम ओळखणे आणि त्यांच्यासाठी स्वस्थ, स्थिर आणि समृद्ध जग तयार ठेवणे.


या वरून असे लक्ष्यात येते की, सतत टिकून राहण्याची क्षमता म्हणजे शाश्वतता. याचा अर्थ वर्तमानातील गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न आणणे. ही संकल्पना पर्यावरणीय संदर्भात अधिक लागू होते, ज्यामध्ये आर्थिक वाढ, पर्यावरणाचे आरोग्य आणि सामाजिक कल्याण यांचा संतुलन राखण्याचे महत्व अधोरिखित केले गेले आहे.

जलसंकट जे अशाश्वत पद्धतींमुळे वाढले आहे. भूजलाचा अतिउपसा, अकार्यक्षम सिंचन तंत्रे आणि ताज्या जल स्रोतांचे प्रदूषण या जलस्रोतांचा वेगाने ऱ्हास करत आहे. संयुक्त राष्ट्राने अंदाज वर्तवला आहे की २०३० पर्यंत १.८ अब्ज लोक जलसंकटाच्या क्षेत्रांमध्ये राहतील आणि जगाच्या दोन तृतीयांश लोकसंख्या जलताणाच्या परिस्थितीत असेल. जलसंकटाचे परिणाम दूरगामी आहेत यामध्ये शेती जी, पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे, येत्या काळात तिला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. ज्यामुळे अन्नसुरक्षा कमी होऊन त्याच्या किंमती वाढण्यास कारणीभूत ठरू शकते. याव्यतिरिक्त, जलसंकटामुळे संघर्ष आणि विस्थापन वाढू शकते, विशेषतः आधीच असुरक्षित प्रदेशांमध्ये. अस्थिर कृषी पद्धती, औद्योगिक प्रदूषण, आणि हवामान बदल आज उपलब्ध असलेल्या जलस्रोतांची संख्या कमी करण्यात अधिकच हातभार लावत आहेत. काही भागात, भूजलाचा अति उपसा विहिरी आटण्यास कारणीभूत ठरत आहे. ज्यामुळे समुदायांना लांबच्या आणि बहुतेकदा दूषित जल स्त्रोतांवर अवलंबून रहावे लागते. शाश्वत जल पद्धतींची अंमलबजावणी करणे ही ह्या घटकेटीची हाक आहे. यामध्ये पावसाचे पाणी साठवणे व जिरवणे, कार्यक्षम सिंचन तंत्रज्ञान, नियंत्रित उपसा पद्धती, ठिंबक सिंचन, मायक्रो इरिगेशन, माती विरहित शेती, हैड्रोफोनिकस इत्यादी पद्धतींचा वैध्यानिक व शाश्वत दृष्टीकोनातून उपयोग करून तसेच प्रदूषण कमी करून हवामान बदलाच्या प्रवृत्तीला उलटवणे अत्यावश्यक आहे.

### पर्यावरणीय ऱ्हासाच्या मूळ कारणांवर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे

खराब हवेची गुणवत्ता एक शांत परंतु व्यापक धोका आहे. नागरीकरण आणि औद्योगिक क्रियाकलापांमुळे नायट्रोजन डायऑक्साइड (NOx), सल्फर डायऑक्साइड (SOx), आणि कण पदार्थ यांसारख्या हानिकारक प्रदूषकांचे उत्सर्जन वाढले आहे. अक्षय ऊर्जा स्रोतांकडे संक्रमण करणे, सार्वजनिक वाहतूक सुधारणे, आणि कठोर उत्सर्जन नियमांची अंमलबजावणी करणे हे वायुप्रदूषण सुधारण्यासाठी आणि आरोग्यदायी वातावरण सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक पावले आहेत. सावर्जनिक व वैयत्तिक समृद्धी आणि शाश्वतता परस्परविरोधी नाहीत तर एकमेकांशी जोडलेले आहेत. पर्यावरणीय ऱ्हासाच्या मूळ कारणांवर लक्ष केंद्रीत करून आणि शाश्वततेला प्राधान्य देऊन, आपण आपल्यासाठी व सर्वांसाठी एक निरोगी, अधिक समृद्ध भविष्य निर्माण करू शकतो. अशा समग्र दृष्टिकोनाद्वारेच आपण भावी पिढ्यांसाठी एक संपन्न ग्रह सोडण्याची आशा व प्रयत्न करू शकतो.

# सिंहगड किल्ला शौर्याचे प्रतीक



**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे गड किल्ले म्हणजे शिवमंदिरचं! श्रावणाच्या सरीत या किल्ल्यांचा अभिषेक चालू असतांना आपण तिथे श्रद्धेने जाणे अपेक्षित असताना त्या ठिकाणी आपण काय करतो याचं भान आजच्या तरुणांना राहिलेले नाही हे लाजिरवाणी बाब आहे.**



ऐतिहासिक
सचिन तळे
राष्ट्रसंचार

पावसाळा लागला की आपले पाय छान अश्या निसर्गमय वास्तू किंवा ठिकाणांकडे वळतात. पावसाळ्याची खरी जादू म्हणजे सर्वत्र पसरलेली हिरवीगार झालर. मनाला प्रसन्न करणारं वातावरण. अश्यावेळी पुण्यात आलेल्या प्रत्येकाचे पाऊल पश्चिम घाटावर असलेल्या शिवकालीन इतिहासाने नटलेल्या शौर्याने गाजलेल्या सिंहगडाकडे वळतात. राजगड, रायगड, शिवनेरी अन त्यांच्या भोवती असणारे लहान मोठे गड किल्ले राजवाडे आपल्याला आकर्षित करतात. या ठिकाणांना आवर्जून भेट दिली पाहिजे. पण लपून छापून प्रेम करण्यासाठी नाही, पर्यटन म्हणून नाही, पिकनिक म्हणून तर मुळीच नाही तर शौर्याचं प्रतीक म्हणून अन इतिहासातील पानांना वाचण्यासाठी या स्थळांना भेट देणे गरजेचं आहे.

जून जुलै महिना उजाडला कि तरुणांना पावसाळ्याची भुरळ पडते. प्लॅन तयार होतात अन् मुलं मुली थेट पोहचतात आपल्या गड किल्ल्यांवर. या किल्ल्यांची सुंदरता खरी पावसाळ्यातच दिसून येते. गडाच्या प्रवेशद्वाराकडे जाणाऱ्या पायऱ्या धुक्यानी तुमचे स्वागत करतात. किल्ल्यांवर मिळणारी कांद्याची भजी अन् पिठलं भाकर साठी गर्दी. अन् जिथे वर्दळ नाही तिथे प्रेमी युगलांची जोडी. अश्लील चाळे करणारी काही मंडळी. काही प्रमाणात जिवंत राहिलेले अवशेष अन् गर्दीच गर्दी. पुरंदर, राजगड, तोरणा, लोहगड, विसापूर, तुंग असा प्रचंड मुलुख या गडावरून शोधणारे नजरा. प्रत्येकाच्या हातात सेल्फी स्टिक अन् कॅमेराचे अँगल. अन् प्लास्टिकच्या बॉटलचा ढिगारा. बस इतकंच हवं बाकी काही नको.

ऐतिहासिक स्थळे अन् स्मारके हे येणाऱ्या प्रत्येक पिढीला संदेश देण्याचे काम अविरतपणे करत असतात. ही स्थळे देशासाठी अनमोल ठेवा असतो. आपल्याला मौजमजा मस्ती अन् सेल्फी काढण्यासाठी या किल्ल्यांची निर्मीती झाली नाही. तर प्रत्येक गड किल्ल्यांची एक वेगळीच गोष्ट आहे. फक्त पाठ्यपुस्तके अन् तानाजी या चित्रपटातून सिंहगडाचा इतिहास न पाहता तो थेट सिंहगडावर जाऊन पाहावा अन तिथे त्या भूमीला त्या मातीला मस्तकी लावून त्या ठिकाणी नतमस्तक व्हावं. येणाऱ्या पिढीला त्या जागेचा इतिहास सांगावा. त्यांना इतिहासाची ओढ निर्माण झाली पाहिजे अश्याप्रकारे त्यांना गडाची माहिती करून द्यावी. गर्दी फक्त पावसाळ्यातच नाही तर ३६५ दिवस गर्दी टिकून राहिली पाहिजे.

### तुम्हाला आकर्षित करणाऱ्या सिंहगडचा इतिहास -

सिंहगड या किल्ल्याचे आधीचे नाव कोंढाणा होते. स्थानिक महादेव कोळी लोकांच्या आख्यायिकेनुसार कौडण्यऋषी यांनी येथे तपश्चर्या केली म्हणून या डोंगराचे नाव कोंढाणा झाले. इ.स. १३६० मध्ये दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलकाने दक्षिण स्वारी नंतर हा किल्ला आदिलशाही राजवटीत होता. शहाजी राजांच्या यांच्या सुटकेसाठी शिवाजी राजांनी हा किल्ला परत आदिलशहाला दिला. मोगलांतर्फे उदेभान राठोड हा कोंढाण्यावरचा अधिकारी होता. छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सरदार आणि बालमित्र तानाजी मालुसरे आणि त्यांच्या मावळ्यांनी हा किल्ला एका चढाई दरम्यान जिंकला. या लढाईत तानाजींना वीरमरण आले आणि प्राणाचे बलीदान देऊन हा किल्ला जिंकल्यामुळे शिवाजी महाराजांनी "गड आला पण सिंह गेला" हे वाक्य उच्चारले . तेव्हापासून या गडाला सिंहगड असे म्हणू लागले अशी आख्यायिका आहे.

### गडावरील ही ऐतिहासिक ठिकाणे आवर्जून पहा-

अमृतेश्वराच्या मागच्या बाजूने वर गेल्यावर डाव्या बाजूस सुप्रसिद्ध सुभेदार तानाजींचे स्मारक दिसते. राजस्थानी पद्धतीची रंगीत देवळासारखी जी घुमटी दिसते तीच छत्रपती राजाराम महाराज यांची समाधी आहे. झुंजारबुरूज हे सिंहगडचे दक्षिण टोक. येथून समोरच टोपीसारखा राजगड, त्याच्याच उजवीकडे तोरणा हे गड दिसतात तर खाली पानशेतचे खोरे दिसते. डोणगिरीचा उर्फ तानाजी कडा येथूनच तानाजी मावळ्यांसह वर चढले होते. गडाच्या पश्चिमेस कल्याण दरवाजा आहे. कोंढणपूरवरून पायथ्याच्या कल्याण गावातून वर आल्यास ह्या दरवाजातून आपला प्रवेश होतो. कोंढाणेश्वराच्या मंदिरावरून थोडे पुढे गेले की डावीकडे हे अमृतेश्वराचे प्राचीन मंदिर लागते. हे मंदिर शंकराचे असून ते यादवांचे कुलदैवत होते. दारूचे कोठार अन् टिळक बंगला.

# वाघोलीचे भाग्यविधाते; विकासाचे कर्ण-शिवदास मनोहर उबाळे

## पुणे जिल्हाध्यक्ष-राष्ट्रवादी ओबीसी सेल तथा मा.सरपंच-वाघोली



वाघोली तसे पूर्ण शहरीकरण झालेले गाव असून या गावाला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे.जवळ असलेले उद्योग नगरे,पुणे,पिंपरी चिंचवड, हडपसर, विमाननगर, चंदननगर, खराडी आय.टी.कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावरील जाळे यामुळे साहजिकच मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्ती ऐवजी वाघोली सारख्या गावात बऱ्याच नागरिकांची जागा, घर, फ्लॅट घेण्यासाठी पसंती असते.

या शहरासारख्या प्रचंड मोठ्या लोकसंख्या असणाऱ्या गावच्या सर्वांगीण विकासासाठी वाघोलीचे माजी सरपंच तथा राष्ट्रवादी ओबीसी सेलचे पुणे जिल्हाध्यक्ष शिवदास मनोहर उबाळे यांनी सर्व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन लक्षवेधक व दिमाखदार प्रगती करीत काम करीत आहेत. प्रसिद्ध शेतकरी व उद्योजक मनोहर बाळोबा उबाळे व यमुनाबाई मनोहर उबाळे यांच्या पोटी एक आदर्शवत रत्न शिवदास उबाळे यांचा जन्म २३ जून १९७२ रोजी झाला. वाघोली गावाला आपले कुटुंब मानून त्यांनी खरी तर समाजकार्याला सुरुवात केली.त्यांच्या गावच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात काम करणारे एक तळमळीचे नेतृत्व,लोकसेवा हीच खरी देवपूजा मानणाऱ्या,गावचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या वाघोली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्ह्याचे नेते शिवदास उबाळे हे आहेत.समाजकारणात राजकारण नाही आणि राजकारण करायचे ते समाजाच्या विकासासाठी व हाच मानवता धर्माच्या सेवेचा वारसा जपणारे एकमेव माजी सरपंच म्हणजे शिवदास उबाळे आहेत.यामध्ये शिवदास उबाळे यांना त्यांच्या पत्नी हवेली तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती तथा वाघोलीच्या माजी आदर्श सरपंच वसुंधरा शिवदास उबाळे यांची खंबीर साथ लाभली आहे.

वाघोलीमध्ये स्वतःची अनेक जमीन देत शिवदास उबाळे व त्यांच्या पत्नी वसुंधरा उबाळे यांनी अनेक शाळा उभ्या केल्या असून त्यांनी महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा आदर्श नक्कीच जपला असून शिवदास उबाळे यांना वाघोलीचे भाग्यविधाते व विकासाचे कर्ण म्हणून त्यांची वाघोली परिसरात ओळख झाली असून त्यांचे असेच सामाजिक आदर्शवत कार्य पुढे चालू रहावेत अशा शुभेच्छा त्यांना नागरिक देत आहेत.

### गावातील रहिवाश्यांसाठी विविध उपक्रम

वाघोली गावातील प्रत्येक नागरिकाला शासनाच्या विविध सेवासुविधा व उपाययोजनांचा फायदा मिळत आहे व जास्तीत जास्त नागरिकांना त्याचा फायदा व्हावा यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करतात.यामध्ये संजय गांधी निराधार योजना,अपंगांसाठी विविध योजना राबवणे त्यांच्या साठी शासनाच्या नियमानुसार सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या हक्काचा निधी त्यांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.गरीब लोकांना अन्नधान्य योजना,घरकुल लाभ,पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या मागासवर्गीय व दुर्बल घटकांसाठी राबवणे व गावातील गरीब व गरजू लोकांना याचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याची प्रयत्न केला आहे.

प्रासंगिक
विजय लोखंडे, वाडेबोल्हाई, वाघोली
राष्ट्रसंचार

### कचरा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न

मोठ्या प्रमाणातील नागरीकरण झाले असल्याने येथील कचरा व्यवस्थापन हा मोठा ज्वलंत प्रश्न आहे.यासाठी प्रत्येक सोसायटी मध्ये कचरा गाडी कचरा गोळा करते पण त्या गाडीवर संताचे अभंग,स्वच्छतेचे महत्व सांगणारी गीते,सुविचार व कचऱ्याचे ओळ व सुका असे वर्गीकरण करण्याबाबतच्या प्रबोधन करण्यात येते. रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा टाकणाऱ्या नागरिकांना सूचना,प्रबोधन ,प्रसंगी कडक समज देण्यात येते.रस्त्याच्या कडेला पडलेला कचरा तात्काळ उचलण्यासाठी कार्यतत्परता असते. तसेच कचरा गोळ्या करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत मोठ्या प्रमाणात काळजी घेण्यात येते.

### पुणे नगर महामार्गावर पथदिवे

वाघोली गावच्या सौंदर्यात व नागरिकांच्या होणाऱ्या अपघातांच्या ज्वलंत विषयावर प्रभावी उपाय म्हणून पुणे नगर महामार्गावर पथदिवे बसवण्यात आले.त्यामुळे नागरिकांच्या रस्ता ओलांडताना होणाऱ्या अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे.पथदिवे बसवल्याने गावच्या सौंदर्यात भर तर पडलीच पण नागरिकांचे जीवन सुरक्षित होण्यासाठी त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

### वाघोली सारख्या मोठ्या लोकसंख्येच्या गावासाठी पाणी पुरवठा

गावच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार त्यांना मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे यासाठी ग्रपांचायातीने दूरदृष्टी दाखवत गावच्या पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्यासाठी भीमा नदीवरून पाण्याची पाईप लाईन आणण्यात आली.गावाला पाण्याची समस्या असेल तर ते गाव विकसीत होण्यासाठी खूप समस्या निर्माण होतात नगरिकिकरण होण्यास अडचणी येतात पण या समस्येवर यशस्वी उपाय म्हणजे भीमा नदीवरील पाणी योजना कार्यान्वित करणे.

# नव्या जागतिक व्यवस्थेचा पाया

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लातिमीर पुतीन यांनी केलेला उत्तर कोरिया दौरा, हा जगाची काळजी वाढवणारा ठरला. या दोन्ही देशांनी सामंजस्य करार केला असून, परस्परांना सहकार्य करण्याची आवश्यकता त्यात विषद करण्यात आली आहे. शीतयुद्धानंतरचा हा सर्वात महत्त्वाचा करार आहे, असे मानले जाते. अमेरिका आणि नाटोची समस्या या कराराने वाढवली आहे.





**आंतरराष्ट्रीय**
संजीव ओक
राष्ट्रसंचार

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीने हे उत्तर कोरिया दौऱ्यावर गेले आणि उत्तर कोरियाचे किम जोंग उन या दोघांची झालेली भेट, ही जगाची काळजी वाढवणारी ठरली. या दोघांनी कारमधून एकत्र प्रवास केलेले छायाचित्र प्रसिद्ध झाले आणि नेटकऱ्यांच्या प्रतिभेला चालना मिळाली. रशिया-उत्तर कोरिया यांच्यातील वाढती जवळीक ही जगभरातील विश्लेषकांना या भेटीच्या संभाव्य परिणामांबद्दल विचार करण्यास भाग पाडत आहे. दोन हुकुमशहा एकत्र आल्याने, चिंता वाढणे हे अत्यंत स्वाभाविक असेच आहे. पुतीन आणि किम जोंग उन यांनी एका करारावर स्वाक्षरी केली. आक्रमण झाले, तर दोन्ही देश परस्परांना मदत करतील, अशा आशयाचा हा करार. त्याचा तपशील अर्थातच जाहीर झाला नसला, तरी हा करार शीतयुद्धानंतरच्या कालावधीतील सर्वात महत्त्वाचा करार ठरला आहे. दोन्ही नेत्यांनी सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक, सांस्कृतिक आणि मानवतावादी संबंधांचा समावेश असलेल्या करारावर स्वाक्षरी करत, संबंध वृद्धिंगत केले आहेत.

पुतीन यांनी गेल्या २४ वर्षांत प्रथमच उत्तर कोरियाचा दौरा केला असून, किम यांचा अण्वस्त्र कार्यक्रम सुरू ठेवण्यासाठी रशियाने मदत करायची आणि त्याबदल्यात उत्तर कोरिया रशियाला आवश्यक ती शस्त्रास्त्रे पुरवणार आहे. उत्तर कोरियाने यापूर्वीच रशियाला शस्त्रास्त्रे पुरवली असल्याचे अमेरिका आणि मित्र राष्ट्रांनी म्हटले आहे. या व्यवस्थेबद्दल अमेरिका आणि मित्रराष्ट्रांनी चिंता व्यक्त केली आहे.

रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यातील संरक्षण करार नवे प्रश्न निर्माण करणारा असला, तरी दोन्ही देशांमधील मैत्री ही जुनी असल्याचे रशियाने म्हटले आहे. या मैत्रीवर शिक्कामोर्तब करण्याचे काम, या कराराने केले असल्याचे रशियाचे म्हणणे आहे. उभय देशांतील संबंधांना नव्या उंचीवर नेण्याच्या सामायिक इच्छेचे प्रतिबिंब म्हणून या कराराकडे पाहता येईल, अशी भावना पुतीन यांनी व्यक्त केली आहे. पूर्वीचे सोव्हिएत युनियन आणि उत्तर कोरिया यांच्यात १९६१ मध्ये एक करार झाला होता, ज्यात उत्तर कोरियावर हल्ला झाल्यास, रशियाने लष्करी हस्तक्षेप करावा, अशी तरतूद करण्यात आली होती. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर हा करार स्वाभाविकपणे रद्द झाला.

२००० मध्ये रशियाने उत्तर कोरियाला सुरक्षा आश्वासने दिली होती. मात्र, आता झालेला करार हा १९६१ च्या कराराप्रमाणेच, उत्तर कोरियाला लष्करी संरक्षण देणारा असल्याची मान्यता आहे. पुतीन यांचे उत्तर कोरियात ज्या उत्साहात स्वागत झाले, ते पाहता या दोन्ही देशांमधील संबंध हे नव्याने लिहिले गेले आहेत, असे म्हणावे लागेल. रशिया-युक्रेन युद्धात उत्तर कोरियाने रशियाला जो पाठिंबा दिला, त्याबद्दल पुतीन यांनी जाहीर आभारप्रदर्शनही या दौऱ्यात केले. अमेरिका आणि त्याच्या मित्रपक्षांच्या साम्राज्यवादी वर्चस्ववादी धोरणांविरोधातील लढाईचा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे पुतीन यांनी ठळकपणे सांगितले. किम यांनीही यापूर्वीच अशा पद्धतीचे व्यक्तव्य केले होते. रशियाच्या रशियाच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी उत्तर कोरिया न्याय्य कारवाईचे समर्थन करतो, असे त्याने म्हटले होते.

उत्तर कोरियावर त्याच्या अण्वस्त्र तसेच शस्त्रास्त्र कार्यक्रमामुळे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे कडक निर्बंध लादण्यात आले आहेत, तर युक्रेन युद्धामुळे रशियावर अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांनी आर्थिक निर्बंध लादले आहेत. युक्रेन विरोधात लढण्यासाठी रशियाला तोफखाना, क्षेपणास्त्रे आणि अन्य लष्करी सामग्री पुरवल्याचा अमेरिकेने उत्तर कोरियावर आरोप केला आहे. रशियाला उत्तर कोरियाने बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे तसेच ११ हजार कंटेनर भरतील इतकी युद्धसामग्री पुरवली, असा आरोप अमेरिकेने नुकताच केला होता. रशिया आणि उत्तर कोरिया या दोन्ही देशांनी तो त्वरेने फेटाळून लावला होता. उत्तर कोरियाचा दौरा संपवताना पुतीन यांनी असे म्हटले की, दूरच्या नातेवाईकापेक्षा जवळचा शेजारी हा जास्त चांगला असतो. त्याचवेळी किम यांनी जगाला हेवा वाटेल, असे अजेय उत्तर कोरिया-रशिया संबंध, असे म्हणत पाश्चात्य राष्ट्रांना टोला लगावला आहे. अमेरिकी परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकन यांच्या मते, रशियाने युक्रेनवर युद्ध लादल्यानंतर, तो एकटा पडत असल्यानेच त्याला नवनवे संबंध प्रस्थापित करावे लागत आहेत. यात रशियाची अगतिकता दिसून येते, असे ब्लिंकन यांचे म्हणणे आहे. दक्षिण कोरियाने मात्र या भेटीबाबत चिंता व्यक्त केली आहे.

कोरियन द्वीपकल्पातील तणाव गेल्या काही वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचला असून, किम यांच्या शस्त्रास्त्र चाचण्या आणि अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपान यांच्या संयुक्त लष्करी सरावाचा वेग वाढला आहे. पुतीन यांच्या भेटीने म्हणूनच, जगाची चिंता वाढवली आहे. रशिया, उत्तर कोरिया आणि चीन ही तीन हुकूमशाही राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. या तिन्ही देशांमधील परस्परसंबंध हे जगाच्या औत्सुक्याचा विषय आहेत. उत्तर कोरिया रशियाच्या जवळ गेल्याने, तो आता चीनपासून अंतर राखेल, अशी भीती त्याचवेळी चीनला वाटत आहे. कोरियन द्वीपकल्पातील अस्थिरताच त्यामुळे वाढणार आहे, हे नक्कीच. शीतयुद्धानंतर रशिया-उत्तर कोरिया हे प्रथमच मजबूत भागीदारी करत असताना, जागतिक स्तरावर अमेरिकेपासून दूरावत असलेल्या चीनसमोर कोरियात शांतता राखण्याचे आव्हान असेल. अमेरिकेची चिंता वेगळीच आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असा ज्या चीनचा लौकिक आहे, तो चीन आता नव्या समीकरणात, रशिया, उत्तर कोरिया आणि इराण यांच्याशी हातमिळवणी करत, अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक व्यवस्थेला आव्हान देईल, अशी भीती त्याला आहे.

**फायदा रशियाचाच...**

रशिया-उत्तर कोरिया यांच्यातील करार हा उत्तर कोरियाला सर्वाधिक फायदा करून देणार आहे. दोन्ही देशांमधील सामरिक भागीदारी अधोरेखित करणारी पुतीन-किम बैठक रशियाला उत्तर कोरियाकडून आता अधिकृतपणे शस्त्रास्त्रे घेण्यास परवानगी देईल. त्याचवेळी, उत्तर कोरियाला रशियाच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीचा फायदा होणार आहे. अमेरिका आणि नाटोने म्हणूनच याविरोधात चिंता व्यक्त केली आहे. यापूर्वी रशियाने इराणशी संबंध प्रस्थापित करत, युक्रेनवर हल्ला करण्यासाठी आवश्यक असा ड्रोनचा पुरवठा करून घेतला. हा करार शीतयुद्धानंतर दोन्ही देशांमधील संबंध सर्वात मजबूत करणारा आहे. या करारामुळे सांस्कृतिक, आर्थिक, मानवतावादी, गुंतवणूक होणार आहेच. त्याशिवाय या देशांमधील सुरक्षा संबंध अधिक दृढ होतील, असे म्हणता येते. रशिया आणि उत्तर कोरियासारख्या हुकूमशाही देशांबरोबरच चीन आणि इराण यांच्यात जवळीक निर्माण होत असून, अमेरिका आणि नाटोला याचीच भीती आहे. रशिया उत्तर कोरियाला तंत्रज्ञान हस्तांतरण करणार आहे, तर रशियाला त्याबदल्यात शस्त्रास्त्रे मिळणार आहेत.

रशियाने युक्रेनबरोबर युद्ध सुरू केल्याला दोन वर्षांपेक्षा जास्त काळ झाला आहे. पाश्चात्य राष्ट्रांनी लादलेल्या आर्थिक निर्बंधांचा फटका रशियाला बसत असल्याने, त्याला इराण तसेच उत्तर कोरियाकडून शस्त्रास्त्रे हवी आहेत. पुतीन यांच्या दौऱ्यामुळे नवीन जागतिक व्यवस्थेचा पाया घातला आहे का, याचे उत्तर लवकरच मिळेल.

# सेवा कार्याचा आविष्कार 'निर्मल सेवा फाऊंडेशन'






**प्रासंगिक**
बाळासाहेब बडवे
ज्येष्ठ पत्रकार
राष्ट्रसंचार

जीवन कृतार्थ होण्यासाठी कांही संकल्प करावे लागतात आणि सोडावेही लागतात. या संकल्पसिद्धीतून कृतार्थ जीवनाचा अनुभव प्राप्त होत असतो. सेवा कार्यातून मिळणारे मानसिक समाधान हा कृतार्थ जीवनाचा केंद्रबिंदू असतो हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील अनेक संतांनी आपल्या वाड;मयातून अधोरेखित करुन ठेवले आहे. अपौरिशीय वेदांनी सेवा आणि सत्कर्माचे अनेक दाखले दिलेले असताच भगवतगीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, प्रभू येशूचे बायबल, मुस्लिमाचा धर्म ग्रंथ कुराण, शिख समाजाचा धर्मग्रंथ, पारसी समाजाचा धर्मग्रंथ ते सेवा कार्याचे महान उदाहरण असलेले महात्मा गांधी यांनी सेवा कार्याचे आणि त्यातून कृतार्थ जीवनाची फलनिश्चिती कशी होते. याची अनेक उदाहरणे यांच्याकडून मिळतात. सेवाभाव ज्यांच्या अंतरमनाचा भाव तोच भाव त्यांच्या जीवनाचे कृतार्थपणे सिद्ध करतो. पुणे जिल्ह्यातील उरळी-कांचन येथील निर्मल सेवा फाउंडेशन या संस्थेच्या संस्थापिका सौ. नलिनी केशव धेंडे या कृतार्थ जीवनाच्या सन्मानित आदर्श म्हणून ओळखल्या जातात. सौ. नलिनी धेंडे sos CHILDREN'S vILLAGE पुणे या संस्थेत रहात होत्या. त्यांना सांभाळणारी जी माता होती ती निर्मलाताईंची मनोभावे सेवा करीत असत. दोघींचा माय-लेकीचा लळा त्यांच्या चित्ताचा ठाव बनला होता. दिवसामागून दिवस गेले. कांही वर्ष गेले आणि निर्मलाताईंचा सांभाळ करणारी ती माता सेवानिर्वृत झाल्यानंतर स्वगृही परत गेली. काही काळ दिवस भूतकाळात गेले. आणि एके दिवशी त्या आईच्या दर्शनासाठी भेटण्याच्या उद्देशाने त्या तिच्या घरी गेल्या. तेंव्हा तिची अवस्था अत्यंत बिकट पद्धतीची होती. पोटाची भूक शमविण्याचीही तिची परिस्थिती नव्हती. त्यामुळे त्या आईच्या मनावर मालिन्य पणाचे आवरण चढले होते. लोकांपुढे हात पसरुन ती माऊली उपजिविका करीत होती. मनाने आणि शरीराने खचलेल्या त्या आईला पाहून सौ. निर्मलाताईंना दुःखाचा आणि दयेचा असे दोन पाझर फुटले. हे सर्व दृश्य बघून अंगावर काटे आल्याने नलिनीताई शहारल्या गेल्या आणि अशा विषण्ण अवस्थेत तिला इथे वास्तव्य करु द्यायचा नाही असा निश्चय आणि संकल्प करुन त्या आईंना आपल्या घरी आणले आणि त्याच क्षणी निर्मलाताईंनी संकल्प सोडला. अशा वृद्ध माता-पित्यांसाठी एखादा आधार वृक्ष संस्थेच्या रुपाने स्थापन केला पाहिजे असा निर्धारही केला. विचाराचे मंथन सुरु झाले. जेंव्हा विचार परिपक्व होतात तेंव्हा आचार कृतीत उतरत असतो. हा निर्धार आणि संकल्प कर्तव्याच्या भूमिकेतून निर्मलाताईंनी १ एप्रिल २०१४ रोजी एका वृद्धाश्रमाची स्थापना केली. विचार शुद्ध सात्विक आणि सेवाभावी असले की त्याचे रुपांतर प्रत्यक्ष कृतीत होत असते हा निसर्ग आहे. कांही दिवस, कांही वर्ष लोटली आणि २१ जून २०१६ मध्ये महमंदवाडी येथे (हडपसर) येथे वृद्धाश्रमाचे प्रत्यक्ष काम सुरु केले.

आज कौटुंबिक सेवेचं भान वृद्धांसाठी हरपलेले दिसते. या विचाराने घरातील तरुण मुलं-मुली, सुना यांच्यावर एक विशिष्ट प्रकारचे मोहजाळ टाकलेले दिसते. घरातील वृद्ध माता-पिता किंवा अन्य कोणी कौटुंबिक अवस्थेत प्रत्येकाच्या विचाराने ती एक अडचण ठरली जाते. हे सामाजिक वास्तव आज समाजात रुढ होताना दिसते. गरीब असो, श्रीमंत असो किंवा मध्यमवर्गीय कुटुंब असो प्रत्येकाच्या कुटुंबात वृद्धापकाळातील ग्रहस्थींची अवस्था अत्यंत बिकट असल्याचे दिसून येते. आजही असल्या परिस्थितीत वृद्धांना जीवन जगणे अशक्य होताना दिसते. विशेषतः विविध शिक्षणांच्या पदव्यांचे भार टोक्यावर घेऊन नाचणाऱ्यांच्या घरात हे वास्तव ठळकपणे निदर्शनास येते. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे आपल्या धर्मानी, आपल्या माता-पित्यांनी दिलेल्या संस्काराचे विस्मरण होणे. कितीही शिक्षणाच्या पदव्या जवळ बाळगल्या तरी ज्ञानसंपन्नता प्राप्त होते. पण संस्काराचे बिजारोपण अस्ताला जात असताना मात्र दिसते.

वृद्ध मातांना भोजनासाठी सर्वांना एकत्र बसूवन जो आनंद व्दिगुणीत केला जातो तेंव्हा त्या वृद्धांच्या मुखावरील समाधान एक वेगळी अनभूती देऊन जातो. याचा साक्षत्कार झाल्याशिवाय राहात नाही. निर्मलाताईंच्या या संस्थेच्या परिसरात एक वेगळे आनंदाचे वातावरण पहायला मिळते.

रोज भल्या पहाटे नैसर्गिक विधी संपल्यानंतर प्रत्येक मातेला आंघोळ घालणे, वस्त्र घालणे, त्यांची वेणी-फणी करणे, प्रार्थना करणे व त्यानंतर अल्पोपहार नंतर विश्रांती १२ साडेबाराच्या सुमारास भोजन व्यवस्था, पुन्हा विश्रांती, अधून-मधून धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन, विविध प्रकरचे खेळणे याचा आनंद घेताना वृद्ध मातांना कोणी पाहिले तर त्यांच्या अंतःकरणातील समाधान आशिर्वादाच्या फवाऱ्यांनी निर्मलाताईंच्यावर बरसतात. निर्मलाताईंनी वार्षिक पालकत्व योजना, स्नेहभाव योजना, आरोग्यदायी योजना अशा विविध प्रकारच्या सहकाऱ्याच्या भूमिकेची एक पार्श्वभूमी तयार केलेली आहे. स्मृति अन्नदान योजना, स्मृति सदन भूदान योजना अशा विविध प्रकारच्या योजना आश्रमाच्या मदतीसाठी प्रस्तुत केलेल्या दिसतात. निर्मलीताईंची भूमिका शुद्ध, प्रांजळ आणि सेवाभावाची असली तरी सामाजिक दृष्टीकोनातून अशा संस्थांना विविध माध्यमातून सहकार्याचे हात लावले हे योगदान सुद्धा तितेतक महत्वाचे वाटते. निर्मल फाऊंडेशन यां संस्थेचे समाज कार्य दिवसेंदिवस गती घेत असताना दिसते. याचे सारे श्रेय सेवाभावी आणि कर्तव्य तत्परतेचे कंगण निर्मलाताईंना द्यावे लागते. आपणही भेट द्या आणि सामाजिक कर्तव्याचे भान ठेवून या संस्थेच्या उदरात दडलेले सेवावृती गंगेचे दर्शन घ्या असेच प्रामाणिकपणे वाटते. सर्वाभूती परमेश्वर म्हणजेच प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात परमेश्वाराचा वास असतो या श्रद्धेची संकल्पना सौ.निर्मलाताईंनी आपल्या जीवनाचा स्थायी भाव बनविला. या कर्तव्यपूर्तीच्या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर होईल. तेंव्हा सौ.निर्मलाताई धेंडे यांच्या कृतार्थ जीवनाची साक्ष पहायला मिळेल. आश्रमाचा दूरध्वनी क्रमांक ९७६२३४७०८५ निर्मल फाऊंडेशन उरळी कांचन पुणे असा आहे.

# स्वयंसेवी संस्था व आयकर तरतुदींमधील बदल

अनित्यता हा जीवनाचा मूलभूत नियम आहे. आयकर कायद्यात तर हे बदल निरंतर होत असतात. आयकर तरतुदींमधील सुधारणांमुळे अनेक स्वयंसेवी संस्था, ट्रस्ट आणि एनजीओ अनिश्चितता आणि संभ्रमात आहेत. १ एप्रिल २०२१ पासून या कायद्याच्या काही कलमांमध्ये सुधारणा झाल्याने आव्हाने आणि प्रक्रियात्मक गुंतागुंतीचे नवीन युग निर्माण झाले आहे. आयकर नोंदणी अर्ज उशिरा दाखल झाल्याने ते नाकारले गेल्यास ट्रस्ट या परिपत्रकाच्या मदतीने ३० जून २४ च्या आत पुन्हा अर्ज करू शकतात. या घडामोडींच्या प्रकाशात ट्रस्ट, सोसायट्या आणि कलम ८ कंपन्यांनी या संधीचे सोने करणे अत्यावश्यक आहे. सुधारित तरतुदींतर्गत नोंदणीसाठी पुन्हा अर्ज केल्याने भविष्यातील कर गुंतागुंतीपासून संरक्षण होईल. शिवाय पारदर्शकता आणि अनुपालनासाठी त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी सुद्धा होईल. एकंदरितच असे वाटते की आयकर विभाग नोंदणी आणि आयकर सवलतीसाठी आणखी मुदतवाढ किंवा सवलत देणार नाहीत.






**अर्थवेध**
सीए अश्विन कापसे
राष्ट्रसंचार

आयकर कायद्याच्या कलम ११, १२ ए , १२ ए बी आणि ८० जी मध्यें महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे अनुपालन आव्हाने आणि प्रक्रियात्मक गुंतागुंतीचे नवीन युग निर्माण झाले आहे. कोणतीही ट्रस्ट, सोसायटी किंवा इतर कोणत्याही एनजीओला आयकरातून सूट हवी असेल तर त्यांनी कलम १२ ए किंवा १२ ए बी अंतर्गत आयकर विभागाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. या संदर्भात नोंदणी झाली असेल तर आयकरमधून कलम ११ च्या तरतुदींचे पालन करून सूट मिळू शकते. तसेच ८० जी तरतुदींमध्ये बदल करण्यात आले होते जे देणगीदारांनी ट्रस्टला देणगी मागण्यासाठी आवश्यक होते. नवीन तरतुदींनुसार कायमस्वरूपी नोंदणी असलेल्या कोणत्याही ट्रस्टला कलम १२ ए बी अंतर्गत पुनर्नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच जर कोणत्याही ट्रस्टची कलम १२ ए किंवा ८० जी अंतर्गत कोणतीही नोंदणी नसेल तर ते नवीन नोंदणीसाठी देखील अर्ज करू शकतात आणि आयकर विभाग कोणत्याही चौकशीशिवाय तात्पुरती नोंदणी मंजूर करतो. एकदा तात्पुरती नोंदणी मिळाल्यावर निश्चित वेळेत कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज करावा लागतो.

काही प्रकरणांमध्ये ट्रस्ट सोसायटी किंव कलम ८ कंपन्या ज्यांच्या पूर्वीच्या कलम १२ ए अंतर्गत कायमस्वरूपी नोंदणी होती. परंतू, ज्या ट्रस्टची कायमस्वरूपी नोंदणी नव्हती आणि ज्यांनी प्रथमच नोंदणीसाठी अर्ज केला आणि ज्यांना ३ वर्षासाठी तात्पुरती नोंदणी मिळाली, यांचा प्रश्न आता निर्माण झाला आहे. या ट्रस्ट सोसायटी किंवा कलम ८ कंपन्यांनी कायमस्वरूपी नोंदणीसाठी ६ महिन्यांपूर्वी किंवा तात्पुरती मुदत संपण्याच्या तारखेपूर्वी किंवा ट्रस्टच्या क्रियाकलाप सुरू झाल्यापासून ६ महिन्यांपूर्वी अर्ज करणे आवश्यक होते.

**अर्ज उशिरा दाखल झाल्यामुळे अर्ज नाकारले गेल्यास हे ट्रस्ट देखील या परिपत्रकाच्या मदतीने ३० जून २४ च्या आत पुन्हा अर्ज करू शकतात. ट्रस्ट, सोसायट्या, आणि कलम ८ कंपन्यांनी या संधीचे सोने करणे अत्यावश्यक आहे. सुधारित तरतुदींतर्गत नोंदणीसाठी पुन्हा अर्ज केल्याने भविष्यातील कर गुंतागुंतीपासून संरक्षण मिळेल. शिंवाय पारदर्शकता व अनुपालनासाठी त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी होते. असं वाटतंय की आता आयकर विभाग हे नोंदणी आणि आयकर सवलतीसाठी आणखी मुदतवाढ किंवा सवलत देणार नाहीत.**

आता अतिशय महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो, जर कोणतीही ट्रस्ट, सोसायटी किंवा कलम ८ कंपन्या ज्यांनी आधीच उपक्रम सुरू केले होते. परंतु ३० सप्टेंबर २३ पर्यंत कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज करू शकले नाहीत तर अशा ट्रस्ट, सोसायटी किंवा कलम ८ कंपनीसाठी कोणते उपाय किंवा पर्याय उपलब्ध आहेत.संबंधित प्राधिकरणाकडे विलंबकाबद्दल परवानगी व्यक्त करण्याची विनंती करता येईल का याचे उत्तर नाही असे आहे. सुधारित कलमाने विभागाला असा अधिकार दिलेला नाही. त्यामुळे कोणत्याटी ट्रस्ट, सोसायटी किंवा कलम ८ कंपन्यांनी या देय तारखेनंतर कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज केल्यास आयकर विभागने असे अर्ज सरळ मार्गाने नाकारले आहेत आणि पूर्वलक्षी प्रभावाने तात्पुरती नोंदणी प्रमाणापत्रही रद्द केले. या तरतुदी विशेषतः एनजीओ क्षेत्रासाठी अत्यंत कठोर आहेत. विश्वस्तांना या तरतुदीबद्दल फारशी माहिती नसते आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कर दायित्वे येऊ शकतात. आता कायमस्वरूपी नोंदणीच्या या नाकारलेल्या आदेशासाठी करनिर्धारकाला केवळ न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा एकमेव पर्याय होता.

ही अडचण दूर करण्यासाठी सनदी लेखापालांच्या संघटनांनी सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सकडे संपर्क साधला. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर टॅक्सने २५ एप्रिल २४ रोजी परिपत्रक क्रमांक जुलै २४ द्वारे आणखी एक परिपत्रक जारी केले आहे. ज्याने ३० जून २४ पर्यंत अर्ज करण्याची वेळ वाढवली आहे. मी या लेखाद्वारे सर्व ट्रस्ट, सोसायट्यांना विनंती करतो कलम ८ कंपन्यांनी या परिपत्रकाचा लाभ घ्यावा आणि कलम १२ ए बी आणि ८० जी अंतर्गत नोंदणीसाठी पुन्हा अर्ज करावा. भविष्यातील कर गुंतागुंतीपासून मुक्त होण्यासाठी सर्व ट्रस्ट, सोसायटी आणि कलम ८ कंपन्यांसाठी हा मोठा दिलासा आहे.

**‘चंदू चॅम्पियन’ या कबीर खान लिखित आणि दिग्दर्शित चित्रपटाच्या माध्यमातून मुरलीकांत पेटकर यांचा जीवनप्रवास उलगडणारा चित्रपट सध्या चर्चेत आहे. या सिनेमातील पेटकर यांचा जीवनप्रवास कधी डोळ्यांचे पारणे फेडतो, तर कधी श्वास रोखून धरायला लावतो, कधी मुरलीकांत पेटकर यांच्या यशामध्ये प्रेक्षकांनाही सहभागी करायला लावतो तर कधी चित्रपटाच्या शेवटी अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करून आणि स्वत:ची लढाई स्वत: लढून अशक्यप्राय विक्रमाला गवसणी घालणारा हिरो हा त्यांच्यासाठी कसा खरोखरचा हिरो ठरतो, हे पाहून प्रेक्षक देखील मंत्रमुग्ध होतात.**

# जिगरबाज प्रवासाचं दमदार सादरीकरण



भाग मिल्खा भाग, १९८३, मेरी कोंम, सुलतान, मैदान आणि आता चंदू चॅम्पियन या आणि यांसारख्या दर्जेदार आणि अर्थपूर्ण चित्रपटानी खेळाला, क्रीडा क्षेत्राला आणि उदयोन्मुख खेळाडूंनाही प्रोत्साहन देण्याचे जरुरी काम केले आहे, हे मान्य करावेच लागेल. एका ग्रामीण भागातून आलेला आणि असंख्य अडचणींचा अन् अडथळ्यांचा डोंगर पार करत, पुढील आयुष्यात भारतीय सैन्य दलात कामगिरीवर असताना झालेला शत्रू राष्ट्राकडून हल्ला आणि अपघात, आजारपण, निराशा झेलत तर कधी नैराश्यामुळे आयुष्य संपवण्याचा असफल प्रयत्न करणारा, संकटात संधी शोधत मार्गक्रमण केलेल्या मुरलीकांत पेटकर यांचा प्रवास नक्कीच सोपा, सरळ नव्हता.

भारतीय सैन्यामधून बॉक्सरपासून सुरू झालेला मुरलीकांत यांचा प्रवास शत्रू राष्ट्राने भारतीय सैन्याच्या कॅम्पवर हल्ला केल्यावर आणि त्यात ते गंभीर जखमी होऊन तब्बल दोन वर्षे अंथरुणाला खिळून राहिल्यावर अर्थात अपंगत्व आल्यावर हा प्रवास कसा बदलतो, मरणासन्न आयुष्य वाट्याला आल्याने त्यांच्या मनाची होणारी घालमेल, त्यानंतर प्रशिक्षक आली यांच्या मार्गदर्शनाखाली पॅरालिम्पिक स्विमिंग स्पर्धेत देशाला पहिलं गोल्ड मेडल कसं प्राप्त करून देतात, याचा जितका धगधगता तितकाच प्रेरणादायी इतिहास मांडण्यात ‘चंदू चॅम्पियन’चे लेखक, दिग्दर्शक यशस्वी झाले आहेत. दिग्दर्शनातील, सादरीकरणातील काही गोष्टी सोडल्या तर हा चित्रपट प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून ठेवण्याला भाग पाडतो. देश प्रेमाचे स्फुलिंग मनामनात चेतवणारा चंदू चॅम्पियन म्हणूनच प्रेक्षकांच्या मनात घर करतो, असं म्हटलं तर ते अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही.

महाराष्ट्रमधील सांगली–इस्लामपूर सारख्या ग्रामीण भागातून एका सर्वसामान्य कुटुंबातील स्वप्नाळू मुलगा ऑलिंपिक स्पर्धेत भाग घेऊन भारताला गोल्ड मेडल मिळून देण्याचं स्वप्न पाहतो काय आणि त्या दिशेने प्रवास सुरू ठेवतो काय आणि शेवटी उत्कंठावर्धक, साहसी प्रवासानंतर आपले लक्ष्य साध्य करतो काय, हे सारंच नाट्यपूर्ण आणि खरंतर अविश्वसनीय आहे, हा एक चरित्रात्मक स्पोर्ट्स ड्रामा चित्रपट आहे.

‘चंदू चॅम्पियन’ हा कबीर खान लिखित आणि दिग्दर्शित सिनेमा आहे. चित्रपटाच्या माध्यमातून मांडणी केलेला हा



त्यांचा जीवन प्रवास कधी डोळ्यांचे पारणे फेडतो, तर कधी श्वास रोखून धरायला लावतो, कधी मुरलीकांत पेटकर यांच्या यशामध्ये प्रेक्षकांनाही सहभागी करायला लावतो तर कधी चित्रपटाच्या शेवटी अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करून आणि स्वत:ची लढाई स्वतः लढून अशक्यप्राय विक्रमाला गवसणी घालणारा हिरो हा त्यांच्यासाठी कसा खरोखरचा हिरो ठरतो, हे पाहून प्रेक्षक देखील मंत्रमुग्ध होतात, भावनिक होतात.

मुरलीकांत यांचा जीवन संघर्ष पाहून एकाच वेळी प्रेक्षकांच्या डोळ्यांतून हसू आणि आसू दोन्ही निघतात. ज्या वयात शिक्षण घेऊन पुढील करीयर करण्याचे वय असते, त्याच वयात मुरलीकांत हे कुस्तीमध्ये गोल्ड मेडल मिळवण्याचे ध्येय बाळगतात. शिक्षणात यथातथा असणारा हा मुलगा चुणचुणीतही असतो. मात्र, त्याच्या कुस्ती खेळन्याच्या वेडाला त्याच्या वडिलांचा तीव्र विरोध असतो. पण या विरोधाला न जुमानता तो कुस्तीत सहभागी होतो. त्याच असं होतं की, एकेदिवशी गावातील स्थानिक कुस्ती स्पर्धेत तो त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने बलवान असलेल्या पैलवान याचेशी त्याच्या वस्ताद याच्या सांगण्यावरून भिडतो आणि त्याला धोबीपछाड करतो. मात्र, गावातील प्रतिस्पर्धी संघ त्यांच्यावर विश्वासघात केल्याचा आरोप करत विनाकारण मुरलीकांत आणि त्याच्या गटातील कुस्तीपटूंच्या हात धुऊन मागे लागतात आणि मुरलीकांत जीव मुठीत घेऊन डोंगर दऱ्यातून, नदीतून धावत सुटतो.

नंतर तो एका धावत्या रेल्वेमध्ये चढतो पुढे एका समवयस्क मित्राच्या मदतीने आणि साथीने सैन्यात भरती होण्यात यशस्वी देखील होतो. तेथील अवघड असे प्रशिक्षण पूर्ण करतो. त्यांना ऑलिंपिक स्पर्धेत कुस्तीमध्ये भारतीय संघाला गोल्ड मेडल मिळवून द्यायचे असते. त्यासाठी तो ऑलम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचं आपले स्वप्न सैन्यातील काही सहकारी यांना बोलून दाखवतो.

मात्र काही गैरसमजातून एक सहकारी आणि त्याच्यामध्ये वादावादी होते. यामध्ये तेथील वरिष्ठ अधिकारी सर्वप्रथम मुरलीकांत यांना सैन्य दल सोडून तिथून बाहेर जाण्यास सांगतात, मात्र मुरलीकांत आपलं मिलिटरी मध्ये भरती होण्यामागे खरं काय ध्येय आहे ते त्यांना स्पष्ट करत देशसेवा करण्यावर ठाम राहतो. जीवनात येऊन काहीतरी ठोस मिळवण्याची, करण्याची धग आणि जिद्द जागी असल्याचे पाहून सैन्य दलातील एक वरिष्ठ अधिकारी मग त्यांना बॉक्सिंगचे ट्रेनिंग घेण्यास सांगतात. मुरलीकांत हे तेथील बॉक्सिंग प्रशिक्षक अली यांचं मन जिंकून घेतात. पुढे आपल्या जिगरबाज खेळाने मुरलीधर लक्षवेधक कामगिरी करतात. टोकियो येथे आयोजित गेम मध्ये सहभागी होण्याची त्यांना संधी मिळते. या संधीचे सोनं करण्याचा ते प्रयत्न करतात. पहिल्या फेरीत काही खेळाडूंना पराभूत करून ते पुढची फेरी गाठतात. पण मोक्याच्या क्षणी मात्र मातब्बर खेळाडूकडून त्यांना पराभवाचा सामना करावा लागतो. त्यांच्या पराभवामुळे त्यांचे प्रशिक्षक आली हे देखील नाराज होतात. त्यानंतर १९६५ रोजी शत्रू राष्ट्र भारताच्या काश्मीर येथील एका मिलिटरी कॅम्पवर अचानक हल्ला करतो. या हल्ल्यात मुरलीकांत यांना नऊ बंदुकीच्या गोळ्या लागतात आणि ते अधू होतात, विकलांग होतात. तेथून त्यांचे विश्व बदलते. त्यांच्या कुटुंबाचा अपेक्षित पाठिंबा त्यांना न मिळाल्यामुळे आणि गोल्ड मेडल मिळवण्याचे स्वप्न भंग पावल्यामुळे पराभूत मानसिकता घेऊन ते जगू लागतात. यातून एके दिवशी ते आत्महत्या करण्याचा प्रयत्नही करतात. मात्र एके दिवशी त्यांचे प्रशिक्षक अली त्याला भेटतात आणि त्याच्या मनात पुन्हा नव्या ध्येयाने जीवन जगण्याची इच्छाशक्ती निर्माण करतात आणि ते विकलांग असले तरी ते पॅरा ऑलिंपिक स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवू शकतात, या बदल त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतात.

सिनेविशेष

महत्त्प्रयासाने मुरलीकांत पेटकर यांना भारताकडून पॅरा ऑलिंपिक स्पर्धेमध्ये खेळण्याची संधी मिळते. मात्र म्युनिख येथे गेल्यावर तिथे आयोजित केलेली ही स्पर्धा दहशतवादी हल्ल्यामुळे रद्द केली जाते. ही स्पर्धा पुढे जर्मनीत इतर ठिकाणी आयोजित केली जाते. या स्पर्धेत मुरलीकांत पेटकर आपल्या जीवाची बाजी लावतात, प्रयत्नाची शर्थ करतात आणि आपले ध्येय, आपले स्वप्न पूर्ण करतात, ते स्वप्न असते भारताला ऑलम्पिक स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवून द्यायचे, स्पर्धा ऑलिंपिकची असते, फक्त मुरलीकांत यांच्या विकलांगपणामुळे भारताला पहिलं गोल्ड मेडल पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत ते मिळवून देतात. त्यांचा इथपर्यंतचा प्रवास थक्क करणारा, विस्मयकारी आणि रोमांचकही आहे. मुळात केवळ आपल्या गावाच्या पायाभूत विकासासाठी अर्जुन पुरस्काराची अपेक्षा करणारे मुरलीकांत पेटकर यांचे प्रकाश झोतात न आलेले जीवन कार्य प्रसार माध्यमातून प्रसिद्ध होते. त्याची दखल शासनाला घ्यावी लागते. राज्यकर्ते त्यांच्याकडे येऊन त्यांना पद्मश्री पदक बहाल करण्याची घोषणा करतात.

एक सर्वसामान्य कुटुंबातील मुलगा संधी मिळाल्यावर आपल्या परिस्थितीवर कशी मात करतो, अनंत अडचणीवर मात करून विजुगिषू कसा खेचून आणतो, वडिलांचा विरोध असूनही आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून तो कशी वाटचाल करतो, विकलांगपणामुळे आत्मविश्वास गमावलेला तरुण योग्य मार्गदर्शन मिळाल्यावर विजयाला पुन्हा कशी गवसणी घालतो, त्यासाठी किती जीतोड मेहनत करतो, लौकिक अर्थाने सर्व काही गमावूनही फिनिक्स पक्षाप्रमाणे तो कशी झेप घेतो, आपल्या गावाच्या विकासासाठी कसा झटतो, कसा योगदान देतो, चंदू चॅम्पियन ही त्यांची कथा आहे, म्हटलं तर वंडर बॉयची. या चित्रपटातील सर्वच कलाकारांनी आपल्या भूमिकेला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. सकस अभिनय आणि ताकतीने त्या त्या भूमिका निभावल्याने कथेतील पात्र जिवंत असल्याचा भास होतो. फ

**- एम. जी. गावडे , ज्येष्ठ पत्रकार**

## सुमोना कपिलवर नाराज का?




अभिनेत्री सुमोना चक्रवर्ती ही एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व आहे आणि हे तिने अनेक शोमध्ये केलेल्या अभिनयाने सिद्ध केले आहे. ‘बडे अच्छे लगते हैं’, ‘कसम से’, ’कस्तुरी’, ‘जमाई राजा’ यांसारख्या शोमध्ये स्वतःला आजमावल्यानंतर तिने प्रसिद्ध कॉमेडियन कपिल शर्मासोबत काम करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. पुढे ती ‘कहानी कॉमेडी सर्कस की’, ‘कॉमेडी नाइट्स विथ कपिल’ तसेच ‘द कपिल शर्मा शो’च्या तीन सीझन सारख्या स्टँड-अप शोचा भाग बनली.

जेव्हापासून कपिल नेटफ्लिक्सवर ‘द ग्रेट इंडियन कपिल शो’ घेऊन परतला आहे, तेव्हापासून सुमोनाला त्याचा भाग बनवले गेले नाही आणि नवीन अहवाल सूचित करतात की सुमोना त्यावर नाराज होती. वृत्तानुसार, सुमोना चक्रवर्ती कपिल शर्मावर रागावलेली आहे कारण त्याने सुमोनाला त्याच्या नेटफ्लिक्स शो ‘द ग्रेट इंडियन कपिल शो’मध्ये काम करण्याची संधी दिली नाही.

सुमोना जवळजवळ दहा वर्षांपासून कॉमेडियनशी संबंधित असल्याने, तिला आशा होती की मागील सीझनमधील सर्व कलाकारांना शोसाठी कायम ठेवले जाईल. मात्र, तिच्या बाबतीत असे घडले नाही तेव्हा तिला आश्चर्य वाटले. शोच्या डिजिटल आवृत्तीसाठी संपूर्ण कलाकारांना कायम ठेवण्यात येईल अशी तिला आशा होती, परंतु कपिलकडून तिला कोणताही कॉल आला नाही. तसेच, सुनील ग्रोव्हर शोमध्ये परत आल्यानंतर कपिलने फक्त कृष्णा अभिषेक आणि किकू शारदाला सोबत घेतले.’

## प्रियांका थोडक्यात बचावली

बॉलीवूड-हॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्रासोबत सेटवर अपघात झाला आहे. ती ऑस्ट्रेलियात ’द ब्लफ’ या आगामी हॉलिवूड चित्रपटाचे शूटिंग करत होती. यावेळी प्रियंकाच्या मानेवर खोलवर जखम झाली. सुदैवाने ती मृत्यूपासून थोडक्यात बचावली. प्रियांकाने या जखमेचा फोटोही सोशल मीडियावर शेअर केला, हा फोटो पाहून चाहते हैराण आणि नाराज झाले आहे. प्रियांका चोप्राने याआधीही अनेकदा शूटिंगदरम्यान झालेल्या दुखापतीच्या खुणा दाखवल्या आहे, पण यावेळी तिच्या मानेवर खूप खोल कट बसला आहे. या फोटोवर चाहते चिंता व्यक्त करत आहे.



प्रियांका ऑस्ट्रेलियात ‘द ब्लफ’ चित्रपटाचे शूटिंग करत होती. या चित्रपटात ती कार्ल अर्बनसोबत काम करत आहे. हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन फ्रँक ई फ्लॉवर्स यांनी केले आहे.

प्रियांकाच्या वर्कफ्रंटबाबत सांगायचे झाल्यास, या चित्रपटाशिवाय प्रियांकाकडे जॉन सीनासोबत ‘हेड ऑफ स्टेट’ हा चित्रपट आहे. याशिवाय तिच्याकडे ‘सिटाडेल २’ देखील आहे. चाहतेही प्रियंकाच्या बॉलिवूड चित्रपटाची वाट पाहत आहेत. ती फरहान अख्तरच्या ‘जी ले जरा’ मध्ये दिसणार होती, ज्यात कतरिना कैफ आणि आलिया भट्ट देखील आहेत, परंतु हा चित्रपट सध्या बॅक बर्नरवर आहे.



## ‘जिंदगी...’चा सिक्वल येणार?

झोया अख्तर दिग्दर्शित ‘जिंदगी ना मिलेगी दोबारा’ नावाचा चित्रपट २०११ मध्ये प्रदर्शित झाला होता. यामध्ये तीन मित्रांची (अर्जुन, कबीर आणि इमरान) कथा दाखवण्यात आली होती जे रोड ट्रिपला जातात. या चित्रपटात हृतिक रोशन, अभय देओल आणि फरहान अख्तर मुख्य भूमिकेत दिसले होते. प्रेक्षकांना हा चित्रपट इतका आवडला की, या तिन्ही मित्रांना पुन्हा एकदा पाहण्याची इच्छा व्यक्त झाली. सोशल मीडियावरुन अनेकांनी निर्मात्यांकडे या चित्रपटाचा सीक्वल बनवण्याची मागणी केली आणि आजही केली जात आहे.

याबाबत फरहान अख्तरने अलीकडेच भाष्य केले आहे. त्याने सांगितले की, आम्ही ‘जिंदगी ना मिलेगी दोबारा या चित्रपटात ‘दोबारा’ हा शब्द वापरला आहे. मग दुसऱ्या भागाला काय म्हणणार? आमच्याकडे कथा आहे, पण शीर्षक नाही, म्हणून आम्ही अडकलो आहोत. चित्रपट निर्मितीच्या इतिहासात हे प्रथमच घडले आहे, असं म्हणत तो पुढे म्हणाला, हा केवळ विनोद होता. तो पुढे म्हणतो, आम्हा सर्वांना त्याचा सिक्वेल बनवायचा आहे, कारण हा चित्रपट आवडला आहे. या सिक्वेलबद्दल आम्हाला अनेकदा विचारले जाते. त्यामुळे आम्हाला आशा आहे की झोया सिक्वेलसाठी काहीतरी घेऊन येईल.

‘जिंदगी ना मिलेगी दोबारा’ बॉक्स ऑफिसवर तुफान यशस्वी ठरला. रिपोर्टनुसार, हा चित्रपट बनवण्यासाठी ६० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. जगभरात या चित्रपटाचे एकूण १५३ कोटींचे कलेक्शन होते. या चित्रपटात कतरिना कैफ, कल्की कोचलिन, नसीरुद्दीन शाह यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या.

## आलिया-रणबीर एकत्र झळकणार

अभिनेत्री आलिया भट्ट आणि रणबीर कपूर नेहमीच कधी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे तर कधी त्यांच्या व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत राहतात. आता ही जोडगोळी पुन्हा एकदा एकत्र काम करणार आहेत. या पती-पत्नी दोघांकडे सध्या अनेक मोठे प्रकल्प आहे. यातील एक म्हणजे ‘लव्ह अँड वॉर’. आता आलिया भट्टने या चित्रपटावर आपले मौन तोडत चित्रपटाच्या दिग्दर्शकाबाबत मोठी गोष्ट सांगितली आहे. यासोबतच तिने आणखी दोन चित्रपटांबद्दलही सांगितले.



संजय लीला भन्साळी ‘लव्ह अँड वॉर’चे दिग्दर्शन करत आहे. यामध्ये आलिया भट्ट आणि रणबीर कपूर एकत्र दिसणार आहेत. आलिया आणि रणबीर संजय लीला भन्साळीसोबत काम करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही या दोघांनी त्याच्यासोबत चित्रपट केले होते. भन्साळींसोबत आलियाने ‘गंगूबाई काठियावाडी’मध्ये तर रणबीरने ‘सावरिया’ चित्रपटात काम केला आहे. आता आलियाने या चित्रपटाबद्दल बोलताना सांगितले की, ती तिच्या पतीसोबत काम करण्याची संधी मिळणार असल्याबाबत खूप आनंदी आहे. यासोबतच तिने भन्साळींसोबत काम करण्याची उत्सुकताही व्यक्त केली. एक प्रेक्षक म्हणून मी त्यांना आणि रणबीरला इतक्या वर्षांनंतर एकत्र काम करताना पाहून खूप खुश आहे, असे ती सांगते.

यावेळी आलियाने तिच्या येणाऱ्या चित्रपटाबाबतही सांगितले. यानुसार ‘जिगर’ चित्रपटाचे दिग्दर्शक वासन बाला यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव तिने शेअर केला. ‘जिगरा’मध्ये तिच्यासोबत वेदांग रैना दिसणार आहे. आलियानेही त्याचे कौतुक केले. हा चित्रपट ११ ऑक्टोबरला थिएटरमध्ये दाखल होणार आहेत.

## रेहाचे ‘पहिले’ गाणे रिलीज

रेहा खान एक अशी अभिनेत्री आहे जिच्या परिचयाची गरज नाही. रेहाने जगभरातील अनेक सौंदर्य स्पर्धांमध्ये देशाचा गौरव केला आहे. आता रेहाने तिचा स्वतःचा म्युझिक ब्रँड आर-सीरीज देखील तयार केला आहे, इतकेच नाही तर तिने तिच्या नवीन कंपनीचे पहिले गाणेही लाँच केले आहे. खऱ्या अर्थाने पाहिले तर रेहा स्त्री शक्तीचे एक अतुलनीय उदाहरण म्हणून पुढे आली आहे. याआधी रेहाने अनेक पंजाबी गाणी, ॲड फिल्म्स आणि वेब सीरिजमध्ये काम केले आहे.

रेहा स्वतः म्हणते, प्रत्येकाची स्वतःची मालिका, चित्रपट मालिका, वेब सीरिज असते, म्हणूनच आम्ही आमची स्वतःची मालिका तयार केली आहे, म्हणजे आमचा स्वतःचा ब्रँड आर-सीरीज. निःसंशयपणे, तिच्या मॉडेलिंग आणि अभिनय कारकिर्दीसोबत, रेहा देखील एक अतिशय मजबूत महिला उद्योजक बनली आहे.

‘कावेरी’ या नव्या गाण्यात अभिनेता सनम जोहरने रेहाला तिच्या दमदार अभिनयाची साथ दिली आहे. गायक जोरावर यांनी संगीतबद्ध केलेल्या कावेरी गाण्याला फेम



म्युझिकने संगीत दिले आहे. गीतकार अजब असून दिग्दर्शन गुरु शर्मा यांचे आहे. डीओपीचे काम अजय पाल यांनी केले असून कोरिओग्राफी अरुण घोगे यांनी केली आहे. कावेरी गाण्याचे व्हिडिओ चित्रीकरण आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट लोकेशन्सवर झाले आहे.

## श्रद्धाचं कन्फर्मेशन



अभिनेत्री श्रद्धा कपूर बॉलीवूड इंडस्ट्रीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक मानली जाते.अभिनयासह तिच्या सौंदर्याचे लाखो चाहते आहेत. सोशल मीडियावर देखील ती सक्रिय असल्याचे दिसते. नुकतेच तिने राहुल मोदीसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये ती राहुल मोदीसोबतच्या नात्याचा जाहीर खुलासा करत असल्याचे दिसत आहे. यापूर्वी या दोघांच्या रिलेशशीपच्या अनेकदा चर्चा रंगल्या. परंतु दोघांनी त्याबाबत कधी जाहीररित्या सांगितले नाही.

डेटिंगच्या अफवांच्या दरम्यान, श्रद्धाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर लेखक राहुलसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. फोटोमध्ये श्रद्धा कॅमेऱ्यासमोर हसताना दिसत आहे. तर राहुलने विचित्र चेहरा केला आहे. श्रद्धाने कॅप्शनमध्ये लिहिलंय की, दिल रख लेनींद तो वापस दे दे यार। आणि पुढे तिने हार्ट आणि हसण्याचे इमोजी पोस्ट केले आहेत. कॅप्शन आणि फोटोंवरुन श्रद्धाने राहुलसोबतच्या नात्याला कन्फर्म केल्याच्या चर्चा आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार श्रद्धाची राहुलसोबत ‘तू झुठी मैं मक्कार’ चित्रपटादरम्यान भेट झाली होती. राहुल या चित्रपटाचा लेखक होता. एकत्र काम करताना दोघांची एकमेकांशी ओळख वाढली आणि ते प्रेमात पडले. राहुलने ‘प्यार का पंचनामा २’, ‘सोनू के टीटू की स्वीटी’ सारख्या चित्रपटांसाठीही लेखनाची धुरा सांभाळली आहे. २०२३ मध्ये पहिल्यांदा हे एकत्र दिसले होते. तेव्हापासूनच दोघांच्या रिलेशनशीपच्या चर्चा होत्या.

श्रद्धाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, २०११ मध्ये ‘लव्ह का द एंड’ या चित्रपटातून लोकप्रियता मिळाली. यानंतर श्रद्धाने ‘आशिकी २’, ‘एक व्हिलन’, ‘बागी’, ‘हैदर’, ‘हाफ गर्लफ्रेंड’, ‘हसीना पारकर’, ‘स्त्री’ असे अनेक हिट चित्रपट दिले. यानंतर ती लवकरच स्त्री २ चित्रपटात दिसणार आहे.

## बहुचर्चित ‘सरफिरा’चा ट्रेलर रिलीज

बॉलीवूडचा खिलाडी अशी ओळख असलेल्या अक्षय कुमारच्या सरफिरा या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला आहे. इमोशन्स आणि प्रेरणादायी कथानकाने प्रेरित असलेल्या या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून चाहते उत्सुकतेने वाट पाहत होते.

काही दिवसांपूर्वीच अक्षय कुमारचा ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ चित्रपट रिलीज झाला होता. या चित्रपटालादेखील प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता.

‘स्वप्नं ती नसतात जी तुम्ही झोपेत पाहतात, स्वप्न ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत, अशीच एक स्वप्न कथा आहे सरफिरा...’ असं कॅप्शन देत सरफिरा चित्रपटाचा ट्रेलर अक्षय कुमारने शेअर केला आहे.

या चित्रपटाचे कथानक स्टार्ट अप बिझनेस आणि एअरलाईनवर आधारित आहे. जर तुमच्याकडे स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द असेल तर तुम्ही ते कशा प्रकारे पूर्ण करू शकता हे आपल्याला ट्रेलरमध्ये पाहायला मिळेल.

‘सरफिरा’ मध्ये मुख्य भूमिकेत अक्षय कुमारसह परेश रावल, राधिका



मदन, आर. सरथ कुमार आणि सीमा बिस्वास हे कलाकार आहेत. याशिवाय मराठमोळी अभिनेत्री इरावती हर्षे ही मुख्य भूमिकेत आहेत. ‘ओएमजी’ नंतर अक्षय कुमार आणि परेश रावल पुन्हा एकदा या चित्रपटातून एकत्र झळकणार आहे. हि जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी होते का हे पाहणे महत्वाचे असणार आहे. हा चित्रपट १२ जुलैला रिलीज होणार आहे.

» Selected

## माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्यात

# भाविकांना आरोग्य सुविधा वेळेत मिळणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा २९ जून रोजी होत असून २५ जून ते ३० जून पर्यंत भाविकांना(Alandi) वेळेत सुविधा मिळण्यासाठी ग्रामीण रुग्णालय आळंदी मार्फत नियोजन करण्यात आले आहे. याबाबत ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांनी माहिती दिली.

ग्रामीण रुग्णालय येथे २४/७ बाह्यरुग्ण सेवा चालू ठेवण्यात आली आहे.,ग्रामीण रुग्णालय आळंदी येथे ५ आय सी यु बेड व्यवस्था करण्यात आली आहे.,आषाढी वारी २०२४ मध्ये येणाऱ्या भाविकांसाठी आळंदी शहर हद्दीमध्ये नऊ ठिकाणी औषधोपचार बूथ कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.,आषाढी वारी २०२४ कालावधीत माऊलीं मंदिर येथे एक बेड ऑक्सिजन व ECG सुविधासह कार्यन्वित करण्याचे नियोजन आहे. आषाढी वारी २०२४ कालावधीत आळंदी शहर हद्दीतील सर्व खाजगी रुग्णालयास १०% खाटा राखीव ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. सध्या ग्रामीण रुग्णालय आळंदी येथील



सर्व जम्बो व लहान ऑक्सिजन सिलेंडर भरलेल्या स्थितीत ठेवण्याचे नियोजन आहे.,ग्रामीण रुग्णालय आळंदी येथील क्ष-किरण मशीन व ईसीजी मशीन कार्यान्वित आहे. तसेच अतिरिक्त ईसीजी मशीन मागविण्यात आले आहे.ग्रामीण रुग्णालय आळंदी येथे दाखल होणारे रुग्ण व आपत्कालीन परिसरातील दाखल होणाऱ्या रुग्णास औषधोपचार वेळेत मिळण्याबाबत वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाचे नियोजन केले आहे.

आषाढीवारी काळात ग्रामीण रुग्णालयात तसेच पालखी तळावर स्त्री रोग वैद्यकीय अधिकारी उपलब्ध ठेवण्याचे नियोजन आहे. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना ड्रेस कोड मध्ये असण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. १ जून ते ३० जून या कालावधीत कोणालाही रजा मंजूर केल्या जाणार नाहीत अशा सुचना देण्यात आल्या आहेत.आषाढी पालखी कालावधी मध्ये परिस्थिती नियंत्रण राहण्याकरीता/दैनंदिन अहवाल सादर करण्याकरिता नोंडल अधिकारी म्हणून डॉ. सुचित्रा खेडकर यांची नेमणूक करण्यात आली आहे.

ग्रामीण रुग्णालय आळंदी व दर्शनी भागात आरोग्य शिक्षणविषयक प्रसिध्दी साहित्य लावण्यात आले आहेत.आषाढी वारी कालावधीत लागणारे मनुष्यबळ वरिष्ठ कार्यालयाकडून मागविण्यात आले आहे.या कालावधीत आपत्कालीन परिस्थितीत वेळेत औषधोपचार मिळविण्यासाठी आपत्कालीन नियंत्रण कक्षाचे (साथ रोग नियंत्रण कक्ष) नियोजन आहे.नियंत्रण कक्षात एक वैद्यकीय अधिकारी,एक अधिपरिचारिका,एक चतुर्थश्रेणी कर्मचारी वाहनचालकासह रुग्णवाहिकेचे २४ तास नियोजन आहे. आळंदी कार्यक्षेत्रातील सर्व हॉटेल चालकांना हॉटेल कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्याविषयी लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.ग्रामीण रुग्णालय आळंदी आवारातील पाणी साठवण्यात येणाऱ्या टाक्या धुवून साफसफाई करण्यात आल्या आहेत. तसेच वारीच्या कालावधीत पाणी कमी पडू नये, म्हणून नगरपरिषद आळंदी कडून पाण्याच्या टँकरद्वारे पाणी नियोजन करण्याचे नियोजन आहे.

ग्रामीण रुग्णालय आळंदी व पालखी तळ येथे रोजच्या रोज तयार होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावण्याच्या सुचना सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.मा.जिल्हा शल्यचिकित्सक पुणे यांच्याकडून वारीच्या कालावधीत लागणारे अतिरिक्त औषध/साहित्य पुरवठा पुरेसा उपलब्ध करून घेण्यात आला आहे. अतिरिक्त लागणारा सर्पदंश, श्वानदंश वरील लसी, औषधे उपलब्ध ठेवण्याचे नियोजन आहे.



## जागतिक योगदिन साजरा

**पिंपळे सौदागर :** आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून येथील शिव छत्रपती लिनिअर अर्बन गार्डन येथे नगरसेविका निर्मलाताई कुटे सोशल फाऊंडेशन आणि पतंजली योग समिती पिंपरी-चिंचवड च्या माध्यमातून "योग शिबिरा" चे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या प्रारंभी नगरसेविका निर्मलाताई कुटे यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर संदेश काटे, मल्हारी कुटे, संजय कुटे, अर्जुन काटे, सुरेश भालेराव, शैला गुजलवार, विलास नगरकर, रामभाऊ साळुंके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी पतंजली योग समितीच्या वतीने आचार्य अविनाशजी, आचार्य प्रीतिश लाडजी यांनी योगासनाचे महत्व सांगत मार्गदर्शन केले. इस्कॉन मंदीर समितीच्या वतीने "हरे राम,हरे कृष्ण" नामाचा जयघोष करीत भजन करण्यात आले. उत्साहात पार पडलेल्या या उपक्रमात पिंपळे सौदागर, रहाटणी भागातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याची माहिती संकेत कुटे यांनी दिली.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर 'ड्राय डे'चे आदेश

**पिंपरी :** जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची पालखी २८ जून तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी २९ जून रोजी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी ड्राय डे बाबत आदेश दिले आहेत. ज्या गावात पालखी असेल त्या ठिकाणी ड्राय डे असणार आहे. तसेच ज्या ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमण्याची शक्यता असेल अशी ठिकाणे व जागा बंद ठेवण्याबाबत पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलिसांना जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिल्या आहेत. तुकाराम महाराज पालखी २८ जून रोजी देहूगाव येथून प्रस्थान करणार आहे. त्या दिवशी पालखीचा मुक्काम इनामदार साहेब वाड्यात असेल. त्यामुळे २८ आणि २९ जून रोजी पालखी पिंपरी-चिंचवडच्या दिशेने प्रस्थान करेपर्यंत देहूगाव परिसरात ड्राय डे असेल. पालखीचा दुसरा मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात असतो. त्यामुळे २९ आणि ३० जून रोजी आकुर्डी प्रभाग क्षेत्रात दारू बंदी असेल. तिसरा मुक्काम नानापेठ पुणे येथील श्री निवडूंगा विठ्ठल मंदिरात पालखीचा मुक्काम असेल. त्यामुळे ३० जून आणि १ जुलै रोजी नाना पेठ प्रभाग क्षेत्रात दारू बंदी असेल. पुढे पालखी लोणी काळभोर, यावत, वरवंड, उंडवडी, बारामती, सणसर, आंथुर्णे, निमगाव केतकी, इंदापूर, सराटी येथे मुक्कामी असेल. मुक्कामाच्या परिसरात त्या त्या दिवशी ड्राय डे असेल आदेश जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी २९ जून रोजी आळंदी येथून प्रस्थान ठेवेल. पहिला मुक्काम गांधीवाडा आळंदी येथे असेल. २९ आणि ३० जून रोजी आळंदी नगरपरिषद क्षेत्रात दारूबंदी असेल.पालखीचा दुसरा मुक्काम पालखी विठोबा मंदिर भवानी पेठ पुणे येथे असेल. त्यामुळे ३० जून आणि १ जुलै रोजी भवानी पेठ प्रभाग क्षेत्रात ड्राय डे असेल. त्यानंतरचा मुक्काम सासवड, जेजुरी, वाल्हे येथे असेल. त्यानंतर पालखी सातारा जिल्ह्यात प्रवेश करेल. मुक्कामाच्या ठिकाणी तसेच पालखी प्रस्थान झाल्यानंतर दोन तासापर्यंत ड्राय डे असेल असे आदेशात म्हटले आहे.

## निषेध

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



# अतिक्रमण पथकाकडून झालेल्या मारहाणीचा फेरीवाल्यांनी केला निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण पथकाकडून व एमएसएफ जवानांकडून दापोडी येथे भाजीविक्रेत्या रेशमा कांबळे यांना झालेल्या मारहाणीचा फेरीवाल्यांनी निषेध केला आहे. त्यांची कायदेशीर लढाई लढण्यासाठी शहरातील सर्व फेरीवाल्यांचा समर्थन राहील असा विश्वास कामगार नेते काशिनाथ नखाते यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन मारहाण झालेल्या महिलेची भेट घेऊन घटनेची माहिती घेतली. यावेळी कार्याध्यक्ष इरफान चौधरी, ज्ञानेश्वर शेळके ,रॉबिन गजभिव, दीपक साळवे,संदेश बोर्डे, रवींद्र कांबळे, हनुमंत कसबे, जगन्नाथ काटे, ओमप्रकाश मोरया, अंबालाल सुखवाल, मनोज यादव, गौतम कांबळे, मुकेश सूर्यवंशी, दत्ता चौधरी, शिवाजी कांबळे, सिकंदर सूर्यवंशी, अर्चना कुटे आदी उपस्थित होते.

फेरीवाला कायद्याची अमलबजावणी न करता अत्यंत चुकीच्या पद्धतीने मारहाण करून फेरीवाला घटकाला संपवण्याचा प्रयत्न आयुक्त शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे हे हडपशाही व दादागिरी पद्धतीने करत आहेत. यामुळे गोरगरीब व सर्वसामान्य फेरीवाल्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. मोठमोठ्या प्लॉटवरील अतिक्रमण तसेच सरकारी जागेवरील अतिक्रमणाला आयुक्त व अतिरिक्त आयुक्त अभय देऊन त्यांच्यावर अजिबात कारवाई करीत नाहीत.

मात्र गरिबांना, फेरिवल्यांना छळले जात आहे. वास्तविक कायद्याची अंमलबजावणी न करता अशा पद्धतीने कारवाई करून जर फेरीवाला हटाव मोहिम करण्यात येणार असेल तर त्याला तेवढाच प्रतिकार करण्यात येईल. महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह हे शहरातील जनतेला वाऱ्यावर सोडून बिनधास्तपणे देशात आणि विदेशात पर्यटन करीत आहेत. शहरातील नागरिकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न, आरोग्य, असो की बेकायदेशीर होर्डिंग चा प्रश्न असो सर्व ठिकाणी प्रशासन अपयशी ठरल्याचे नखाते म्हणाले.



## वाल्हेकरवाडीतील शाळेत शिक्षकांची कमतरता

**पिंपरी :** वाल्हेकरवाडीतील महापालिकेच्या मुलांच्या शाळेमध्ये शिक्षकांची कमतरता आहे. रिक्त जागांवर शिक्षकांची नेमणूक करण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) महिला उपशहर संघटिका ज्योती संदीप भालके यांनी प्रशासकीय अधिकारी संगीता बांगर यांना निवेदन दिले आहे. यावेळी शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर, विभाग प्रमुख संदीप भालके उपशहर प्रमुख हरेश नखाते, उपशहर संघटिका रजनी वाघ, रहाटणी विभाग प्रमुख गोरख पाटील, चिंचवड विभाग प्रमुख किरण दळवी उपस्थित होते. वाल्हेकरवाडी शाळेमध्ये पहिली ते पाचवीची पटसंख्या ३५० आहे. तर सहावी ते सातवीचा पट १४० आहे. यानुसार शाळेमध्ये १४ शिक्षकांची आवश्यकता आहे. पटसंख्येनुसार शाळेला अजून ४ उपशिक्षक व ३ पदवीधर शिक्षकांची आवश्यकता आहे. तसेच, मुख्याध्यापिका देखील एक महिन्याने निवृत्त होणार आहेत. मुलांच्या सुट्या संपून शाळा चालू झालेली आहेत, तरी अद्याप शिक्षकांची नेमणूक झालेली नाही. शिक्षकांच्या कमतरतेमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे वाल्हेकरवाडीतील शाळेतील मुलांची गैरसोय होत असल्याने लवकरात लवकर शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली आहे.

## चऱ्होलीत परिवारसंवाद मेळावा

**चऱ्होली :** पुणे जिल्ह्यात वास्तव्यास असलेल्या नांदेडमधील लोहा-कंधारवासीयांचा येत्या रविवारी (दि.२३) च-होलीत परिवारसंवाद मेळावा आयोजित केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाराष्ट्र राज्य संघटक एकनाथ पवार यांनी हा मेळावा आयोजित केला आहे. च-होलीतील संकल्प मंगल कार्यालयात रविवारी सकाळी १० वाजता हा मेळावा होणार आहे. या मेळाव्याला शिवसेनेचे पुणे जिल्हा संपर्कप्रमुख, आमदार सचिन अहिर, उपनेते नितीन बानगुडे-पाटील, नांदेडचे संपर्कप्रमुख बबनराव थोरात मार्गदर्शन करणार आहेत. मावळचे संघटक संजोग वाघेरे-पाटील, जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख सचिन भोसले, नांदेडचे सहसंपर्कप्रमुख मुक्तेश्वर धोंडगे, महिला आघाडी प्रमुख जनाताई नाकाडे, उपजिल्हाप्रमुख संजय ढेपे, विधानसभा प्रमुख साहेबराव काळे, तालुकाप्रमुख चंद्रकांत क्षीरसागर, सचिन पेटकर, संजय ढाले, युवा सेनेचे दिगंबर इंगोले यावेळी उपस्थित राहणार आहेत. राज्य संघटक एकनाथ पवार म्हणाले, मराठवाड्यातील अनेक लोक उपजीविकेसाठी पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात स्थायिक झाले आहेत.

# शालेय शिक्षणात परदेशी भाषा अभ्यासाची गरज; तज्ज्ञांचे मत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** अनेक पालक आपला पाल्य डॉक्टर, इंजिनिअर आणि वकील होण्याचे स्वप्न पाहतात; परंतु उज्वल भविष्यासाठी इतरही अनेक संधी उपलब्ध आहेत. परदेशी भाषा शिक्षणातून विविध प्रकारच्या अनेक रोजगार विद्यार्थ्यांना मिळू शकतात. त्यासाठी शैक्षणिक संस्थांनी यामध्ये पुढाकार घेतला पाहिजे.

नोव्हेल इन्स्टिट्यूटने परदेशी भाषा शिक्षणातून विद्यार्थ्यांना शिक्षण देत उत्तम आदर्श निर्माण केला असून इतर शैक्षणिक संस्थांनी याचे अनुकरण केले पाहिजे म्हणजे सुजाण, उच्च शिक्षित पिढी निर्माण होईल, असे मत भाषा तज्ज्ञांनी व्यक्त केले.

'शालेय वयापासून परदेशी भाषा शिक्षण' या विषयावर नोव्हेल संस्थेच्या वतीने शनिवारी (22 जून) मोफत चर्चासत्राचे आयोजन निगडीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात केले होते. यामध्ये फ्रेंच ,जर्मन व इतर भाषांमध्ये करियर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थी व पालकांना तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी पिंपरी-चिंचवड शिक्षण



मंडळाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर, रवी राजापूरकर डॉ. शोभना पालेकर, मुक्ती पानसे, नॉव्हेल इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रिसर्चचे अध्यक्ष अमित गोरखे, शैलेश लेले,राजेश खरे, एमएनजीएलच्या ऋतूजा पायगुडे, हरिश्चंद्र गायकवाड आदी उपस्थित होते.

भाषातज्ज्ञ डॉ. सविता केळकर,सीएसआर संचालक बागेश्री मंथळकर, सीएसआर प्रमुख योगिता आपटे, प्रिया कुलकर्णी, आयआयसीएमआरच्या संस्थापक डॉ. अश्विनी कुलकर्णी, पिंपरी चिंचवड मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष कैलास पवळे, आरआयएएनचे संस्थापक आनंदसागर शिराळकर, अधिष्टी भट या तज्ज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अमित गोरखे प्रास्ताविकात म्हणाले की, नॉव्हेल इंस्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रिसर्च गेली बावीस वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी नॉव्हेल इन्स्टिट्यूटने परदेशी भाषा प्रशिक्षण समाजतल्या सर्व स्तरांपर्यंत पोचवण्यासाठी २०१९ मध्ये फॉरेन लँग्वेज ऑनलाईन अ‍ॅप्लिकेशन (एफएलओए) ची स्थापना केली.पुढे बोलताना गोरखे म्हणाले की.जेव्हा एखादा विद्यार्थी शाळेत प्रवेश घेतो तेव्हा त्याला अभ्यासक्रमातील विविध विषयांची ओळख करून दिली जाते. गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, मराठी, हिंदी, इंग्रजी हे विषय विद्यार्थ्यांनी शिकणे अनिवार्य आहे.

## केंद्रीय विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**देहूरोड :** के व्ही एस ऑडनन्स फॅक्टरी देहूरोड चा ' योग' हा अविभाज्य भाग आहे. आणि तो दररोज सकाळी आयोजित केला जातो. २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस केवीएस नंबर २ चे विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी संपूर्ण उत्साहात साजरा केला. सकाळच्या संमेलनात विद्यार्थ्यांनी केलेल्या



योगासनामध्ये सूर्यनमस्कार विर भद्रासन वृक्षासन, पश्चिमोठासन, गोमुख आसन अशी विविध असणे व विविध प्राणायाम करण्यात आले. विद्यार्थ्यांनी योगासनाचा आनंद लुटला. यावेळी प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग ही यामध्ये सहभागी झाला होता.

## मोफत शालेय साहित्य वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

# संदीप वाघेरे हे क्रियाशील नेतृत्व : खा. बारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्याचे काम नगरसेवक संदीप वाघेरे करीत आहेत सलग १४ वर्षे अविरतपणे चालणाऱ्या या उपक्रमांचे कौतुक करीत संदीप वाघेरे हे क्रियाशील नेतृत्व आहेत असे गौरौद्गार खासदार श्रीरंग बारणे यांनी काढले. तसेच विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करावेत तरच भविष्याची वाटचाल सुकर होऊ शकते कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक मिळविण्यासाठी सातत्य ठेवणे गरजेचे असते अस आपल्या मनोगतात सांगितलं.



पिंपरी येथील संदीप वाघेरे युवामंच च्या वतीने आयोजित इयत्ता दहावी व बारावी च्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ तसेच इयत्ता जुनिअर के. जी. ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप समारंभ उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी केलेल्या चमकदार कामगिरीचे सर्वच मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना जेष्ठ विचारवंत करियर मार्गदर्शन व्याख्याते श्री.वसंतजी हंकारे(सर) यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी इयत्ता १० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यामध्ये अभिनव बालन या विद्यार्थ्यास लॅपटॉप तसेच श्रद्धा जगदाळे व सोमा सृष्टी यांना टॅब तसेच दीक्षा कापसे, यश मदने या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग तसेच इयत्ता १२ वीच्या मास्करेंस श्रेयल या विद्यार्थीनीस लॅपटॉप तसेच आछरा चारू व भूमिका हुंदलानी यांना टॅब पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला तसेच इयत्ता ज्युनिअर केजी ते इयत्ता ८ वीच्या सुमारे १४४५ गरीब गरजू वियार्थ्यांना मोफत शालेय साहित्य ( वह्या कंपास ) चे वाटप करण्यात आले.

#रा

## आ. अतुल बेनके : नगरपरिषदेत कामकाज आढावा बैठक

# जुन्नर शहर अतिक्रमणे मुक्त करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** नगरपरिषदेमध्ये गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकीय कारभार सुरू असून शासन निधीतून शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. या कामाबाबत नागरिकांचे तसेच माजी नगरसेवक शहर लोकप्रतिनिधी यांचे काय मत आहे, हे जाणून घेण्याकरिता आणि प्रशासनात समन्वय राहण्याकरिता नगरपरिषदेत कामकाज आढावा बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी नगरपरिषदेतील विभाग प्रमुखांसह प्रमुख जबाबदार अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून नियमानुसार शहरात राहणे गरजेचे असल्याचे मत जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी व्यक्त केले. जुन्नर नगरपरिषद



येथील सभागृहात आमदार अतुल बेनके यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय कामकाजांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्याधिकारी प्रशासक संदीप भोळे, माजी नगराध्यक्ष श्याम पांडे, माजी उपनगराध्यक्ष दीपेश परदेशी, माजी नगरसेवक भाऊ कुंभार, फिरोज पठाण, अंकिता गोसावी, अश्विनी गवळी, मोनाली मस्के, कविता गुंजाळ, सुवर्णा बनकर, सना मन्सुरी, हाजरा इनामदार आदींसह स्थानिक नागरिक उपस्थित होते. जुने बस स्थानक ते पाच रस्ता चौक मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील फुटपाथवर झालेले अतिक्रमण येत्या काही दिवसात हटविण्याच्या सूचना आमदार बेनके यांनी यावेळी प्रशासनाला दिले. तसेच शहरात मोठ्या प्रमाणात लावण्यात येत असलेले फ्लेक्स तातडीने हटवून याबाबत नियमावली तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचीही सूचना त्यांनी दिल्या.

जुन्नर नगरपरिषद मालकीच्या पद्मावती तलाव परिसरात झालेली अतिक्रमणे मोजणी करून काढावी लागणार आहेत. तसेच नगरपरिषदेचा जलतरण तलाव अनेक वर्षांपासून बंद आहे तो नव्याने दुरुस्त करण्याकरिता सुमारे एक कोटीचा निधी नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वाढते शहरीकरण यामुळे जुन्नर शहराची हद्द वाढविणे गरजेचे असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा, शहरातील भटकी जनावरे, कुत्री तसेच रस्त्यावरील अतिक्रमणे, हातगाडी व भाजीपाला फळ विक्रेते यांची मोठ्या प्रमाणात झालेली अतिक्रमणे येत्या काही दिवसात काढण्यात येणार असून अतिक्रमण मुक्त जुन्नर शहर करण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांना कमी दाबाने तसेच अस्वच्छ पाणीपुरवठा होत असल्याच्या अनेक तक्रारी आल्याने यंत्रणेत योग्य ती दुरुस्ती करून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. तसेच आगामी काळात साथीचे आजार रोखण्याकरिता शहरात नियमितपणे धुरळणी तसेच नालेसफाई, ठीक-ठिकाणी साठणारे सांडपाणी व कचरा याबाबत गांभीर्याने उपाययोजना करण्याच्या सूचना आमदार बेनके यांनी यावेळी देऊन या सर्व सूचनांबाबत होणाऱ्या कार्यवाहीसाठी पुढील महिन्यात पुन्हा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. या बैठकीला उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्यावतीने आलेल्या विविध समस्या उपस्थित करून नगरपरिषदेकडून ठोस उपयोजना होण्याबाबत सूचना केल्या.

# जिल्ह्यातील पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण करावे : एस. एम. देशमुख

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मराठी पत्रकार परिषद पुढील काळात कार्यरत होणार आहे. स्थानिकांकडून पत्रकारांना त्रास दिला जातो. या पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा संघाच्या कार्यकारणी तालुकानिहाय बैठकांचे आयोजन करावे, नवनियुक्त पदाधिकार्यांनी प्रत्येक महिन्याला एका तालुक्यातील सदस्यांसोबत बैठक घेऊन मराठी पत्रकार परिषद आपल्या पाठीशी खंबीर असल्याचा विश्वास देणे गरजेचे असल्याचे मत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी व्यक्त केले.

मराठी पत्रकार परिषद मुंबई संचलित पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या नवनियुक्त अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा मेळावा व नियुक्ती प्रमाणपत्र वितरण समारंभ मधुबन लॉन्स, कवडीपाठ ता. हवेली येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हर्चुएल) पद्धतीने लंडन येथून मार्गदर्शन करत नवनियुक्त पदाधिकार्यांचे अभिनंदन केले. यावेळी व्यासपीठावर मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशी, परिषद प्रतिनिधी एम. जी. शेलार, मुंबई विभाग अध्यक्ष राजा आदाटे, श्रीराम कुमठेकर आदी उपस्थित होते. पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या नवनियुक्त पदाधिकारी मेळावा व नियुक्ती प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन हवेली तालुका मराठी पत्रकार संघाचा वतीने करण्यात आले होते. हवेली तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मेळावा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक होते. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व आचार्य अत्रे यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाला पुणे जिल्ह्यातील तेरा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुणे जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर यांनी मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.

## पत्रकारांचा मेळावा!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**वाल्हे :** ता. हवेली कवडीपाठ या ठिकाणी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर पत्रकार बांधव उपस्थित होते.

# भिंत दुर्घटनेत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** डिंग्रजवाडी येथील आय टी डब्ल्यू प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमसमोरील एका कंपनीच्या मालकीची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू होऊन तिघे जखमी तर नऊ दुचाक्यांसह दोन सायकल, एक कार व एका बसचे नुकसान झाल्याची घटना घडली होती.

शिक्रापूर पोलिसांनी समोरील मुसद्दीलाल प्रॉपर्टीज कंपनीच्या व्यवस्थापकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करत पुरुषोत्तम चोगीलाल लाड यांना अटक केली आहे. डिंग्रजवाडी ता. शिरुर येथील आय टी डब्ल्यू प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये १९ जून रोजी सकाळच्या सुमारास कामगार कामावर आलेले असताना कंपनी समोरील मुसद्दीलाल प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची भिंत कोसळून दोघा कामगारांचा मृत्यू होऊन, तिघे जखमी झाले. तसेच दुचाकी, कारसह बसचे मोठे नुकसान झाले.

POSITIVE NEWS!

सासवड

## दप्तर, वह्या, कलर खडू, चित्रकला वहीचे वाटप



# विद्यार्थांना शालेय साहित्याचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर या विद्यालयात जागतिक योग दिन व वट पोर्णिमाचे औचित्य साधत सहयोग फाऊंडेशन पुणे व स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठान, सासवड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयातील ६० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यामध्ये दप्तर, वह्या, कलर खडू, चित्रकला वही व अवांतर वाचनाचे एक पुस्तक इत्यादी साहित्याचा त्यामध्ये समावेश होतो. आत्तापर्यंत स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने पुरंदर तालुक्यात १००० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष एकनाथ जगताप यांच्या वतीने माहूर विद्यालयातील विद्यार्थी पुरंदर तालुक्यात दहावीच्या परीक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला, तर त्याला दहा हजार रूपये रोख देण्यात येतील, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.

भारत देशात प्राचीन काळी योगाचा जन्म झाला. भारतीय संस्कृतीत योगास खूप महत्त्वाचे स्थान आहे. योगामुळे आपले शरीर व मन निरोगी ठेवले जाते. योगामुळे अनेक असाध्य रोग बरे करण्याची अद्भुत क्षमता आहे. योग केवळ व्यायाम नाही, तर तो शरीर व मन एकत्र जोडण्याचे महत्त्वपूर्ण काम करतो, असे संतोष जगताप यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून म्हाळसाकांत महाविद्यालयाचे प्राचार्य रवि जगताप यांनीही इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे २५००, २००० आणि १५०० रुपये असे बक्षीस देण्याचे जाहीर केले. जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन करून शाळेच्या व गावाच्या नावलौकिकात भर पाडावी यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळवण्यासाठी ही बक्षिसे जाहीर केली आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब भंडलकर, स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष एकनाथ जगताप, माजी प्राचार्य जगताप, अनुजा गायकवाड, विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यालयातील सर्व विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# वाघोली रस्त्यावरील विद्युत पोल काढून भूमिगत लाईनचे काम होणार : शांताराम कटके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** पुणे महापालिकेचे शासन नियुक्त नगरसेवक तथा वाघोलीचे माजी उपसरपंच शांताराम कटके, संदीप सातव व महावितरणचे सहाय्यक अभियंता दिपक बाबर यांनी वाघोली येथील वाहतुकीस अडथळा ठरणारे विद्युत पोल काढून त्याची भूमिगत लाईन करण्याच्या कामाची पाहणी केली.

पीएमसी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामाचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून, लोहगाव चौकातील ३ ते ४ विद्युत पोल काढणे, नगर रोड केसनंद फाटा, पेट्रोल पंप ते आव्हाळवाडी फाटा येथील ७ ते ८ विद्युत पोलचे स्थलांतर होणार असल्याचे कटके यांनी सांगितले.

या कामासाठी पीएमसीकडून ८४ लक्ष रुपये, तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ३५ लक्ष रुपयांचा निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे वाहतूकीस अडथळा ठरणाऱ्या व धोकादायक असणाऱ्या विद्युत पोलचे काम लवकरच पूर्णत्वास जाऊन वाघोली रोड तसेच परिसरातील वाहतूक सुरळीत आणि सोयीस्कर होण्यास मदत होणार आहे, असे कटके यांनी सांगितले. पाहणीवेळी पुणे महानगरपालिका विकास समिती सदस्य शांताराम बापू कटके आदी उपस्थित होते.

## अपुऱ्या निधीअभावी काम रखडले...

# अंगणवाडीच्या इमारतीला मुहूर्त केव्हा लागणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** अपुरा निधी असल्याने कोहिंडे बुद्रुक (ता. खेड) येथील लहान मुलांच्या अंगणवाडीचे काम हे गेल्या तीन वर्षांपासून अर्धवट स्थितीत रखडले आहे. यामुळे अंगणवाडीतील बालकांना साधी बसायला जागा नसल्याने अक्षरशः अडचणीच्या ठिकाणी बसण्याची नामुष्की त्यांच्यावर आल्याची सत्यस्थिती पाहायला मिळत आहे.

पुणे जिल्ह्यातील ११७ अपूर्ण अवस्थेतील अंगणवाड्याना निधी नुकताच मंजूर करण्यात आला. परंतु खेड तालुक्यातील अपूर्ण अवस्थेतील ७ अंगणवाड्याना



कोहिंडे बुद्रुक येथील अंगणवाडीचे काम अर्धवट अस्वथेत असल्याचे दिसत आहे.

निधी मिळावा, यासाठी खेड पंचायत समितीतील एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून लेखी रिपोर्ट जिल्हा परिषदेला गेलाच नाही. यामुळे तालुक्यातील अंगणवाड्याना निधी मंजूर झाला नाही.

कोहिंडे बुद्रुक गावठाणातील अंगणवाडी इमारत उभारली. पण दरवाजे व खिडक्या बसविल्या नाहीत. इमारतीला प्लास्टर नाही, फरशी बसविली नाही. रंगरंगोटी केली नाही, अशी अनेक कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे येथील अंगणवाडीतील लहान बालके कुठेतरी अडचणीच्या ठिकाणी बसत आहेत. इमारतीचे काम अपूर्ण असल्याचे स्थानिक ग्रामपंचायत, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच विस्तार अधिकाऱ्यांना लेखी पत्र दिले. परंतु, विस्तार अधिकाऱ्यांनी कधीही अंगणवाड्यांचे बांधकाम काय स्थितीत आहे, यासाठी कामास्थळी पाहणी न केल्याने ही बाब त्यांच्या निदर्शनास आली नाही. अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे.

> कोहिडे बुद्रुक गावठाण अंगणवाडीचे ३ वर्षांपासून काम अपुऱ्या निधीमुळे अर्धवट आहे. अनेक वेळा जिल्हा नियोजन समितीच्या आढाव्यात हा विषय झाला.जिल्ह्यातील अर्धवट अंगणवाड्यांना निधी उपलब्ध करून दिला.पण आत्तापर्यंत कोहिंडे बुद्रुक अंगणवाडीला निधी मिळाला नाही. बिचारी लहान मुले अडचणीत बसतात मात्र प्रशासनाला साधा रिपोर्ट करायला वेळ नाही.तालुक्याचे अधिकारी असे बेफिकीर वागत असून यांचेवर कारवाई व्हायला पाहिजे.
>
> — **शरद बुट्टे पाटील,** सदस्य,जिल्हा नियोजन समिती

#रा

Selected

## कोंढापुरीत वाहनाच्या धडकेत ५ वर्षे वयाच्या नर वानराचा दुर्देवी मृत्यू

**शिक्रापूर :** येथील पुणे-नगर महामार्गावर शुक्रवारी पहाटेच्या सुमारास एका वानराचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली असून, वनविभागाच्या वतीने वानराचा पंचनामा करत वानराला ताब्यात घेऊन त्याचे दहन करण्यात आहे. कोंढापुरी ता. शिरुर येथील पुणे-नगर महामार्गावर शनिवारी पहाटेच्या सुमारास एका वानराला वाहनाची धडक बसून वानर ठार झाल्याचे काही नागरिकांना दिसले. याबाबतची माहिती शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांना मिळताच वनपाल गौरी हिंगणे, निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व वनविभाग रेस्क्यू टीमचे सदस्य शेरखान शेख, अमोल कुसाळकर यांनी सदर ठिकाणी धाव घेत पाहणी केली असता, अंदाजे पाच वर्षे वयाच्या नर जातीच्या वानराचा वाहनाच्या धडकेने मृत्यू झाल्याचे निष्पन्न आले आहे. यावेळी वनविभाग अधिकारी व प्राणी मित्रांनी मृत वानराचा पंचनामा करुन वानराचा मृतदेह ताब्यात घेतला. दरम्यान, सदर मृत वानराचे शवविच्छेदन करत त्याचे शासकीय जागेत दहन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.



**पुरंदर :** डॉक्टर असोशियशनच्या वतीने जागतिक योगदिन व वटपौर्णिमा निमित्त वटवृक्ष लावण्यात आले.

## पुरंदर डॉक्टर असोसिएशन आयोजित योगसप्ताहची सांगता

**जेजुरी :** पुरंदर डॉक्टर असोशियशनच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त योग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. विविध योगा उपक्रमांनी या सप्ताहाची सांगता करण्यात आली. पुरंदर डॉक्टर असोशियशनच्या वतीने १५ जून ते २१ जून या कालावधीत योग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात वैद्य घनश्याम खांडेकर व वैद्य खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग मंत्र, सूर्यनमस्कार, चेतना साधना, विविध योगासने, पतंजली योग सूत्र पठण करण्यात आली. जागतिक योग दिनानिमित्त या सप्ताहाची सांगता करण्यात आली असल्याचे पुरंदर डॉक्टर असोशियशनचे अध्यक्ष डॉ. प्रवीण जगताप यांनी सांगितले. जागतिक योग दिन व वटपौर्णिमेचा दुग्ध शर्करा योग जुळून आल्यामुळे वटपौर्णिमेनिमित्त वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉ. खांडेकर, मेघा निरगुडे, कामठे, निगडे यांनी वटवृक्षाचे पूजन केले. तसेच सासवड येथील पालखी मैदानावर पुरंदर मेडिकल असोसिएशन व सासवड नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वटवृक्ष लावण्यात आला. यावेळी सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण व आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण व नगरपालिकेतील आधिकारी वर्ग उपस्थित होते. पुरंदर मेडिकल असोसिएशनचे सभासद डॉ. विनायक बांदेकर अध्यक्ष डॉ. प्रवीण जगताप उपाध्यक्ष डॉ. सचिन निरगुडे डॉ. नीरज कामठे डॉ. सुनील बोत्रे यांनी या सप्ताहाचे आयोजन केले होते.

## पतीच्या भांडणामुळे दीड वर्षीय बालिकेसह विवाहिता बेपत्ता

**शिक्रापूर :** सणसवाडी येथून दीड वर्षीय बालिकेसह विवाहिता बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. बेपत्ता विवहितेच्या वडिलांनी



शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याची माहिती शिक्रापूर पोलिसांनी दिली आहे. सणसवाडी येथील अनिल भारती यांची मुलगी दिपिका पती सोबत झालेल्या वादामुळे काही दिवसांपासून तिच्या दिड वर्षीय स्वरा मुलीसह वडिलांच्या येथे राहते, २० जून रोजी अनिल कामाला गेल्यानंतर दिपिका घरीच होती. दुपारनंतर अनिल कामावरून आले असता, घराला कुलूप होते, तर दिपिका घरी नव्हती. त्यांनतर सायंकाळी उशिरापर्यंत दिपिका घरी न आल्याने तिचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, ती कोठे मिळून न असल्याने याबाबत बेपत्ता विवाहितेचे वडील अनिल महादेव भारती वय ५४ वर्षे रा. सणसवाडी मूळ रा. नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली आहे. बेपत्ता महिलेबाबत कोणाकडे काही माहिती असल्यास शिक्रापूर पोलिसांची संपर्क साधण्याचे आवाहन शिक्रापूर पोलिसांनी केले आहे. पुढील तपास पोलीस नाईक राकेश मळेकर हे करत आहे.

### संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी आगमनाने नाशिक नगरीत चैतन्य बहरले..

# नाशिक शहर हरिनामाच्या गजराने दुमदुमले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक** : श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील गुरुवारी संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांची पालखी मोठ्या उत्साहात निघाली आहे. आज नाशिक शहरात पालखी दाखल झाली तेव्हा सर्वत्र हरिनामाच्या गजराने रस्ते दुमदुमून गेले होते. संत निवृत्तिनाथांच्या संजीवन समाधी मंदिरापासून पंढरीच्या दिशेने चालली आहे.

टाळ-मृदुंगाच्या घोषात हरिनामाचा गजर करीत निवृत्तिनाथ महाराजांची पालखी व सोबतच्या ५१ दिंड्यांचे आज (दि. २२) नाशिक शहरात स्वागत करण्यात आले. सकाळी ९ वाजता नाशिक पंचायत समिती, त्र्यंबकरोड येथे या पालखी सोहळ्याचे प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, महापालिका आयुक्त डॉ. करंजकर, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अशीमा मित्तल यांच्यासह अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान काल पालखीचे सातपूर गावात आगमन झाले, तेव्हा खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सीमा हिरे, माजी महापौर दशरथ पाटील आदींसह अनेक राजकीय नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्वागत करीत पालखीचे दर्शन घेतले

यंदाच्या पालखी सोहळ्यात मानाच्या चार व इतर ४७ अशा ५१ दिंड्या उत्तर महाराष्ट्रातून सहभागी झाल्या आहेत. २७ दिवसांच्या प्रवासानंतर आषाढ शुद्ध नवमीस म्हणजे दि. १५ जुलै रोजी दिंड्या चंद्रभागेत स्नान करतील. दशमी तिथीस म्हणजेच दि. १६ जुलै रोजी पालखी श्रीक्षेत्र पंढरपुरात पोहोचेल.

त्र्यंबकेश्वर येथून गुरुवारी (ता. २०) निघालेली संतश्रेष्ठ निवृत्तिनाथांची पालखी सातपूरमध्ये शुक्रवारी (ता. २१) दाखल झाली. सातपूरकर, पोलिस प्रशासनासह महापालिका, सार्वजनिक मंडळ व नागरिकांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत केले.

दरम्यान पहाटेच्या सुमारास पारंपारिक पूजा विधी झाल्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि हजारो वारकऱ्यांच्या उपस्थित पालखी पंढरपूरच्या दिशेने रवाना झाली. यावेळी वारकऱ्यांच्या विठुरायाच्या जयघोषांनी नाशिकनगरी दुमदुमली गेली होती. सनई चौघडे आणि टाळ-मृदुंगाचा गजर, राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले हजारो वारकरी, त्यांच्या हातात असलेले भगवे ध्वज आणि "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय" चा गजर करत करण्यात आला.

## पालकमंत्री खाडेंची मोटार अडवली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली** : शेतकऱ्यांना भूमीहीन करुन महापूराचा धोका वाढविणारा प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी सुरु असणाऱ्या आंदोलनावेळी शनिवारी पालकमंत्री सुरेश खाडे यांची मोटार अडवण्यात आली. सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कॉंग्रेसच्यावतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात खा. विशाल पाटील, आ. डॉ. विश्वजित कदम, आ. विक्रम सावंत, शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांच्यासह शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. महामार्ग स्थिगत करण्याऐवजी सरकारने रद्द करावा अशी आग्रही मागणी करण्यात आली. पालकमंत्री खाडे नियोजन समितीच्या बैठकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असताना अडवण्यात आले.

## लोकसभेच्या हंगामी अध्यक्षपदावरुन वाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने लोकसभेच्या हंगामी अध्यक्षपदी ओडिशाचे खासदार भर्तृहरी महताब यांची नियुक्ती केल्यानंतर वादाला तोंड फुटले आहे. विरोधकांनी या नियुक्तीवर आक्षेप घेतला असून संसदीय नियमांचा भंग होत असल्याचे म्हटले आहे. नियमानुसार सभागृहातील सर्वात ज्येष्ठ खासदार असलेल्या काँग्रेसचे केरळमधील खासदार कोडीकुन्नील सुरेश यांची नियुक्ती व्हायला हवी, अशी मागणी विरोधकांनी केली आहे. ओडिशाचे महताब हे सात वेळा खासदार राहिले आहेत. तर केरळचे सुरेश हे आठवेळा खासदार म्हणून निवडून आले आहेत. सुरेश यांची नियमाप्रमाणे हंगामी अध्यक्षपदी निवड न झाल्यामुळे काँग्रेसने केंद्र सरकारवर दलित विरोधी असल्याचा आरोप लावला आहे. खासदार सुरेश दलित असल्यामुळेच त्यांना बाजूला करण्यात आले, अशी टीका काँग्रेसने केली. या आरोपाला इंडिया आघाडीतील मित्र पक्ष असलेल्या सीपीआय (एम) नेही दुजोरा दिला आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन म्हणाले की, केंद्र सरकारच्या निर्णयामागे वरच्या जात समूहांचे राजकारण दिसून येते. विरोधकांच्या आरोपांना संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रत्युत्तर दिले आहे. वेस्टमिन्स्टर पद्धतीप्रमाणे ज्या खासदाराने सर्वाधिक कार्यकाळ अखंडपणे सभागृहाचे प्रतिनिधित्व केले आहे, त्यांनाच हंगामी अध्यक्ष म्हणून नेमले आहे.

काँग्रेसचे खासदार आणि माध्यम विभागाचे प्रमुख जयराम रमेश म्हणाले होते की, भाजपाची बुलडोजरवाली मानसिकता यातून दिसून येते. केरळमधील सुरेश यांना हंगामी अध्यक्षपद न देण्यामागे भाजपाची दलितविरोधी मानसिकता दिसून येते. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः दलितविरोधी आहेत. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन म्हणाले की, हंगामी अध्यक्षपदाच्या नेमणुकीवरुन संसदीय नियमांना पायदळी तुडवले गेले आहे. "मावेलिक्करा लोकसभेचे खासदार कोडीकुन्नील सुरेश हे सर्वाधिक काळ खासदार राहिले आहेत. तरी त्यांना दुर्लक्षित केले गेले. या निर्णयामागे संघ परिवाराचे उच्चवर्णीय राजकारण आहे, असे आरोप जर केले तर त्यावर भाजपाचे उत्तर काय?", असा सवाल मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी उपस्थित केला.

## कर्नाटकमध्ये राहणाऱ्यांनी कन्नड शिकावी-सिद्धरामय्या

**दिल्ली** : महाराष्ट्रात मराठी भाषेचे पतन होत असताना इतर राज्य मात्र त्यांची भाषा जतन करण्यासाठी पुढाकार घेताना दिसत आहेत. कर्नाटक हे राज्य मातृभाषेसाठी पूर्वीपासून आग्रही असल्याचे अनेकदा दिसले आहे.

सीमावर्ती भागातील मराठी बांधवांनी कन्नडमध्येच व्यवहार करावेत, यासाठीही अनेकदा तिथे संघर्ष उडालेला आहे. आता कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कन्नडीगांसाठी केलेले एक आवाहन चर्चेचा विषय ठरत आहे. कन्नडीगांनी आपल्या भाषेचा अभिमान बाळगला पाहीजे. यासाठी राज्यातील प्रत्येकाने कन्नडमध्येच बोलले पाहीजे, इतर दुसऱ्या भाषांचा वापर करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.कर्नाटक विधिमंडळाच्या पश्चिम द्वाराजवळ उभारण्यात आलेल्या नाददेवी भूवनेश्वरी मातेच्या पुतळ्याचे उद्घाटन करत असताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कन्नड भाषेबद्दल आपले विचार व्यक्त केले. कर्नाटकमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाने कन्नडमध्येच बोलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कन्नड वगळता इतर कोणतीही भाषा बोलली जाणार नाही, अशी शपथ सर्वांनी घ्यावी. कन्नड लोक उदार असल्यामुळेच आता इतर भाषा बोलून आपण कर्नाटकमध्ये राहू शकतो, असे वातावरण निर्माण झाले आहे. हीच परिस्थिती तुम्हाला तमिळनाडू, आंध्रप्रदेश किंवा केरळ या राज्यात दिसणार नाही. तिथे फक्त त्यांच्या मातृभाषेत संवाद साधला जातो. त्यामुळे आपणही आपल्याच मातृभाषेत संवाद साधला पाहिजे. हीच आपल्यासाठी अभिमानाची बाब असेल", अशी भावना सिद्धरामय्या यांनी बोलताना व्यक्त केली.

## » Selected

### १३ लाख रोकड, सोन्याचे नाणे जप्त

**नाशिक** : मालेगाव महापालिकेतील सहायक प्रभारी कर आयुक्त सचिन सुरेंद्र महाले यांना ३३ हजारांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. या लाचखोर सहायक प्रभारी आयुक्तांकडे १३ लाख रोकड, सोन्याचे नाणे आणि सोने सापडले. नाला बांधकामाचे टेंडर तक्रारदार यांच्या भावाने घेतले होते. त्याप्रमाणे काम पूर्ण करून केलेल्या नाला बांधकामाचे बिल मंजूर करून देतो असे सांगून बिल मंजूर झाल्यावर स्वतःसाठी व इतरांसाठी चार टक्के प्रमाणे पैसे द्यावे लागतील असे सांगितले होते. बांधकामाचे बिल मंजूर झाल्यानंतर तक्रार दार लाचखोर सचिन महाले यांना भेटण्यासाठी गेले असता ३३ हजार रुपये मागितले. पैसे स्वीकारताना महाले यांना सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक गायत्री जाधव, हवालदार संदीप वणवे, ज्योती शार्दूल, हवालदार परशुराम जाधव यांच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

### मुंबईत पावसाचा जोर वाढला

**मुंबई** : मुंबई आणि उपनगरांत शनिवारी पहाटेपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. मात्र, दुपारनंतर पावसाचा जोर वाढला. दरम्यान, पुढील दोन दिवस मुंबईत गडगडाटासह पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. यंदा मोसमी पाऊस लवकर दाखल झाला. मात्र त्याने काही काळ विश्रांती घेतली होती. मागील दोन दिवसांपासून शहर आणि उपनगरांत पावसाची रिपरिप सुरू झाली असून उपनगरांत पावसाचा जोर वाढू लागला आहे. शहरात शनिवारी पहाटेपासून पाऊस सुरू झाला असून दुपारी दोन वाजल्यापासून पावसाचा जोर वाढला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस मुंबईत गडगडाटासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तसेच शहरात सोमवारपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### पेपरफुटी प्रकरणी कठोर नियम

**नवी दिल्ली** : नीट आणि युजीसी नेट या परीक्षांचे पेपर फुटल्यानंतर भविष्यात पेपरफुटीच्या अशा घटनांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा कायद्याच्या तरतुदी लागू केल्या आहेत. त्यानुसार परीक्षेत होणाऱ्या फसवणुकीसाठी किमान तीन ते पाच वर्षांच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. तर पेपर फोडणाऱ्यांना ५ ते १० वर्षे तुरुंगवास आणि किमान एक कोटी रुपयांचा दंड ठोठावला जाईल, अशी तरतूद करण्यात आली आहे. संसदेने सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ फेब्रुवारी महिन्यात मंजूर केला होता. परीक्षा आयोजित करणारी संस्था, सेवा पुरवठादार किंवा इतर कोणत्याही संस्थेने कोणताही संघटित गुन्हा केल्यास, त्यांना कमीत कमी पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा होईल. ती दहा वर्षांपर्यंत वाढू शकते. तसेच एक कोटींचा दंडही होऊ शकतो. केंद्रीय लोकसेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे, बँकिंग भरती परीक्षा आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतलेल्या सार्वजनिक परीक्षांमध्ये अन्यायकारक मार्ग रोखणे हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे.

## फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेऊ! काय चुकलं याचं विचार मंथन : राजू शेट्टी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर** : पराभवाने खचणारा मी माणूस नाही. शेतकरी चळवळ हा माझा आत्मा आहे. मी कष्टकऱ्यांमागे सावली प्रमाणे असून त्यांच्या न्याय प्रश्नासाठी मी सदैव लढत राहिन. निवडणूक लढवणे ही माझे साध्य नाही. आम्ही फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा उभारी घेऊ, आमचं काय चुकले यावर मंथन करून पुढील राजकीय दिशा ठरवू, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केले. ते बारामती येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत सहभागी झाले होते. बारामती येथे दोन दिवसीय राज्य कार्यकारिणीच्या बैठकीस सुरूवात झाली. यावेळी सतिश काकडे अध्यक्षस्थानी होते.यावेळी बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांचे प्रश्न अजून मिटले नाहीत. राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणाने हा पिचलेला आहे. दिवसा विजेची मागणी आम्ही कित्येक दिवसापासून मागत आहोत. तरीदेखील सरकार द्यायला तयार नाही. धरणे आमची, जमिनी आमच्या, पाणी देखील आमचेच मग आमच्या शेतीला वीज द्यायला हाताला लकवा मारलाय काय? उसाच्या एफआरपीचा कायदा महाविकास आघाडी सरकारने मोडित काढला. भूमिअधिग्रहण कायद्यात बदल करून शेतकऱ्यांवर वरवंटा फिरवला आहे.

## कोकण, विदर्भासह मराठवाड्याला पावसाने झोडपले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यात विविध भागात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. ठाण्यात पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली, त्यामुळे कामगार वर्गाचे हाल झाले. मुंबईकरांना मात्र, अद्याप पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मुंबईत तुरळक ठिकाणे वगळता गेल्या चार दिवसांपासून पाऊस दडी मारुन बसला आहे. ठिकठिकाणी पाणी साचण्यास सुरुवात झाली. पावसाळ्यामुळे वाहतूक धिम्या गतीने सुरु होती. वंदना डेपो परिसरात पाणी साचायला सुरुवात झाली. शुक्रवारी दिवसभराच्या विश्रांतीनंतर आज पालघरमध्ये पुन्हा एकदा मुसळधार पाऊस सुरू झाला. पहाटेपासूनच पालघर, बोईसर परिसरात मुसळधार पाऊस पाहायला मिळाला. भात पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

## कडक सुरक्षा

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**नवी दिल्ली** : उत्तरी काश्मीरच्या बारामुला जिल्ह्यामधील उरीतल्या गोहलान भागात भारतीय सेना आणि संयुक्त सुरक्षा दलांच्या जवानांनी घुसखोरीचे प्रयत्न हाणून पाडले. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुरक्षा यंत्रणांनी उरीच्या जवळ दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. हे दोघेही घुसखोरी करण्याचा प्रयत्न करीत होते.

## पान १ वरून

### हाकेंची समजूत; उपोषण स्थगित

नेहमीच्या शैलीत शेरोशायरी करत ओबीसी आंदोलकांमध्ये ऊर्जा फुंकली. 'अब जंग लगी तलवार पर अब धार लगानी होगी, कुछ लोग अपनी औकात भुल गए, शायद अपनी याद उनको दिलानी होगी,' असे भुजबळ यांनी म्हणताच ओबीसी आंदोलकांनी एकच गलका केला.

### उरीमध्ये सुरक्षा यंत्रणा आणि...

मिळालेली नाही. सुरक्षा यंत्रणा याबाबतचा तपास करत आहे. यापूर्वी बुधवारी २१ जून रोजी बालामुला येथील चकमकीत सुरक्षा यंत्रणांनी दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. ते दोघेही तष्कर-ए-तय्यबाशी जोडलेले होते.

### रामलल्ला प्राणप्रतिष्ठा...

या पूजेत त्यांचा मुलगा आणि कुटुंबातील इतर सदस्यही सहभागी झाले होते. तसेच डिसेंबर २०२१ मध्ये काशी विश्वनाथ धामच्या उद्घाटनाच्या पूजेतही ते सहभागी झाले होते.

त्यांनी वेद आणि अनुष्ठानांची दीक्षा आपले चुलते गणेश दीक्षित भट्ट यांच्याकडून घेतली होती. लक्ष्मीकांत दीक्षित यांचे महाराष्ट्राशी जवळचे नाते आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकामध्ये दीक्षित यांच्या पूर्वजांचाही सहभाग होता.

### फुले स्मारक विस्तारीकरणाला गती

पालकमंत्री अजित पवार यांनी आवश्यक जागेच्या संपादनाला सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत. भुसपंदनाचा खर्च राज्यसरकार करणार आहे. यासंदर्भाने आज स्थानीक क्षेत्रिय अधिकारी आणि अभियंत्यांची बैठक घेतली. घर मालक आणि भाडेकरूंसोबत संवाद साधून भूसंपादनाचा तोडगा काढण्यात येईल. तत्पुर्वी संबधित घरमालक आणि भाडेकरूंना नोटीसेस पाठविण्यात येतील. सर्व संमतीनेच संपादनाची प्रक्रिया करण्यात येईल, असे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आणि शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी सांगितले.शहराच्या मध्यवस्तीमधील गंज पेठेत महात्मा ज्योतिराव फुले वाडा आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे दिडशे मीटर अंतरावरच वेगवेगळी स्मारक आहेत. ही दोन्ही स्मारक एकत्रित विकास करण्यासाठी १० हजार ९४२ चौरस मीटर क्षेत्र संपादीत करण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे.या जागेवर आजमितीला जुनी घरे आणि वाडे असून तिथे ५१६ घर मालक तर २८६ भाडेकरू अशी सुमारे ८०२ कुटुंब वास्तव्यास आहेत. येथील रहिवाश्यांचे सामंजस्यांने भूसंपादन केले जाणार आहे.

### येत्या ४८ तासांत मुसळधार पावसाची शक्यता...

आहे. रायगड, रत्नागिरीसह कोकणात पुढील दोन दिवस आणखी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून हवामान विभागाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. महाडमध्ये एनडीआरएफची टीम तैनात करण्यात आली आहे. खेड शहरात सखल भागात पाणी साचायला सुरुवात झाली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे खेडमधील जगबुडी नदीला पूर आला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, खेड, दापोली भागात कालपासून पाऊस सुरू आहे त्यामुळे या भागातील नद्या पूर्ण क्षमतेने भरून वाहत आहेत.

### बीएलएस इंटरनॅशनलचे मुंबईत अत्याधुनिक व्हिसा अर्ज केंद्राचे उद्घाटन

## ...आता व्हिसा अर्ज प्रक्रिया होणार सक्षम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : सरकार आणि नागरिकांसाठी एक विश्वासार्ह जागतिक तंत्रज्ञान-सक्षम सेवा भागीदार आणि व्हिसा प्रक्रिया आणि कॉन्सुलर सेवांमध्ये जागतिक अग्रणी, बीएलएस इंटरनॅशनलने आज मुंबईत त्यांच्या नवीन व्हिसा अर्ज केंद्राच्या उद्घाटनाची घोषणा केली. हे नवीन केंद्र बीएलएस इंटरनॅशनलच्या ग्राहकांचा अनुभव वाढविण्याच्या आणि व्हिसा अर्ज प्रक्रिया सुव्यवस्थित करण्याच्या वचनबद्धतेचा एक भाग आहे.

नरिमन पॉइंट येथे नव्याने उद्घाटन करण्यात आलेले व्हिसा अर्ज केंद्र, स्पेनवर विशेष लक्ष केंद्रित करून व्हिसा अर्जांची वाढती मागणी पूर्ण करेल. ही सुविधा स्लोव्हाकिया, इजिप्त, गांबिया, मोरोक्को आणि दक्षिण कोरियाच्या व्हिसासाठी अर्ज हाताळेल. हे सर्व अल्प-मुदतीचे आणि दीर्घकालीन व्हिसा हाताळेल, प्रवाशांच्या विस्तृत गरजा पूर्ण करेल आणि दररोज सुमारे १,००० व्हिसावर प्रक्रिया करण्यास सक्षम आहे. हे नवीन केंद्र, मुंबईच्या रहिवाशांना सेवा देण्यासोबतच, बीएलएस इंटरनॅशनलची पोहोच आणि प्रभाव लक्षणीयरीत्या विस्तारत, जवळपासच्या प्रदेशातील अर्जदारांची देखील पूर्तता करते.

५२०० स्क्वेअर फूट पसरलेले हे केंद्र अत्याधुनिक बायोमेट्रिक नावनोंदणी, दस्तऐवज पडताळणी प्रणाली, इंटरनेट किओस्क आणि प्रीमियम लाउंजने सुसज्ज आहे. इंटरनेट कियोस्क, फॉर्म भरण्यासाठी, अर्जाची स्थिती तपासण्यासाठी आणि माहिती गोळा करण्यासाठी ऑनलाइन संसाधनांमध्ये सहज प्रवेश प्रदान करतात. यात एक प्रीमियम लाउंज देखील आहे जे अखंड अनुभवासाठी वैयक्तिक सहाय्यासह आरामदायक वातावरण देते. अनुभवी व्यावसायिकांनी भरलेले आणि प्रगत तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य असलेल्या या केंद्राचे उद्दिष्ट व्हिसा अर्ज प्रक्रिया कार्यक्षम आणि आनंददायी बनवण्याचे आहे. या प्रतिष्ठित केंद्राचे उद्घाटन स्पेनचे महावाणिज्यदूत श्री फर्नांडो हेरेडिया नोगुअर यांच्या हस्ते करण्यात आले. बीएलएस इंटरनॅशनलचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री शिखर अग्रवाल यांनी नवीन केंद्राबद्दल उत्साह व्यक्त केला, ते म्हणाले, "मोठ्या उत्साहाने, आम्ही मुंबईतील आमच्या अत्याधुनिक केंद्राचे उद्घाटन जाहीर करतो. ही अत्याधुनिक सुविधा आमच्या आदरणीय संरक्षकांसाठी एक अतुलनीय आणि कार्यक्षम व्हिसा-प्रोसेसिंग अनुभव देण्याच्या आमच्या समर्पणामध्ये एक महत्त्वाची झेप दर्शवते. दररोज सुमारे १,००० व्हिसावर प्रक्रिया करण्याच्या क्षमतेसह, हे केंद्र आमचा कार्यप्रवाह वाढविण्यासाठी आणि सुव्यवस्थित करण्यासाठी धोरणात्मकपणे डिझाइन केलेले आहे.आजच्या गतिमान जगात, प्रवास अपरिहार्य आहे आणि स्पेन भारतीय प्रवाशांसाठी एक सर्वोच्च पर्याय आहे.संपूर्ण आर्थिक वर्षात हा कल वाढेल आणि हे नवीन केंद्र वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी निर्दोषपणे तयार आहे.

#रा



'हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. प्रामाणिकपणे सांगायचे झाले, तर मला हेडलाईन देण्याची इच्छा नाही. प्रत्येकाची वेगळी ताकद आणि कमजोरी असते.' 'मी द्रविडच्या नेतृत्वात कसोटी आणि गांगुलीच्या नेतृत्वात वनडेत पदार्पण केले. मी कुंबळेच्या नेतृत्वात सर्वोत्तम कामगिरी केली आणि मी एमएस धोनीच्याही नेतृत्वात खेळलो. मी सर्वाधिक काळ धोनीच्या नेतृत्वात खेळलो आणि मला त्याच्या नेतृत्वाखाली खेळण्यात मजाही आली. त्याने संघाचं चांगलं नेतृत्व केलं.'

-गौतम गंभीर

### महाराष्ट्र प्रीमियर लीग २०२४ स्पर्धा

# ईगल नाशिक व रत्नागिरी जेट्समध्ये फायनल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या(एमसीए) वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२४ स्पर्धेत क्वालिफायर २लढतीत साहिल पारिख (६८धावा), अथर्व काळे (नाबाद ५३) यांनी धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर ईगल नाशिक टायटन्स संघाने पुनीत बालन ग्रुप कोल्हापूर टस्कर्स संघाचा ६ गडी राखून पराभव करत दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ५बाद २०२ धावांचा डोंगर उभा केला. अंकित बावणेने आक्रमक फलंदाजी करत ४७ चेंडूत नाबाद ७७ धावांची खेळी केली. आक्रमक अर्धशतक खेळी करताना अंकित बावणेने ३चौकार व ३टोलेजंग षटकार मारले. त्याला सचिन धसने २९ चेंडूत ७चौकार व १षटकारासह ४५ धावांची ताबडतोब खेळी करून साथ दिली. या सलामी जोडीने ५१ चेंडूत ८३ धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. आक्रमक फटका मारण्याच्या प्रयत्नात सचिन धस झेल बाद झाला. प्रशांत सोळंकीने त्याला झेल बाद केले. पाठोपाठ राहुल त्रिपाठी (११) ला देखील झेल बाद करून कोल्हापूर संघाला दुसरा धक्का दिला. त्यानंतर अंकितने सिध्दार्थ म्हात्रेच्या साथीत चौथ्या विकेटसाठी ४१ चेंडूत ६१ धावांची भागीदारी करून संघाची धावगती वाढवली. सिध्दार्थ म्हात्रेने २६ चेंडूत ४ चौकार व १ षटकारासह ३८ धावा केल्या. त्यानंतर अंकितने योगेश डोंगरे(१८) च्या समवेत भागीदारी करून संघाला २०० धावांचा टप्पा पार करुन दिला.

२०२ धावांचे आव्हान घेऊन उतरलेल्या ईगल नाशिक टायटन्स संघाने १८ षटकात ४ बाद २०५ धावा काढून पुर्ण केले. मंदार भंडारी (१९) व अर्शिन कुलकर्णी (११) हे सलामीचे फलंदाज मोठी खेळी करू शकले नाहीत. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस उतरलेल्या साहिल पारिखने ३३ चेंडूत ६८ धावांची तुफानी खेळी केली. साहिलने अफलातून फलंदाजी करताना ३चौकार व ६ उत्तुंग षटकार ठोकले. साहिल व कौशल तांबे (२८धावा) यांनी तिसऱ्या विकेटसाठी ५५ चेंडूत ९६ धावांची भागीदारी करताना संघाच्या डावाला आकार दिला. १३ व्या षटकात अखेरच्या चेंडूवर फिरकीपटू अथर्व डाकवेने साहिल पारिखला झेल बाद करून ही जोडी फोडली. पाठोपाठ पुढच्याच षटकात श्रेयस चव्हाणने कौशल तांबेला पायचीत बाद केले व नाशिक टायटन्स संघाला चौथा धक्का दिला.

त्यानंतर अथर्व काळेने २० चेंडूत ५३ धावांची वादळी खेळी केली. त्याने आपले अर्धशतक साजरे करताना २चौकार व ७ षटकार ठोकून मैदान दणाणून सोडले. अथर्व व रणजीत निकम (नाबाद १४) यांनी पाचव्या विकेटसाठी ३९ चेंडूत ६९ धावांची भागीदारी करून संघाचा विजय सुकर केला.



## वेस्ट-इंडिजच्या विजयानंतर इंग्लंडची डोकेदुखी वाढली !

**युएसए :** २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत वेस्ट इंडिजने अमेरिकेचा पराभव करून इंग्लंड संघाची डोकेदुखी वाढली आहे. टी-२० वर्ल्ड कप २०२४ च्या ४६ व्या सामन्यात वेस्ट इंडिजने अमेरिकेचा ९ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेचा संघ १९.५ षटकांत केवळ १२८ धावांवरच गारद झाला. प्रत्युत्तरात कॅरेबियन संघाने हे लक्ष्य १०.५ षटकांत केवळ एक गडी गमावून पूर्ण केले. या सामन्यातील पराभवामुळे अमेरिकेचा संघ उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. दुसरीकडे वेस्ट इंडिजने दणदणीत विजयासह उपांत्य फेरीच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. आता गटातून उपांत्य फेरीच्या लढतीत फक्त दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि वेस्ट इंडिज हे संघ उरले आहेत. उपांत्य फेरी गाठण्यासाठी वेस्ट इंडिजला अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करावे लागेल. या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार रोव्हमन पॉवेलने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो अगदी योग्य ठरला. यूएसएची सुरुवात चांगली झाली नाही आणि अवघ्या ३ धावांवर संघाला पहिला धक्का बसला. यानंतर आंद्रेस गॉस आणि नितीश कुमार यांनी काही काळ डाव सांभाळला पण ते बाद होताच संपूर्ण संघ कोलमडूला आणि संघ १९.५ षटकांत १२८ धावांवरच मर्यादित राहिला. वेस्ट इंडिजकडून आंद्रे रसेल आणि रोस्टन चेस यांनी ३-३ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना शाई होप आणि जॉन्सन चार्ल्स या सलामीच्या जोडीने विंडीजला झंझावाती सुरुवात करून दिली. दोन्ही फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी ७ षटकांत ६७ धावा केल्या. या काळात जॉन्सन चार्ल्सला केवळ १५ धावा करता आल्या पण शाई होपने अतिशय तुफानी खेळी खेळली. त्याने ३९ चेंडूत ४ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने नाबाद ८२ धावा केल्या.

## नेहा, एकिशा, श्रेया, युतिका मुख्य फेरीत

**पुणे :** नेहा गाडगीळ, एकिशा मेदने, श्रेया चौधरी, युतिका चव्हाण आणि अनुश्री वैरागडे यांनी जी. एच. रायसोनी स्मृती जिल्हा अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेच्या पात्रता फेरीत आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली आणि मुख्य फेरी गाठली.

स्पर्धेतील १९ वर्षांखालील मुलींच्या पात्रता फेरीत नेहा गाडगीळने यज्ञा हडकरवर १३-१५, १५-९, १५-५ अशी, एकिशाने पर्णिका ठाकरेवर १४-१६, १५-१३, १५-११ अशी, श्रेया चौधरीने मैत्रयी कुगावकरवर १५-३, १५-४ अशी, युतिका चव्हाणने इंदिरा पाचरणेवर १५- ६, १५-७ अशी, तर अनुश्री वैरागडेने खुशी सोमवंशीवर १५-५, १५-२ अशी मात केली. या गटातील अन्य लढतींत नाव्या रांकाने आद्या जोशीचा १५-७, १५-४ असा, दिव्यांशा वाहाळने रिया गाडगीळचा १५-२, १५-३ असा, मेहक गुप्ताने अनुश्री भोसलेचा १५-६, १५-९ असा, मिताली इंगळेने जैश्रा पुनियाचा १५- १, १५-८ असा, इरा आपटेने भावना अग्रवालचा पराभव केला.

# टेबल टेनिस स्पर्धा : नील व प्रणव अंतिम फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क









**पुणे :** एकम टेबल टेनिस अकादमीतर्फे आयोजित केलेल्या यंदाच्या तिसऱ्या जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील मुलांच्या १९ वर्षाखालील गटात अव्वल मानांकित नील मुळ्ये याला विजेतेपदासाठी पारंपरिक प्रतिस्पर्धी प्रणव घोलकर यांच्याशी खेळावे लागणार आहे. मुलींमध्ये नैशा रेवसकर व जान्हवी फणसे यांच्यात अंतिम लढत होईल.

ग्रॅव्हिटी क्रीडा संकुल, डांगी चौक (पिंपरी चिंचवड परिसर) येथे ही स्पर्धा पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली आहे. मुलांच्या १९ वर्षाखालील गटात इंडियन ऑईल संघाचा अग्रमानांकित नील याने चौथ्या मानांकित संस्कार बसाक याला पराभूत केले.

मात्र त्यासाठी त्याला संघर्ष करावा लागला हा सामना त्याने ११-७,११-८, १२-१४, ११-८ असा जिंकताना अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडविला. उपांत्य फेरीच्या अन्य लढतीत तृतीय मानांकित प्रणव याने द्वितीय मानांकित अमिष आठवले याच्यावर सरळ तीन गेम्स मध्ये मात करताना चतुरस्त्र खेळ केला. हा सामना त्याने ११-९,११-९,११-७ असा जिंकला.

या मोसमात अनेक विजेतेपदे मिळवणाऱ्या नैशा हिने या स्पर्धेतही आणखी एका अजिंक्यपदाच्या दिशेने वाटचाल केली. तिने १९ वर्षाखालील उपांत्य लढतीत तृतीय मानांकित रुचिता दारवटकर हिला पराभूत केले. हा सामना ११-७,९-११, ११-९, ८-११,११-४ असा जिंकताना तिला खूपच कष्ट घ्यावे लागले. उपांत्य फेरीच्या अन्य लढतीत जान्हवी या चौथ्या मानांकित खेळाडूने अग्रमानांकित खेळाडू तनया अभ्यंकर हिच्यावर ४-११,११-८,११-७, ११-९ असा आश्चर्यजनक विजय मिळविला.



## दक्षिण आफ्रिकेने सलग दुसरा सुपर-८ सामना जिंकला

**युएसए :** दक्षिण आफ्रिकेने टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ फेरीत सलग दुसरा विजय मिळवला आहे. आफ्रिकन संघाने शुक्रवारी गतविजेत्या इंग्लंडचा ७ धावांनी पराभव केला. या विजयासह आफ्रिकन संघ उपांत्य फेरीच्या जवळ पोहोचला आहे. सेंट लुसिया येथील डॅरेन सॅमी स्टेडियमवर इंग्लंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वेगवान सुरुवातीनंतर आफ्रिकेचा संघ २० षटकांत ६ बाद १६३ धावाच करू शकला. पॉवरप्लेमध्ये संघाने ६३ धावा केल्या होत्या आणि एकही विकेट गमावली नाही. क्विंटन डी कॉक बाद झाल्यानंतर मधल्या षटकांमध्ये फलंदाजांनी संथ गतीने धावा केल्या. मिलरने १५० च्या पुढे धावसंख्या नेली. एकेकाळी संघ २०० धावांपर्यंत पोहोचेल असे वाटत होते. डी कॉकने ३८ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६५ धावांची खेळी केली. मिलरने ४३ धावांची उपयुक्त खेळी खेळली. धावांचा पाठलाग करताना इंग्लिश संघाने ६१ धावांत ४ विकेट गमावल्या. येथून लियाम लिव्हिंगस्टन आणि हॅरी ब्रूक यांनी ४२ चेंडूत ७८ धावांची आक्रमक भागीदारी करून विजयाच्या आशा उंचावल्या. त्यानंतर शेवटच्या ३ षटकांत कागिसो रबाडा, मार्को जॅन्सन आणि एनरिक नॉर्किया यांनी किफायतशीर गोलंदाजी करत इंग्लंडला २० षटकांत १५६ धावांवर रोखले. तिघांनी मिळून १८ चेंडूत २५ धावा दिल्या.

### सलग दुसऱ्या विजयासह युरो करंडकच्या बाद फेरीत

# स्पेनचे गतविजेत्या इटलीवर वर्चस्व;एका गोलने मात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**गेल्झनकिर्शन :** माजी विजेत्या स्पेनने इटलीवर एका गोलने मात केली असली, तरी सामन्यावर अधिकांश वर्चस्व राखले. गतविजेत्यांना नमवून त्यांनी सलग दुसऱ्या विजयासह ब गटातून युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या बाद फेरीत प्रवेश केला. सामन्याच्या ५५व्या मिनिटास रिकार्डो कालाफिओरी याच्या स्वयंगोलमुळे स्पेनला आघाडी मिळाली. तीन वेळच्या माजी विजेत्या संघातील खेळाडूंचे नेम काही वेळा चुकले, तसेच इटलीचा गोलरक्षक डोन्नारुम्मा याची दक्षता यामुळे स्पेनला १-० या विजयी फरकावर समाधान मानावे लागले.

गोलशून्य पूर्वार्धानंतर उत्तरार्धातील दहाव्या मिनिटास सामन्याचा मानकरी ठरलेल्या निको विल्यम्स याने दिलेल्या सुंदर क्रॉस पासवर अल्वारो मोराटा याचे हेडिंग रोखण्याच्या प्रयत्नात डोन्नारुम्मा असताना चेंडू कालाफिओरी याच्या गुडघ्याला लागून गोलजाळ्यात गेला. गतवेळी उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या स्पेनचे आता गटात सर्वाधिक सहा गुण झाले आहेत. त्यांचा अखेरचा सामना अल्बानियाविरुद्ध होईल. या लढतीच्या निकालावर विसंबून न राहता इटलीचा अखेरच्या साखळी लढतीत क्रोएशियाला पराभूत करावेच लागेल. सध्या इटलीचे तीन गुण असून अल्बानिया व क्रोएशियाचा प्रत्येकी एक गुण आहे.

स्पेनला तीन वर्षांपूर्वी युरो करंडकाच्या उपांत्य लढतीत इटलीने पेनल्टींवर नमविले होते, त्याची परतफेड त्यांनी गुरुवारी रात्री केली. स्पेनचे दोन्ही युवा विंगर निको विल्यम्स व लामिन यमाल यांनी इटलीच्या बचावफळीस चांगलेच सतावले.

## चौबे यांनी पद सोडल्यास भारतीय फुटबॉलची प्रगती

**नवी दिल्ली :** फिफा विश्वकरंडकाच्या पात्रता फेरीत अपयशाचा सामना करावा लागल्यानंतर मुख्य प्रशिक्षकपदावरून हकालपट्टी करण्यात आलेले इगोर स्टिमॅक यांनी शुक्रवारी अखिल भारतीय फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष कल्याण चौबे यांच्यावर टीका केली. स्टिमॅक यांनी परखड मत व्यक्त करताना म्हटले की, कल्याण चौबे जितक्या लवकर अध्यक्षपदावरून दूर होतील, तितक्या लवकर भारतीय फुटबॉल प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल. इगोर स्टिमॅक यांनी कल्याण चौबे यांना टार्गेट करताना म्हटले की, कल्याण चौबे यांचे फक्त सोशल मीडियाला प्राधान्य होते. दिग्गज फुटबॉलपटूंसोबत फोटो काढण्याकडे त्यांचा कल होता. फुटबॉल हा जगातील सर्वात प्रसिद्ध व मोठा खेळ आहे, पण जगामध्ये भारत हा एकमेव देश आहे, जिथे फुटबॉलची प्रगती झालेली नाही. कल्याण चौबे हे नेते आहेत, पण कोलकाता येथील त्यांच्या स्थानिक ठिकाणीही त्यांना कुणीही ओळखत नाही. भारतीय फुटबॉलला प्रगतीच्या दिशेने नेणाऱ्या व्यक्तीची भारतीय फुटबॉलला सध्या गरज आहे.

### हॉकी पुणे लीग; हॉकी लव्हर्स स्पोर्ट्स क्लबसाठी हितेश स्टार

# जीएसटी आणि कस्टम्स, पुणे संघाचा सहज विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जीएसटी अँड कस्टम्स, पुणेसह फ्रेंड्स युनियन क्लब आणि हॉकी लव्हर्स स्पोर्ट्स क्लब संघांनी हॉकी महाराष्ट्रच्या मान्यतेने सुरू झालेल्या हॉकी पुणे लीग २०२४-२५ च्या अनुक्रमे वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागाच्या गटात पहिल्या दिवशी सहज विजय नोंदवले.

मेजर ध्यानचंद स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथे कालपासून सुरू झालेल्या हॉकी लीगमध्ये उदघाटनीय सामन्यात फ्रेंड्स युनियनने पूना हॉकी अकादमीचा १-० असा पराभव केला. रेहान शेखने आठव्या मिनिटाला केलेला केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. ब गट सामन्यात हितेश कालियानाच्या (३०वे, ३३वे, ५५वे) तीन गोलच्या जोरावर हॉकी लव्हर्स स्पोर्ट्स क्लबने रोव्हर्स हॉकी अकादमीवर ४-१ असा सहज विजय मिळविला. हा विजय दिवसातील सर्वात मोठा विजय होता.

यश अंगीर (३७ व्या मिनिटाला) याने पेनल्टी-कॉर्नरमध्ये एक गोल केला. रोव्हर्स हॉकी अकादमीचा एकमेव गोल अभिजीत पवार (४६वा) याच्याकडून झला.



शेवटच्या सामन्यात जीएसटी आणि कस्टम्स, पुणे यांनी एकत्रित प्रयत्न करून आयकर, पुणे संघावर ३-० अशी मात केली. अनिकेत गुरव (१९वे) आणि फेलिक्स बा (२८वे) यांनी हाफ टाईमपर्यंत विजेत्यांना २-० अशी आघाडी मिळवून दिली तर तालिब शाह (४६व्या) याने त्यानंतर त्यात भर घातली.

**निकाल: कनिष्ठ विभाग :**

- अ गट: फ्रेंड्स युनियन क्लब: १ (रेहान शेख ८वा) बीटी पूना हॉकी अकादमी: ० . हाफटाईम: १-०
- ब गट: हॉकी लव्हर्स स्पोर्ट्स क्लब: ४ (हितेश कालियाना ३० वा, ३३ वा, ५५ वा; यश अंगीर ३७ वा - p.c) ब रोव्हर्स हॉकी अकादमी: १ (अभिजीत पवार ४६ वा. हाफटाईम: १-०.
- वरिष्ठ विभाग -
- जीएसटी आणि सीमाशुल्क, पुणे: ३ (अनिकेत गुरव १९ वा; फेलिक्स बा २८ वा; तालिब शाह ४६ वा) bt इन्कम टॅक्स, पुणे: ० . हाटाईम: २-०.

#रा